ग्रं. सं. ठाणे

विषय

सन

लेखक अर्जुन खोडुणा

पुस्तकाचें नांव मंडल ध्वज आणि मुद्रा

क्रमांक

८५

४

नागपूर, ता० २५ जुलै १८९२

हें पुस्तक कादंबरीवर्गांत मोडण्या सारिखें आहे. + + + + + + गालव मुनीचें शत्रुजित् राजाकडे येणें व यज्ञरक्षणार्थ ऋतध्वजाला राजाजवळ मागणें ह्या गोष्टी, विश्वामित्रानें रामाला मखरक्षणार्थ नेलें त्या वेळची आठवण देतात. पण हा मूळ ग्रंथकर्त्याचा दोष; ( प्रस्तुत पुस्तककार ) त्याबद्दल जबाबदार नाहींत. + + + + + + + + + + + साधारण जनांस तुमच्या पुस्तकावरून बरेंच मनोरंजन होईल असें वाटतें. भाषा सोपी व साधी आहे. एखाद्या लहान मुलालाही सहज समजण्यासारखी आहे. किंमत त्या मानानें अल्प ठेविली जाईल अशी आशा आहे. अशा प्रकारचे पौराणिक आख्यानांवर मराठींत बालसुबोध भाषेंत लिहिलेले गद्य ग्रंथ तयार होऊं लागले तर मराठी साहित्यांत बरीच भर पडेल, व महाराष्ट्र स्त्री पुरुषांस करमणूक होईल; शिवाय पुराणें स्त्रीशूद्रांकरतां लिहिलीं असें म्हणतात, तर त्या वर्गालाही हल्लीं वाचण्यापुरतें ज्ञान प्राप्त झालें असल्यामुळें पुराणकर्त्यांचा प्राथमिक हेतु सिद्धीस जाऊन, आमच्या स्त्रियांस वाचण्या लायक पुस्तकें मराठी भाषेंत होतील. + + +

**ह० म० पंडित**

देशसेवक प्रेस.

५

रा. रा. अन्तुन धोंडूजी यांस—

वि० वि० आपण जें मार्कंडेय पुराणांतर्गत "**ऋतध्वज आणि मदालसा यांचे चरित्र**" लिहून प्रसिद्ध करणार आहां. त्याची एक प्रत आम्हास पाठविली. तिचा आभारपूर्वक स्वीकार करून, ती वाचून पाहिली. त्यायोगें आम्हांस आनंद झाला. त्यांतील भाषा अगदीं साधी असूनही प्रौढ आहे. या पुस्तकांत आपण एकमेकांशीं बोलत असतां सहजवृत्या बोलण्यांत येणाऱ्या शब्दांचा व संभाषणपद्धतीचा बराच उपयोग केला असल्यामुळें भाषा प्रचारांतील आहे. असें केल्यानेंच प्रचारांतील भाषा प्रौढदशेस येण्याचा संभव आहे असें वाटतें.

यांतील कथाभाग पूर्वार्धांतल्यापेक्षां उत्तरार्धांत क्रमा क्रमानें सुरस होत गेला आहे. उत्तरार्ध मूळपुराणांतील नसून स्वकपोलकल्पित असेल तर, आपली कादंबरी लिहिण्याची शैली खरोखरी अनुकरणीय आहे.

आमच्या मतें जीं कांहीं व्यंगें दिसून आलीं तीं पेनसिलीनें लिहून दर्शविलीं आहेत. त्यांतून जीं आपल्या मतें बरोबर वाटतील त्यांची दुरुस्ती, सवड असल्यास आतां, किंवा द्वितीयावृत्तीचे वेळीं, केल्यास बरें होईल. परंतु एवं आम्हांस सांगण्यास हरकत वाटत नाहीं कीं अशीं व्यंगें गुणांच्या मानानें फार थोडीं आहेत.

मदालसेची सखी कुंडला हिनें ( पृष्ठ ९८ ) "गृहस्थांचे धर्म सांगितले आहेत, व दंपत्यांनीं कसें वागावें याचा उपदेश केला आहे" तो खरोखरी समजून घेऊन ध्यान

ठेवण्यासारखा आहे. + + + + + + +
+ + + पतीच्या मरणानंतर सहगमनाऽभावें जसें स्त्रीनें वैधव्य स्थितींत रहावें असें आहे, तसें स्त्रीच्या मरणानंतर पतीनेंही विधुर स्थितींत रहावें असें ऋतध्वजाच्या उदाहरणानें दाखविल्यानें व त्यांचें अनुकरण केल्यानें, पुरुषाच्या पुनर्विवाहानें ओढवणारे अनर्थ लोकांच्या ध्यानांत येऊन टळतील. शिवाय, स्त्रीपुरुषांची परस्परप्रीति उन्नतावस्थेस पोंचेल. + + + + + + + +


मदालसेचें संजीवन, बहुत राक्षसांस एकाच वीरानें मारणें इ० अशक्य गोष्टींस कांहीं रूपांतर देऊन—म्हणजे मूर्छित मदालसेस शुद्धीवर आणणें, सेनेसहित वीरांस राक्षसांवर पाठविणें असें वर्णन करून—कथेची जुळणी केली असती तर बरें असें मला वाटतें.

ता० १७ आगष्ट १८९२.

आपला हितेच्छु

( सही ) नानाभाई स० काळे,

असिस्टंट ट्रान्स्लेटर हायकोर्ट.



मार्कंडेयपुराणांतर्गत

# ऋतध्वज आणि मदालसा

## यांचें चरित्र.

---

(एक पौराणिक कादंबरी.)

हें पुस्तक

**अंतुन धोंडूजी**

यांनीं रचिलें

तें

मुंबईमध्यें

जॉइन्ट-स्टॉक् छापखान्यांत छापविलें.

---

सन १८९२.

---

किंमत बारा आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें
रजिस्टर करून सर्व प्रकारचे हक्क मालकानें
आपल्याकडे ठेविले आहेत.

# समर्पण.

रावसाहेब वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर

सरकारी वकील हैकोर्ट, मुंबई माजी लॉ

प्रोफेसर, अमदाबाद कालेज फेलो,

मुंबई युनिव्हर्सिटी जे. पी.

इ० इ०

यांस

त्यांची विद्वता, उदार व थोर मन,

परगुणज्ञता व मराठीभाषेच्या

ग्रंथसंग्रहाविषयीं आस्था इ०

गुणांस्तव त्यांच्या अनुमोदनानें

हें पुस्तक

बहुमानपुरःसर

अर्पण केलें आहे.

ग्रंथकार.

# प्रस्तावना.

पुराणग्रंथांचा आपल्यास कांहीं विशेष प्रकारचा उपयोग आहे असें आम्हांस वाटतें. त्यांच्या योग्यतेविषयीं कोणाचें कसेंही मत असो–कोणी त्यांस "शिमग्यां"त काढीत, किंवा कोणी त्यांस धर्मग्रंथ म्हणून शिरीं चढवीत––तरी मराठी ग्रंथ-संग्रहाला त्यांचा जो मोठा उपयोग होण्यासारखा आहे त्याविषयीं कोणाचें द्विधा मत पडेल असें वाटत नाहीं. त्यांवरून प्राचीन काळच्या आर्यलोकांच्या सत्वगुणप्रधान आचारविचारांचें व उदात्त आयुष्यक्रमाचें चित्र आपल्यास पहावयास मिळतें तसाच साधारण सर्वमान्य नीतिबोध व धर्मतत्वें यांचेंही कांहीं ज्ञान प्राप्त होतें; हे दोन मोठे उपयोग तर आहेतच; तरी मनोरंजक अद्भुत कथांचाही विपुल सांठा त्यांत सांपडण्यासारखा असल्यामुळें कल्पक कवींस व कादंबरीकारांस स्फूर्ति मिळून यांच्या आधारानें नवीन ग्रंथ तयार करण्याला चांगलं साह्य होईल हाही मोठाच उपयोग आहे यांत संशय नाहीं.

आजपर्यंत संस्कृत व प्राकृत कवींनीं, याच अपार खजान्यांतून द्रव्य घेऊन, काव्यनाटकादि पुष्कळ उत्कृष्ट प्रबंध लिहिले आहेत; आणि हाच क्रम पुढेंही सतत चालू राहील असें वाटतें. **रघुवंश, शाकुंतल, उत्तररामचरित्र** इत्यादि प्रबंध, **रामायणभारतां**तील साध्या कथानकांवरून किती उत्कृष्ट रचलेले आहेत व त्यांच्या योगानें संस्कृत भाषेस केवढें सौंदर्य आलें आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. आणि हेंही कित्येकांस माहित असेल कीं **मार्कंडेयपुराणां**तील जी कथा घेऊन ही प्रस्तुतची कादंबरी लिहिली आहे, तिच्याच आधारानें "**मदालसाचंपु**" या नांवाचें एक अन्यापकीं काव्य संस्कृतांत रचलेलं आहे. मराठींतील **वामन, मोरो**-

**पंत, श्रीधर, मुक्तेश्वर** इत्यादि कवींचीं बहुतेक काव्यें त
या पुराणग्रंथांचीं रूपांतरेंच आहेत. तरी तीं इतकीं उ
त्कृष्ट उतरलीं आहेत कीं, मराठी भाषेला त्यांनीं स्वतंत्र रच
नेच्या ग्रंथांप्रमाणेंच शोभा आणली आहे, व सर्वसाधारण
लोकांच्या अत्यंत प्रीतीस आपल्यास पात्र करून घेतलें आहे
अलीकडे गद्य ग्रंथ लिहिण्याचा प्रघात पडल्यापासूनही पुरा
णांचीं गद्य भाषांतरें व त्यांचा गोष्टींच्या रूपानें सारांश अश
प्रकारचीं पुस्तकें बाहेर येण्यास सुरवात झाली. अशा पुस्त
कांत स्वतंत्र कल्पकतेचें कांहींच लक्षण दिसत नसल्याकार
णानें त्यांच्या योगानें मराठी भाषेला मोठीशी प्रौढि आली
असें म्हणतां येणार नाहीं. तरी मराठी वाचकांचें मनोरंज
करून त्यांची वाचनाभिरुचि वाढविण्याचें काम त्यांजकडू
व्हावयास कांहीं हरकत नाहीं असें आम्हास वाटतें. असो त
पुराणग्रंथ हे खजिन्यासारखे असल्याकारणानें, मराठींत कल्पना
प्रचुर स्वतंत्र ग्रंथ लिहूं इच्छिणारांस त्यांचा किती उपयोग आ
व त्यांच्या साहाय्यानें मराठी वाचकांस मनोरंजनाचें केवं
उत्कृष्ट साधन करून देतां येणार आहे हें सहज लक्षांत येईल

आमचें प्रस्तुतचें पुस्तक अशाच प्रकारचें व्हावें अ
आमचा हेतु आहे. तें **मार्कंडेयपुराणां**तील एका प्रसिद्ध क
थानकाच्या आधारानें लिहून तयार केलें आहे हें वर सांगि
लेंच आहे. तरी एवढें आणखी सांगणें अवश्य आहे कीं
सारांशरूपानें लिहिलेलें नाहीं किंवा केवळ भाषांतररूपानें
नाहीं, तर मूळांतला आधार घेऊन स्वतंत्र कल्पनेनें कादं
रीच्या धर्तीवर तें लिहिलें आहे. अर्थात् मूळच्या कथानकां
पुष्कळ ठिकाणीं फेरफार करावे लागले व तसे ते केले अ
हेत. व कित्येक भाषणांचीं भाषणें व बनावच्या बनाव नवी

सजवून घातले आहेत; हे सर्व प्रकार एथें खुलासेवार सांगत बसत नाहीं. मूळ कथानक व आमचें हें पुस्तक हीं वाचून पाहिलीं असतां ते वाचकांच्या तावडतोब ध्यानांत येतील. अशा प्रकारची फिरवाफिरव करण्याची मोकळीक घेण्याची ग्रंथकारांची वहिवाटच आहे. एवढें आमच्या पुस्तकाच्या रचनेबद्दल लिहून हा आमचा नवीन यत्न कितपत सफळ झाला आहे हें पाहण्याचें वाचकांकडे सोंपवितों.

या पूर्वीं **भारतेतिहाससार** या नांवाचें पुस्तक तयार करून छापलें आहे; आणि प्रस्तुतचें पुस्तक त्याच माळिकें-तलें असून हल्लीं वाचकांस सादर करीत आहों. अशा प्रकारचीं लहान मोठीं पुस्तकें सवडीसवडीनें प्रसिद्ध करून देशबां-धवांचें रंजन करण्याचा आमचा हेतु आहे तो ईश्वराच्या कृ-पेनें सफळ होवो असें आम्ही इच्छितों.

कादंबऱ्या हीं कल्पित चरित्रेंच होत. यास्तव या पुस्त-कास चरित्र असें म्हटलें आहे. त्यांत राजपुत्र **ऋतध्वज** व गंधर्वकन्या **मदालसा** यांचीं कृत्यें वर्णिलीं आहेत. व पितृ-भक्ति, पतिप्रेम, मित्रत्व व सज्जनांचा आदर इत्यादि सन्मा-न्य गुणांचें महत्व किती आहे हें दाखविलें आहे.

या पुस्तकाचीं पानें थोडींही चाळलीं असतां एक विशेष प्रकार कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखा आहे. तो अर्थात् हा कीं यांत लाकडावरल्या तसबिरा ठिकठिकाणीं घातल्या आहेत. आतां या तसबिरा म्हणजे निरनिराळ्या पात्रांचीं चित्रें मात्र आहेत; त्यांच्या दर्शनापासून रागद्वेषादि वि-कारविशेषांचा जो उद्बोध व्हावा तो अर्थात आंतील वर्णना-पासूनच व्हावयाचा आहे. म्हणजे चित्रकथी जसा चित्रें दाखवितो व कृत्य विशेषांचा वृत्तांत आपण तोंडानें सांगतो;

किंवा जादूच्या दिव्याच्या खेळांत चित्र नाचत मात्र असू बोलण्याचें काम सूत्रधारास करावें लागतें; तसाच प्रका या पुस्तकांतील तसविरांचा आहे. वास्तव, त्या इत क्या सुंदर आहेत असें जरी नाहीं, तसेंच स्थळविशेष वर्णिलेल्या कृत्यांची व वस्तूंची कल्पना व्हावयाला त्यांवरू वाचकांस मदत व्हावी हा जो अशा तसविरांचा मुख्य उद्देश तोही बरोबरसा सिद्धीस जाईल असें म्हणवत नाहीं तरी अशा रीतीनें चित्रें घालण्याचा क्रम मराठी कादंबरींत सुरू केलेला फारसा पहाण्यांत नसल्यामुळें तो वाचकांस पसंत पडून ते त्याचें अभिनंदन करतील अशी आशा आहे

या पुस्तकास आश्रय चांगला मिळाल्यास द्वितीय आवृ त्तीचे वेळीं किंवा कदाचित् याच मालिकेंतलें दुसरें पुस्तक छापतेवेळीं, यापेक्षां सुरेख तसविरा देऊं अशी उमेद आहे इकडे सुज्ञजनांनीं लक्ष देणें अवश्य आहे.

हें पुस्तक मीं आपल्या अल्पमतीनें तयार केल्यावर त्यांत अशुद्धें व चुका राहण्याचा संभव वाटल्यावरून माझे पर स्नेही रा. रा. **खंडेराव भिकाजी बेलसरे** यांजकडे परीक्ष णासाठीं पाठविलें. त्यांत त्यांनीं बरीच सुधारणा केली त्य बद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. शिवाय हें पुस्तक लिहितांना **गोंधळेकरांकडील मार्कंडेयपुराणा**च्या भाषां राचा, एका **विष्णुदासी** नाटकाचा, तसाच **कथाकल्पत** नांवाच्या प्राकृत ग्रंथाचा उपयोग केला आहे त्या बद्दल त त्या ग्रंथकारांचा मी आभारी आहें. शेवटीं ही अल्प भे विद्वज्जनचरणीं समर्पण केली आहे ती ते हंसक्षीरन्याया मान्य करतील ही आशा आहे.

# अनुक्रमणिका.

पृष्ठें.

प्रकरण १ लें.--१. अयोध्येच्या शत्रुजित् राजाचें दरबार. २. राजपुत्र ऋतध्वजाला यज्ञरक्षणार्थ नेण्यासाठीं गालवनामक मुनीचें तेथें कुवलय अश्वासह आगमन ३. गालवमुनि आपल्या यज्ञाचा, इंद्राच्या व सूर्यनारायणाच्या आज्ञेचा, व अश्वप्राप्तीचा वृत्तांत सांगतो. ४. राजाचा विलाप व त्याचें राजपुत्रानें, मुनीनें व मंत्र्यांनीं केलेलें शांतवन. ५ राजपुत्राचें मुनीबरोबर जाणें. ....................................१–१६

प्रकरण २ रें.–१ मार्गक्रमण. सृष्टिसौंदर्याचा देखावा. २. यज्ञ चालला असतां राक्षसाचें शूकरवेशानें आगमन, व तेवेळचें प्रसंगवर्णन. ३. राजपुत्र शूकराचा पाठलाग करतो. ४. त्याच्या मागोमाग पाताळांत जातो. ५. राक्षसराजाच्या वाड्याचें वर्णन व ऋतध्वजाची आणि कुंडला व मदालसा या दोघा गंधर्व स्त्रियांची गांठ. ६. मदालसेचें स्वरूपवर्णन. ........१६–३२

प्रकरण ३ रें.–१. मदालसेचा पूर्ववृत्तांत कुंडला सांगते. राक्षसाकडून मदालसेचें हरण; कामधेनूकडून तिचा शोध; तिची व कुंडलेची भेट. २. ऋतध्वज व मदालसा यांची परस-

पृष्ठ.

२ प्रेमासक्तता. ३. **तुंबरूचें** आगमन. ४. राक्षससैन्याचा पराभव व देवगंधर्वांची बंधमुक्तता. ५. **मदालसा** व **ऋतध्वज** यांचा विवाह. ६. **कुंडलेचा** **मदालसेस** व **ऋतध्वजास** उपदेश. ७. **तुंबरु** व **कुंडला** यांचें इंद्रलोकीं जाणें व **ऋतध्वजाचें** **मदालसेसहित** **अयोध्येस** येणें. ........................३२–६०

**प्रकरण ४ थें.**—१. **ऋतध्वजाची** **शत्रुजित्** प्रशंसा करतो व सत्पुत्राचें लक्षण सांगतो. २. **प्रियकरंडक** नामें राजपुत्राच्या बागेचें वर्णन. ३. बाग कोणासाठीं तयार केला याबद्दल **ऋतध्वज** व **मदालसा** यांचा विलासाचा संवाद. **मदालसेच्या** रूपाचें व बागेच्या वैभवाचें सादृश्यवर्णन. ४. हरिणाच्या जोड्याचें परस्परप्रेम. ५. **ऋतध्वज** धर्मरक्षणार्थ रोज पृथ्वीवर फिरण्याची पित्यापासून परवानगी मिळवतो. ६. उत्कंठिता नायिकेचें उदाहरण. **मदालसा** संकेताप्रमाणें पति न येण्याचें कारण शोधते व मौनव्रताचा निश्चय करते. ७. नागमित्रांच्या भेटीचा वृत्तांत. ८. **मदालसा** पतीस कंठभूषण देते. ..............................६०–८०

**प्रकरण ५ वें.**—१. **तालकेतु** कपिवेशानें राजपुत्रास भेटतो, व यज्ञाचा बाहणा सांगून कंठहार उपटतो. २. तो **मदालसेस** वगैरे दाखवून, राजपुत्राच्या मरणाचा वृत्तांत सांगतो. **मदालसे-**

मार्कंडेय पुराणांतर्गत

# ऋतध्वज आणि मदालसा यांचें चरित्र.

जगाच्या जनीकारणें जो रजाला
धरी, पालनाकारणें सत्वशीला ।
तमाला लयाकारणें, फार लीला
अशा दाखवी, वंदितों त्या अजाला ॥ १ ॥

चित्ताला रमवावया स्वपतिच्या कांता उभी ती सदा
तैशी सद्रसिकांस हेहि सुकथा आहेचि तोषप्रदा ।
गीर्वाणग्रथिता करूनि सुलभा ही प्राकृतीं आणिली
कोणा हर्ष न दे ? सुदुर्लभाहि जी ती हस्तगा जाहली ॥२॥

## प्रकरण पहिलें.



प्राचीनकाळीं अयोध्या नगरीमध्यें सूर्यवंशांत उत्पन्न झालेला शत्रुजित् नांवाचा चक्रवर्ती राजा राज्य करीत होता. तो मोठा पराक्रमी होता इतका कीं, त्याचें नांव ऐकूनच शत्रूचें हृदय फाटून जात असे. तसाच तो परम धार्मिकही होता. त्यानें अनेक यज्ञ करून इंद्रादि देवांस संतोषित केलें होतें. त्याच्या अमलाखालीं पुष्कळ मांडलिक

राजे राज्य करीत होते. ते त्याच्या पराक्रमाला भिऊन सदा त्याच्याशीं नम्रतेनें वागत असत. विनाकारण त्यांस तोही पीडा देत नसे; व त्यांच्याशीं प्रेमभावानें वागत असल्यामुळें त्यांना त्याची भीति वाटत नसे. यामुळें त्याजवर ते सदा संतुष्टचित्त असून त्याची आज्ञा मनोभावानें मान्य करीत असत. सार्वभौम ही पदवी जर कोणास साजण्यासारखी असली तर ती त्यासच उत्तम साजत होती असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

त्यास **ऋतध्वज** म्हणून एकुलता एक मुलगा होता. तो बापाप्रमाणेंच प्रतापी व धार्मिक असा होता. बालपणांतच त्यानें सर्व विद्यांत निपुणता मिळविली होती. रूपानें सुंदर व गुणांनीं स्पृहणीय असा तो राजपुत्र तारुण्याच्या बहरांत आल्यामुळें, आपले सवंगडे जे इतर राजपुत्र व दुसरे लोक यांजबरोबर अनेक प्रकारच्या क्रीडा करीत असे, व आपल्या पित्यास संतोष देत असे.

कोणे एके दिवशीं **शत्रुजित्** राजा प्रधानादिकांसहवर्तमान सभेमध्यें राज्यप्रकरणीं कारस्थानें, प्रजेचें कुशल वृत्त, धर्माचें रक्षण वगैरे महत्वाच्या गोष्टींचा विचार यथातथ्य करीत बसला होता. इतक्यांत भालदारानें "कोणी एक **गालव** या नांवाचे ऋषि भेटीची आशा करून आले आहेत" अशी वर्दी दिली. तें ऐकून राजाला फार आनंद झाला, व त्यांस आदरानें आंत घेऊन येण्याविषयीं त्यानें सेवकास आज्ञा केली ऋषीस जो सत्कार उचित तसा सत्कार **गालवाचा** करून राजा त्यांस म्हणाला, "मुने! आपल्या दर्शनानें मी फार पवित्र झालों. कोण्य निमित्तानें आपलें आगमन इकडे झालें? धर्मक्रिया सर्व यथास्थित चालल्या आहेतना? राजांचें मुख्य धन म्हणजे प्रजाजनांचा संतोष हेंच होय; आणि तो अर्थात् त्यांच्या

संरक्षणानें संपादन होणारा आहे. सर्व प्रजा धर्माप्रमाणें चालून धर्मवृद्धि व्हावी, व त्यासाठीं दुःखापासून व परचक्रापासून त्या सुरक्षित असाव्या. हाच राजांचा मोठा पराक्रम; यास्तव आपल्यास कांहीं पीडा आहे कीं काय हें प्रथम मला निवेदन करावें. आम्हीं सर्वजण आतां हाच विचार करीत होतों. तर आपल्या आगमनानें राज्याची खरी स्थिति आम्हांस



आतां कळेल म्हणून ती ऐकण्यास आम्हीं फार उत्सुक झालों आहों. यास्तव आपली काय इच्छा आहे ती सांगावी, ती पूर्ण करण्यास हा दास जवळ सिद्ध आहे."

गालव ऋषीला हें राजाचें नम्रतेचें भाषण ऐकून बहुत समाधान झालें, तो म्हणाला, "राजा! तूं जें भाषण केलेंस तें सूर्यवंशांतील राजांना योग्य असेंच आहे. हिऱ्याच्या खाणींतून हिरे निघावे यांत काय नवल आहे? प्रजाजनांचा संतोष ठेवण्याविषयीं व धर्मवृद्धीविषयीं तुझी जी तत्परता आहे ती पाहून मला फार संतोष झाला. माझी खातरी आहे कीं, माझें कार्य तुझ्या हातून खचित होईल. धर्माचरणांतच मला तुझें सहाय्य पाहिजे आहे म्हणून तुजकडे आलों आहे."

असें ऐकतांच राजानें उत्तर केलें, "ऋषीश्वरा! माझ्या हातून आपलें कोणतें महत्कृत्य शेवटास जावें, व सहाय्य करण्यास मी कोठें यावें याची आज्ञा व्हावी, म्हणजे त्याप्रमाणें

करण्यास मी सिद्ध आहें. आम्हा राजे लोकांना आपल्या-कडून तपाचा सहावा भाग मिळत असतो, तर तें तपश्चरण निर्विघ्न व्हावें हें आम्हास अत्यंत श्रेयस्कर आहे."

राजाच्या या भाषणानें ऋषीस अधिक विश्वास येऊन तो बोलूं लागला; "मला तुझ्याकडे येण्याविषयीं साक्षात् **सूर्यनारायणाचीच** आज्ञा आहे. माझ्या तपश्चरणानें प्रसन्न होऊन, माझ्या पीडा निवारण्यासाठीं त्यानें मला तुजकडे पाठविलें आहे. त्याचें आश्वासन कधींही असत्य व्हावयाचें नाहीं. आतां माझ्या तपाचें कारण काय व मला काय पीडा आहे हा वृत्तांत मी तुला सांगतों तो श्रवण कर."—

'सूर्यतनया जी **यमुना** तिच्या काठीं आश्रम करून मी सुखस्थितीनें स्वाध्याय संपादून धर्म चालवीत असतां. एके समयीं माझ्या मनांत असें आलें, कीं, आपण यज्ञ करून इंद्रादि देवास तृप्त करावें. त्याप्रमाणें **व्यास, पराशर, रैभ्य, अंगिरा, देवल, धौम्य, यवक्रीत, हस्तिकाश्व,** वगैरे मुनीश्वरांना आमंत्रण करून, आपल्या आश्रमांत आणविलें व त्यांच्या सहाय्यानें यज्ञास आरंभ केला. पण राजा! काय सांगावें? देव ब्राह्मणांस पीडा द्यावी, धर्मक्रिया नीट चालू देऊं नयेत, हेंच ज्यांचें कुलव्रत, अशा कांहीं महादुष्ट दानवांस आमच्या यज्ञाची वातमी लागून त्यांनीं



आमच्या कार्यांत विघ्न आणिलें, सर्व यज्ञाचा विध्वंस केला व आम्हासही फार पीडा दिली. अशा रीतीनें आम्हास

त्रास झाला एवढेंच केवळ नव्हे तर याहीपेक्षां मोठी कष्टप्रद आणखी एक दुसरी गोष्ट अशी आहे कीं, तुमच्या सारख्या प्रजाधर्मदक्ष राजे लोकांचेंही आम्हास रक्षण मिळालें नाहीं; तसेंच ज्यांना हविर्भाग मिळावा व त्यांनीं संतुष्ट व्हावें असा आमचा मनोरथ, अशा इंद्रादि देवतांनींही हा सर्व प्रकार निमूटपणीं सोसला ; तेव्हां हें आश्चर्य नव्हे काय ?'

या प्रमाणें **गालव**ऋषीचें भाषण चाललें असतां **शत्रुजित्** राजाला फार क्रोध आला व त्वेषानें तो विचारूं लागला, "ऋषिवर्य ! हे राक्षस कोण आहेत, कोठें राहतात, हें आपण मला सांगाल काय ? मी आतांचे आतां आपल्या बरोबर येऊन त्यांचा नाश करतों. मला आतांपर्यंत वाटत होतें कीं, माझें राज्य निर्वैर आहे व प्रजाजन मोठ्या सुखांत आहेत ! पण मनुष्यांच्या कल्पना किती कोत्या असतात ! आपल्या सारख्या धर्मात्म्यांना एवढी पीडा होत असतां आम्हीं स्वस्थ कसें असावें ? चला चला. प्रधानजी, सेना सिद्ध करण्याविषयीं लवकर आज्ञा द्या ; अथवा सेनेचें काय प्रयोजन आहे ? मीच हा धनुष्यबाण माझ्या सहाय्यास घेऊन येतों म्हणजे झालें. त्या अधम राक्षसांचा विध्वंस करून परत येईतोंपर्यंत, तुम्ही राज्याचें रक्षण करा. वेदेश्वरा ! आपल्यास कांहींएक चिंता नसावी. आपला यज्ञ सांग व यथाविधि मी पूर्ण करून देतों, तर आपण तिकडे चलावें."

त्यास कांहींसा शांत करून, **गालव** ऋषि म्हणूं लागला:— "'राजाधिराज, सूर्यकुलभूषणा, तूं धन्य आहेस ; तुझ्या हातून माझे इष्ट हेतु खचीत सिद्धीस जातील. शत्रूंचें नांव ऐकल्याबरोबर तुमच्या सारख्या शूरांचे बाहु फुरफुरूं लागावे हें योग्यच आहे. तुझें आश्वासन आम्हांस मिळालें असतां

आमचें कार्य सिद्ध होईल यांत शंकाच नाहीं. पण हें कार्य तुझ्याकडून सिद्धीस जावयाचें नाहीं असा ईश्वरी नेमानेम आहे त्यास उपाय नाहीं. मी असें कशावरून म्हणतों असें विचारशील तर सांगतों ऐक."—

'आतांच सांगितल्याप्रमाणें आमचा एक यज्ञ तर फुकट गेला. तेव्हां मोठ्या सावधगिरीनें आम्हीं दुसऱ्या यज्ञाची तयारी चालविली. पण त्याचाही पहिल्याप्रमाणेंच विध्वंस झाला. तिसऱ्या खेपेलाही तसाच प्रकार घडला. तेव्हां मला खेद झाला कीं, धर्माचा पुरस्कर्ता क्षत्रिय कोणी उरलाच नाहीं काय? ब्राह्मण आणि वेद व यज्ञयागादि कर्मं यांचा लोप व्हावा असा काळ एवढा समीप आला काय? हाय! हाय!! काळाची गति किती दुर्धर आहे! अशी मी चिंता करीत असतां, मला क्रोध चढला, आणि मी म्हणूं लागलों, खरें आहे. कोणीही धर्माचें रक्षण करीत नाहींत तर न करोत; मीच आतां या उन्मत्त राक्षसाधमांचें शासन करतों.' असें म्हणून यमुना जलामध्यें प्रवेश केला. स्नानविधि आटोपून व



हातांत दर्भोदक घेऊन कांठावर येऊन उभा राहिलों, आणि आतां त्या राक्षसांच्या निःपातासाठीं शापवचन बोलणार तों सर्व सुरासुरांचा राजा जो इंद्र तो प्रत्यक्ष प्रगट होऊन माझा हात धरून म्हणाला, 'ब्राह्मणा! तूं काय मांडलें आहेस हें!

क्रोधास वश होऊन अशा अल्पकार्यार्थ इतके दिवसांच्या तपोराशीचा असा नाश करूं इच्छितोस यास काय म्हणावें ! तर असें साहस करूं नको. शापावांचून अन्योपायाची योजना करून त्यांची शांती करणें हें क्षमाशील ब्राह्मणास उचित आहे ; व हेंच तपाचें सार्थक.'

'सुरपतीच्या या शब्दांनीं माझा क्रोध शांत न होतां उलटा जास्तीच चेतला. व मी म्हणालों, 'अहो हा काय अन्याय? तुह्माला यज्ञभाग द्यावा व संतोषित करून आम्हांस इच्छित जें मोक्षपद तें मिळवावें याविषयीं आमची खटपट; तींत सहाय्य करण्याचें एकीकडे ठेवून, ज्या दुष्टांनीं आमच्या यज्ञकर्मास विघ्न केलें त्यांचा नाश करण्यास मी प्रवृत्त झालों असतां, माझें निवारण करण्यास तुह्मीं इच्छितां, तेव्हां हा चमत्कार नव्हे काय? यास्तव तुह्मालाच आतां मी शापदग्ध करून टाकतों.' मला रागामुळें भान न राहून अशी अनुचित वाणी माझे मुखांतून निघून गेली. व मी हातांत उदक घेऊन शाप देण्यास सिद्ध झालों. इतक्यांत 'हं हं! हें काय ? मला दग्ध करण्याच्या पूर्वीं सर्व वृत्तांत ऐकून तरी घे ; मग पाहिजे तर शाप दे. शत्रूंच्या वधाचा उपाय तूं योजला आहेस तो हा नव्हे.' असें ह्मणून मला शांत केल्यावर तो सांगूं लागला.—

'पूर्वीं **वज्रकेतु** नांवाचा राक्षस होऊन गेला. त्यानें तपश्चर्येच्या बलानें **शंकरास** प्रसन्न करून घेऊन, वरप्रदान मागून घेतलें कीं 'मला दोन मोठे पराक्रमी पुत्र व्हावे त्यांस कोणापासूनही मरणाचें भय नसावें. व त्यांनीं सर्व पृथ्वीचें राज्य करावें.' **शंकरांनीं** ही गोष्ट कबूल करून 'तुझ्या म्हणण्याप्रमाणें होईल' असा आशीर्वाद दिला. परंतु जवळ **पा-**

वंनी होतो तिला भय पडलें कीं हे दोघेही पुत्र अजिंक झाले असतां मोठा अनर्थ होऊन जाईल व भूतळावर वसत करण्यास फार कठीण पडेल; असें मनांत आणून तिनें त्याच वेळीं असें ठरवून घेतलें कीं, 'याप्रमाणें दोघेही पुत्र मोठे परा क्रमी होतील खरे, तथापि त्यांना पाताळलोकचें राज्य मिळे ल. त्यांनीं ब्राह्मणांच्या यज्ञाचा भंग करूं नये. व तो जेव्हां त्यांच्याकडून होईल तेव्हां सूर्यवंशांत एक महापराक्र राजपुत्र होईल त्याच्याच हातानें त्यांचा वध होईल.' वरप्रदानास अनुसरून त्या वज्रकेतूस दोन पुत्र झाले लहान असतांनाच त्यांनीं क्रीडेनें मोठमोठीं झाडें मोडावीं व अरण्यांतील श्वापदांस धरून हाल हाल करून जि मारावें, असा अनर्थ त्यांनीं मांडला. जसजसे ते मोठे होत चालले तसे त्यांचें बळ वृद्धिंगत झालें. त्यांनीं पाताळ लोकांस जिंकून तेथें आपली अप्रतिबंध सत्ता सर्वत्र स्थापि केली. पुढें ते पृथ्वीतलावर येऊन एकेक राजाला जिंकूं लागले. वारंवार वर येऊन त्यांनीं गोब्राह्मणांस पीडा द्यावी त्यांस मारावें, लुटावें व धरून बंदींत टाकावें; त्यांचा अस क्रम चालला असतां त्यांस तुझ्या यज्ञाला विघ्न करण्याची बुद्धि सुचली आहे. त्यावरून त्यांचा अंत होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. तर हे महा ब्राह्मणा! तुझ्या यज्ञांत व्यत्यय आल्यामुळें खिन्न होऊं नको. तुझ्या यज्ञामुळें या प्रबळ दानवांचा नाश होऊन पृथ्वीचा भार हरण होणार आहे. तेव्हां हें तुझ्या यज्ञाचेंच सुकृत होय असें समज असो; आतां मी सांगतों त्याप्रमाणें कर, म्हणजे त्या उपा यानें तुझ्या शत्रूंचा नाश होईल, पृथ्वीचा भार हलका हो ईल, यज्ञ सिद्धीस जाईल, आम्हास हविर्भाग मिळून आ

म्हीही संतुष्ट होऊं व तुला तुझें इच्छित प्राप्त होईल. यासाठीं तूं असें कर कीं, सर्वत्राह्यांतर्साक्षी जो भगवान् **सूर्यनारायण** त्याची प्रार्थना कर, म्हणजे तो प्रसन्न होऊन तुला एक उत्तम अश्व देईल व त्या दानवांचें निवारण कोण करील त्याचा मार्गही तोच सांगेल.'

'राजाधिराजा ! याप्रमाणें सुरपतीचें भाषण ऐकून मला समाधान वाटलें व त्याची स्तुति करून यथासांग पूजा केल्यावर, तो अंतर्धान पावला. सूचनेप्रमाणें मी लागलाच सूर्यपुरश्चरणास आरंभ केला. त्यालाही बराच काल लोटला. एकेसमयीं भर माध्यान्हकालीं भगवंताकडे स्थिर दृष्टि देऊन बसलों असतां, मला एका तेजःपुंज पुरुषाचें दर्शन झालें. त्यानें मला सांगितलें कीं, 'मी **सूर्य** आहें. तुझी तपश्चर्या पाहून प्रसन्न झालों आहें. तुझ्या तपाचें प्रयोजन मी समजलों. तुला मी हा उत्तम अश्व देतों. हा कुवलयासारखा निळा आहे म्हणून हा **कुवलयाश्व** याच नांवानें जगांत प्रख्यात होईल. हा ईश्वरांश असल्यामुळें याचा



वेग केवळ वायूसारखा आहे. याचे गुणही उत्तम आहेत व हा मनुष्याप्रमाणें सर्व कांहीं जाणतो. **अयोध्या** नगरींत **शत्रुजित्** राजा राज्य करीत आहे. त्याचा पुत्र महापराक्रमी आहे, व तोच एक या अश्वावर बसण्यास योग्य आहे. यास्तव हा अश्व

नेऊन त्यास दे, म्हणजे या अश्वावर बसून तोच तुझ्या शत्रूंचा नाश करील व तुझ्या यज्ञाचें रक्षण करील. आतां तप पुरे करून त्याच्याकडे जा. विलंब लावूं नको.' असें पाहून मी त्याची पूजा करणार तों भगवान् अंतर्धान पावला. मी डोळे उघडून समोर पाहिलें, तों हा तुमचे सर्वांपुढें उभा असलेला अश्व मला दिसला. त्याच्या सुंदरपणावरून व इतर सांगितलेल्या खुणां-वरून **सूर्यनारायणानें** पाठविलेला हाच तो घोडा असें ओळखून, मी त्याला धरलें; व **नारायणाच्या** आज्ञेप्रमाणें आतां त्यास घेऊन तुजकडे आलों आहे. तर याचा स्वीकार तुझ्या पुत्रानें करावा असें मी इच्छितों. '

आरंभीं **गालवऋषीच्या** भाषणानें **शत्रुजित्** राजाला आनंद झालेला दिसत होता. पण तो या शेवटल्या वृत्तां-तानें अगदीं मावळला. त्याचें मुख म्लान व दीन दिसूं लागलें. कारण **गालव** पुढें काय मागणार हें त्यास सहजच समजून आलें. तो म्हणाला " महामुने! माझा बाळ **ऋत-ध्वज** हा अजून अल्पवयस्क आहे. त्याच्यानें या खंद्या घोड्यावर कसें बसवेल व हा एवढा घोडा त्यास कसा आवरेल? यास्तव देवलोकींचा हा प्रासादिक घोडा आमच्याकडे राहूं द्या, त्याला आम्हीं आपल्या अश्वशाळेंत ठेवून त्याचें चांगलें पोषण करूं; आणि तुमच्या यज्ञ रक्ष-णासाठीं मी स्वतः येऊन, त्या दुष्ट दानवांचा नाश करतों.'

" नृपश्रेष्ठा! तूं स्वतः आल्यानें तुझ्या हातून यज्ञ रक्षण होईल यांत कांहीं शंका नाहीं. तुम्ही सूर्यकुलांतले राजे शूरच आहां. तुमच्या पराक्रमास अशक्य अशी एकही गोष्ट नाहीं. तथापि आतांच मी सर्व वृत्तांत सांगितलाना कीं, त्या दानवांचा वध तुझ्या पुत्राच्या हातानेंच व्हावा असा ईश्वरी

संकेत आहे. यास्तव या दिव्य घोड्यावर बसवून ऋतध्वजाला आमच्या सरंक्षणासाठीं समागमें येण्याची आज्ञा कर. हें माझें तुजपाशीं मागणें आहे. हा घोडा त्याच्यासाठींच निर्माण झाला आहे, याजवर बसून त्याला हुकुमांत ठेवण्याला केवळ तोच शक्तिमान आहे. राजा! तुला भय धरण्याचें कांहीं कारण नाहीं. पहा, ज्या गोष्टी केवळ ईश्वरी सूत्रानेंच ठरलेल्या आहेत, त्यांत शंका धरणें किती निरर्थक आहे? तुला वाटतें माझा ऋतध्वज लहान आहे. तो काय पराक्रम करील? परंतु ही तुझी समजूत चुकीची आहे. मायामोह तुला भ्रमांत पाडीत आहे; यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. पहा, सिंहाचा छावा जरी लहान झाला तरी त्याला मोठ्या मदोन्मत्तही हत्तीचें गंडस्थल विदारण करणें अशक्य आहे काय? त्यावर तो उडी घालण्याला मागें पुढें पाहील काय? आपला पराभव होईल ही शंका तरी त्याच्या स्वप्नीं येईल काय? कधीं यावयाची नाहीं. तद्वत् ऋतध्वजाला त्या राक्षसांचा पराभव करणें कांहीं कठिण नाहीं. तर सूर्यकुलभूषणा, या मायामोहानें असा फसून जाऊं नको. तुझ्या पुत्राच्या ठिकाणीं जें क्षत्रिय तेज आहे तें तुला दिसत नाहीं. हा तुझा दोष नाहीं. हा मायेचाच दोष होय. पण जे दूरदृष्टि आहेत, सुज्ञ आहेत, त्यांच्या मायामोहाचें पटल दूर करण्याला फार प्रयास नकोत."

**गालव** मुनीचें वरील भाषण जरी सत्य होतें तरी तें राजाला कसें आवडावें? जसजसा मुनि बोलत चालला तसा त्याचा एकेक शब्द राजाच्या हृदयाला बाणाच्या आग्राप्रमाणें घरेंच पाडीत चालला. शेवटीं राजाला मोठा गहिंवर येऊन तो म्हणूं लागला, " हाय हाय! मी केवढा

तरी पातकी कीं, माझ्या म्हातारपणीं माझा व माझ्य लेंकराचा वियोग व्हावा ! ते राक्षस म्हणजे केवढे बळवान केवढे क्रूर, त्यापुढें माझ्या सुकुमार पाडसानें काय टिका धरावा ! मी जीवंत असतां व माझ्या हातापायांत शक्ति असतां, मी घरीं बसून, माझ्या लाडक्यास शत्रूंवर पाठवूं काय त्याला धडधडीत डोळ्यां देखत मृत्युमुखांत आपल्याच हातानें कसा लोटूं ! माझ्यापेक्षां मग कोणी तरी जास्ती क्रूर, निर्दय, अधम बाप या जगांत सांपडेल काय ? माझें केवढें दुर्दैव कीं मजवर असा प्रसंग यावा ! हे महामुने, तुमची अवज्ञा करण्याचें मला अगदीं धैर्य नाहीं; मग तशी इच्छा कोठून असेल? माझी आपल्याला हात जोडून इतकीच विनंति आहे कीं, मी हा देह व ज्या ज्या पदार्थांवर माझें वर्चस्व आहे अशी प्रत्येक वस्तु सर्व आपल्याला अर्पण क रितों. सांगाल ती आज्ञा पाळण्यास हा दास जवळ सिद्ध आहे. पण माझ्या बाळाला आपण नेऊं नये. मला म्हाता रपणीं तोच माझा काय तो आश्रा आहे, तोच विसावा आहे. त्याच्या वांचून मी बाकीच्या गोष्टी घेऊन काय करूं? नको! नको! त्याला नेण्याची गोष्ट आपण काढूं नका! मी आपल्या पायांवर डोकें ठेवतों. दासाची एवढी प्रार्थना मान्य करावींच आपला यज्ञ सुरक्षित सिद्धीस नेण्याला मी स्वतः तुमचे बरोबर येण्यास तयार आहे."

राजाची अशी दीनावस्था व आक्रोश पाहून सर्वां मोठें वाईट वाटलें व **गालव** मुनीस तर त्याची फार काक ळूत आली. पण उपयोग काय ? जी गोष्ट ईश्वरी संके तानेंच ठरली होती तिला कोणाच्यानें प्रतिबंध करवणा आहे ? तेव्हां सर्वांनीं मिळून राजाची समजूत घालून सांत्व

नाचा यत्न माडला. इतक्यांत ही बातमी राजपुत्र **ऋतध्वजा**पर्यंत पोंचून तोही तेथें आला. आपल्यास यज्ञसंरक्षणार्थ **गालव**मुनि नेणार आहेत हें ऐकून त्याला फार आनंद झाला. कारण, आपला पराक्रम दाखविण्याचा हा समय आला आहे. आपली बाललीला संपून, यश संपादन करण्याचा प्रसंग आला, हें आपलें सुदैव होय, असें त्याला वाटलें.

त्याला पाहून राजाला मोठेंच रडें आलें. परंतु राजपुत्रानें त्याला आलिंगन देऊन धैर्यानें भाषण केलें, "तात! तुम्ही



कष्टी कां होतां? मी आपल्यास कांहीं सांगावें असा माझा अधिकार नाहीं; व आपण सर्व जाणतच आहां. ऋषि महाराज मजवर अनुग्रह करण्यासाठींच आज आले आहेत असें मी समजतों. पहा, कोणाच्याही बुद्धीची परीक्षा वेळेवर होत असते. तर आपलें शौर्य दाखविण्याची ही संधि मला अनायासें आली असून ती व्यर्थ दवडणें मला बरें दिसत नाहीं. जो खरा शूर आहे, त्याला प्राण हे केवळ तृणवत् आहेत. तर आपण कृपा करून **गालव**मुनीमहाराजांच्या मागण्यास

रुकार द्यावा. मी लौकरच त्या दुष्टांचा नाश करून व यज्ञाची सांगता करून आपल्या पुण्याईनें व ईश्वराच्या कृपेनें परत येईन. आपण कांहींएक चिंता करूं नये. आपण जाईन म्हणून म्हणतां, पण तें मला उक्त दिसत नाहीं. आपली वृद्धावस्था झाली आहे तेव्हां युद्धकर्म करणें हा आतां माझाच वाटा आहे."

हें राजपुत्राचें धैर्याचें व उमेदीचें भाषण राजाच्या कानाला अमृताप्रमाणें गोड लागलें व त्याचें मन जरासें शांत झालें. शेवटीं राजपुत्राच्या विनवणीवरून व **गालवऋषीचे** आग्रहावरून राजाचें मन वळलें. त्यास प्रकृतिजनांचें ( प्रधानादिकांचें ) ही अनुमत पडून राजानें पुत्राला ऋषीबरोबर जाण्याला रुकार दिला, व **गालवऋषीनें** जो प्रासादिक घोडा आणून बाहेर उभा केला होता, त्याच्यावर अलंकार जीन वगैरे साज घालून त्याला पुढें आणण्याची मोतद्दारास आज्ञा केली.

त्या **कुवलयाश्वावर** अलंकार व सामान चढविल्याव तो फारच शोभूं लागला. अगोदरच देवलोकींचा घोड असल्यामुळें तो कांहीं अलौकिक तेजानें युक्त होता. त्यां आणखी अलंकारांची भर, व युद्धोपयोगी सामान अंगाव पडल्यामुळें, तो केवळ **सूर्याच्या उच्चैःश्रव्याप्रमाणें** दि लागला. त्याला पाहून सर्व लोकांस मोठें कौतुक वाटलें

**ऋतध्वज** राजपुत्र ऋषीबरोबर जाणार ही वार्ता लागली च सर्व नगरांत पसरली. तेव्हां सर्व लोकांस मोठें वाई वाटलें. परंतु राजाची व स्वतः राजपुत्राची धर्मरक्षणाविषयं किती तत्परता आहे हें लक्षांत आणून ते त्या दोघांची स्तुति करूं लागले. तसेंच राजपुत्राचें धैर्य, शौर्य, व सौजन्य इत्यादि गुण पाहून लोकांस मोठी उमेद आली. यां

राजपुत्राचा कांहीं दिवस वियोग होणार एवढीच काय ती गोष्ट त्यांस दुःखदायक वाटली. प्रस्थानाच्या समयीं सर्व प्रजाजनांनीं मंगळ करून ‘राजपुत्राचा विजय असो’ असे आशीर्वाद दिले.

ऋतध्वजानेंही आपला युद्धोपयोगीं पोशाख केला; व धनुष्यबाण पाठीवर लटकावून तो अंतर्गृहांत मातृजनांचा व आप्तजनांचा निरोप व आशीर्वाद घेण्यासाठीं गेला. अगोदरच स्त्रीजनांचें हृदय कोमल, त्यांतही आणखी राजपुत्राच्या प्रेमळ गुणांनीं तो सर्वांस फार प्रिय झाला असल्यामुळें त्याचा वियोग त्यांस फार दुःसह वाटूं लागला. आणखी यज्ञरक्षणाचें व राक्षसांबरोबर युद्ध करावयाचें काम मोठें कठिण असल्यामुळें सर्वांस भय उत्पन्न झालें. परंतु राजपुत्रानें आपल्या मधुर व उमेदीच्या भाषणांनीं त्यांची समजूत घातली. तेव्हां त्यांनीं आपले डोळ्यांतील अश्रु, अपशकून होऊं नये या भीतीनें, आंतले आंतच दाबून धरले, व त्यावेळीं स्पष्ट बोलतां न आल्यामुळें केवळ हातानेंच “तुझें कल्याण असो” असें सुचविलें.

अंतःपुरांतून सुटका झाल्यावर ऋतध्वज आपल्या पित्याच्या अभिवंदनासाठीं पुन्हा सभेमध्यें गेला. राजानें जरी त्याच्या जाण्याला रुकार दिला होता तरी एकंदरींत मनांतून त्याला उत्साह वाटत नव्हताच. यामुळें तो आपल्या सिंहासनावर निमुटपणें बसला होता. त्याचे पायांवर ऋतध्वजानें आपलें मस्तक ठेविलें. त्याबरोबर त्याला उठवून राजानें त्याच्या पाठीवरून हात फिरविला व म्हणाला, “बाळा ! जा तुझा विजय असो. नीट जपून जा. ते दुष्ट राक्षस मोठे क्रूर व मायावी आहेत. ते अनेक रूपें

घेऊन, अनेक उपायांनीं तुजवर प्रयोग करतील. ते व्हां सावधगिरी ठेव व त्यांचा प्रतिकार कर. तसेच ते बळवान आहेत, यास्तव त्यांच्याशीं युद्ध करावयाचें तेंही दक्षतेनेंच केलें पाहिजे. मंत्राचे अभिचार ( प्रयोग ) युद्धकलेला अनुसरून युक्तीनेंच करीत जा. यापेक्षां जा- स्ती काय सांगावें ? तूं शूर व कुशळच आहेस. परंतु माझी माया वेडी म्हणून सांगतों. हो हो. पण एक गोष्ट सांगणें अगदींच राहिली. ऋषींचें संरक्षण हें आपलें कर्त- व्यकर्म व त्यांचा संतोष हें आपले मोठें धन. यास्तव त्यांशीं नम्रपणें वागून, त्यांच्या प्रीतीस पात्र हो. त्यांतच आपलें कल्याण आहे. त्याप्रमाणें वागून, विजयी होऊन लौकरच या तुझ्या पित्याला आनंदविण्यासाठीं परत ये, असें मीं इच्छितों."

असें पित्याचें बोलणें ऐकून राजपुत्र म्हणतो, " होय, मी आपल्या सांगण्याप्रमाणें वागेन. आपण त्याबद्दल कांहींएक काळजी करूं नये. " असें धैर्यानें पित्यास आश्वासन देऊन राजपुत्रानें नमस्कार केला, व सभेंत जमलेल्या प्रकृतिजनां नाही त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें नमस्कार, सलाम वगैरे करून, त्यांचा निरोप घेतला. अशा रीतीनें तो ह्या सजविलेल्या **कुवलयाश्वावर** स्वार होऊन चालला. राजा प्रकृतिजन व नागरिक लोक त्याला पोंचविण्यासाठीं नगराचे सीमेपर्यंत गेले; व तेथें फिरून नमस्कार वगैरे होऊन गालव ऋषि सहित राजपुत्र पुढें चालूं लागला.

---

## प्रकरण दुसरें.

राजपुत्रास शिकारीचा वगैरे नाद पूर्वीपासून फार असे यामुळें त्यानें यापूर्वी वनोपवनें जरी बहुत पाहिलीं

होती तथापि त्यावेळीं त्याजबरोबर शिपाई, प्यादे, रानधरणारे व बरोबरीचे इतर संवगडे यांची गर्दी असे. त्यामुळें सृष्टीचें भव्य स्वरूप जसें मनांत भरावें तसें भरण्याला मार्ग नव्हता. पण या वेळीं त्याजबरोबर सोबतीला फक्त एक गालवमुनि




मात्र होते, दुसरें कोणी नव्हतें, व त्यांची वाटही घोर अरण्यांतून चालली होती. त्यामुळें साहजिकपणें त्याचें मन सृष्टीसौंदर्याकडे वेधलें. मोठमोठ्या दाट राया, त्यांत अनेक वर्षांचें वाढलेले गगनचुंबित वृक्ष, त्याचप्रमाणें त्यांस गुरफटलेल्या वेली, व त्यांचे पल्लव एकांत एक अडकून राहिले असल्यामुळें त्यांतून सूर्यकिरणांचा बाराही महिने प्रवेश होण्याचा संभव नाहीं, अशा अटव्य रानांतून चालताना मानवी प्राण्याच्या मनाची काय विलक्षण स्थिति होते याचा त्याला पूर्ण अनुभव आला. कित्येक वेळां त्यांस दरी खोऱ्यांतून व नदीकाठांनीं जावें लागलें. मोठमोठाले एकापेक्षां एक उंच पर्वत, ज्यांचे कडे जागोजाग तुटलेले आहेत, व त्यावरून झऱ्यांचें पाणी धबधब पडत आहे; असे कितीएक पर्वत जागोजाग त्यांच्या दृष्टीस पडत. कांहीं ठिकाणीं दऱ्या इतक्या खोल दिसाव्या कीं, खालीं नजर जातांच डोळे फिरावे, व कांहीं ठिकाणीं कड्याची उंची नजर पोंचत नाहीं इतकी असावी. कोठें कोठें डोंगराचा कांहीं भाग वृक्षरहित ओसाड असा व अंतरिक्षांत पक्षांचें कळप उडताना केव्हां केव्हां दिसावे! अशा

प्रकारचें तेथील वनश्रीचें सुंदर व भव्य स्वरूप पाहून राजपुत्राचें मन प्रफुल्लित झालें, व त्यास हुशारी आली. वाटेनें जे जे प्रदेश त्यांस लागले त्यांचीं नावें व त्या संबंधाची माहिती गालवमुनी त्यास सांगत असत त्यापासून त्यास उत्तम करमणूक झाली. एकंदरींत जसा एकादा गोठ्यांत पाळलेला गाईचा पाडस असावा व त्यास प्रथमच रानांत स्वच्छंदानें चरावयास सोडले असतां त्यास आनंद होऊन तो जसा वागडूं लागतो, त्याप्रमाणें त्या राजपुत्रास या प्रवासामध्यें मोकळेपणा मिळाल्यामुळें त्यास हर्ष झाला.

अशा प्रकारें आनंदानें मार्ग क्रमीत असतां, ज्या ठिकाणीं गालवमुनीचा आश्रम होता तेथें ते दोघे येऊन पोंचले. तों तेथें ऋषिसमुदाय त्यांची वाटच पहात बसलेला होता. त्यांस एक सारखी राक्षसांकडून पीडा होत असल्यामुळें ते अगदीं जरजर व त्रस्त झाले होते. त्यांनीं राजकुमारास पाहतांच आपला मोठा भाग्योदय झाला असें वाटून सर्वांस मोठा आनंद झाला. सर्वांनीं आपापल्यापरी त्या पाहुण्याचें कुशल पुसून, त्याला योग्य असा आदरसत्कार दिला. चातकास जसें मेघदर्शन, चकोरास जसा बालचंद्राच्या किरणांचा वर्षाव, तृषितास निर्झरोदकाचा लाभ, किंवा क्षुधितापुढें पंच पक्वान्नांनीं भरलेले ताट मिळालें असतां जसा आनंद होतो, याहीपेक्षां राजपुत्र समागमाचा त्या ऋषिगणास जास्त आनंद वाटला.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर गालवऋषीनें जमलेल्या ऋषिसमुदायाच्या अनुमतानें नव्या यज्ञाची तयारी चालविली. कारण आतां त्यास कोणत्याही तऱ्हेचा अडथळा म्हणून उरला नाहीं. सिद्धता झाल्याबरोबर यज्ञास आरंभ झाला. राज-

पुत्रानें सर्वदा सावध राहून, चाप बाण सज्ज करून तयार असावें. ऋषींनीं आपल्या कामांत निमग्न असावें. ऋषिबटूंनीं कंदमुळें, दर्भ समिधा वगैरे आणून द्यावा. अशी सर्वांकडून अनुकूलता झाल्यामुळें यज्ञ यथासांग निर्विघ्न चालला होता.



असें होतां होतां, समाप्तीचा समय जवळ आला; तेव्हां सर्व ऋषिसमुदायास महदाश्चर्य वाटलें व मोठा संतोषही झाला. ते सर्वजण राजपुत्राची स्तुति करूं लागले. "अहो! केवढा हा या राजपुत्राचा प्रभाव कीं याच्या सान्निध्यानेंच आमचीं सगळीं कृत्यें सुरळीत चालूं लागलीं. शत्रूंस याच्या प्रतापाचा केवढा धाक! मग प्रत्यक्ष चापबाणांशींच गांठ पडली तर शत्रूंनीं पराभव पावून प्राणरक्षणार्थ आश्रय शोधावा यांत काय आश्चर्य! तेव्हां असा हा राजपुत्र आमचा रक्षणकर्ता मिळाला हें आमचें महद्भाग्य होय! परमेश्वर याला दीर्घायुषि करो." असा आशीर्वाद त्यांनीं त्यास दिला.

एके दिवशीं दिनमणि नुकताच अस्तास गेला आहे, रात्रीची छाया पडत चालली आहे, पश्चिमेच्या बाजूनें

चंद्रबिंब हळू हळू उदय पावत आहे; तें पर्वतशिखराच्या आड असल्यामुळें पहाणारास असें वाटे कीं, त्या पर्वतराजानें आपल्या डोक्यावर हें सुरेख भूषण घातलें आहे, किंवा येथील ऋषींस पीडा देणारा जो राक्षसगण तो पळून आल्यावर त्यास आपल्या गुहोदरामध्यें आश्रय दिल्यामुळें कदाचित् ऋतध्वजास कोप येऊन हा आमचा इंद्राप्रमाणें पक्षच्छेद करील या भीतीस्तव त्याचें सांत्वन करण्यासाठींच या पर्वतानें हें महारत्न उपायना दाखल पुढें केलें आहे किंवा काय असा भास होत होता. पुढें कांहीं वेळानें चंद्राचा स्वच्छ प्रकाश पडल्यामुळें, नवविकासित पुष्पगुच्छ व वसुंधरेला शोभा देणारे दुसरे अनेक पदार्थ स्पष्ट दिसूं लागले; त्यामुळें प्रेक्षकांची नजर जिकडे जाई तिकडे चित्रविचित्र शोभा दृष्टी पडून त्यास फार आल्हाद होई. नुकताच पक्षांचा किलकिलाट बंद होत चालला होता, व आश्रमांतील गाई हरणें वगैरे जनावरेंही चारा खाऊन संतुष्ट झाल्यामुळें रवंथ करीत स्वस्थ बसलीं होतीं. ऋषिमंडळी आपले सायंकालीन होमहवनादि विधी आटोपून उपहार केल्यावर विश्रांतीसाठीं राजपुत्र ऋतध्वज नुकताच उपहार उरकून दर्भाचें आसन टाकून ज्या ठिकाणीं बसला होता तेथें आली, व त्यांच्या राजपुत्राशीं कांहीं गोष्टी चालल्या आहेत, सर्वत्र सामसूम असून, मधून मधून वायूची मंदमंद झुळूक येत आहे, अशा समयास बऱ्याच अंतरावर एकाएकी मोठी सिंहासारखी गर्जना ऐकूं आली. चोहोंकडे शांतता असल्यामुळें, वायूची जी मंद लाट येत होती तिच्यावर तरंगत तरंगत येऊन ह्या गर्जनेनें एके क्षणांत तो सर्व प्रदेश भरून टाकला. सर्व ऋषिसमुदाय कांहीं आश्चर्यानें व कांहीं

भयानें चकित होऊन एकमेकांच्या तोंडाकडे पाहत स्तब्ध राहिला. इतक्यांत हा सिंहनाद बंद होऊन पुनः चोहोंकडे शांत झालें. त्या बरोबर मोठ्या नौबदीच्या नादानें कान किटल्यावर ती वाजण्याची बंद झाली, म्हणजे कानांना जशी विश्रांति मिळते, तशीच अवस्था त्यावेळीं झाली. परंतु असा वेळ फार गेला नाहीं तों फिरून एका मागून एक असे दुसरेच सूर ऐकूं येऊं लागले. वाघ, लांडगे, डुकर, रानम्हशी, कोल्हे इत्यादि अनेक प्रकारच्या श्वापदांचे स्वर एकत्र होऊन एकच गोंधळलेला आवाज कानीं आला व त्यानें फिरून दशदिशा भरून गेल्या. या वेळीं मात्र ऋषिसमुदायास भय उत्पन्न झालें असें वाटूं लागलें, व त्यांनीं राजपुत्रांस सावध राहण्याविषयीं व आपलें रक्षण करण्याविषयीं सुचविलें. आश्रमांतील मनुष्यांची तर अगदीं त्रेधा उडून गेली, कोणी दडून बसले, कोणी राजपुत्रापाशीं आश्रयार्थ आले, जे कोणी जरा धाडसाचे होते ते सोडगे घेऊन धैर्यानें पुढें काय होतें काय नाहीं ह्याची वाट पहात उभे राहिले. अशा तऱ्हेनें जिकडे तिकडे गडबड उडून गेल्यानें कोणाच्यानें तोंडांतून एक शब्दही काढवेना. अशा स्थितींत त्यांना पाहून राजपुत्रानें सर्वांस न घाबरण्याविषयीं सांगितलें; व स्वतः धनुष्य सज्ज करून, त्याला बाण लावून गालवमुनि काय सांगत आहेत तिकडे लक्ष ठेऊन आश्चर्यचकित होऊन उभा राहिला.


त्यास **गालव** म्हणतो, "बा **ऋतध्वज** राजपुत्रा! तुला या वेळाचें आश्चर्य वाटूं देऊं नको. अरे, असे प्रसंग आमच्येवर वारंवार येत असतात. या दुष्ट दानवांचीं कृत्रिमें व त्यांच्या युक्त्या फार विचित्र आहेत. जेव्हां सवड सापडेल तेव्हां ते स्वतःच्या स्वरूपानें येऊन लुटून, आ-

श्रमांचा नाश करतात. नाहीं तर ते अनेक प्रकारचीं रूपें घेऊन, निर्भयपणें आश्रमांत येऊन आश्रमवासी जनास फसवितात. ते जनावरांचीं रूपें घेतात व कोणाच्या लक्षांत न येऊं देतां आश्रमचा आश्रम उध्वस्त करतात. आतांच जी ओरड झाली ही तरी अशीच त्यांची कांहीं युक्ति आहे. अशी ओरड ते मनुष्यांस भय उत्पन्न करण्यासाठीं प्रथम करतात. कधीं कधीं ते सिंहाचें, कधी मत्त हत्तीचें, कधीं डुकराचें अशीं नाना प्रकारचीं भयंकर रूपें घेतात व कधीं वानर, हरिण अशा अगदीं गरीब प्राण्यांचीं रूपें धारण करून, विश्वासानें आश्रमांत संचार करतात, व पर्णकुटिकांस अवचित आग लावितात, किंवा त्यांतील पदार्थांचा नाश करतात. होमहवनें नीट होऊं देत नाहींत. ध्यानयोग स्वस्थ चित्तानें पूर्ण साधूं देत नाहींत. यज्ञास आरंभ झालेला त्यांच्या समजुतींत आला असतां ते त्याचा उच्छेद केल्याशिवाय कधीं स्वस्थ रहावयाचे नाहींत. याशिवाय ते जीं विटंबना करितात त्याचें वर्णनही करतां येत नाहीं. त्यांचें आम्हाला मोठें भय वाटतें. हल्लीं जो गलबला व जी ओरडाओरड ऐकूं येत आहे ती असलीच कांहीं तरी या दानवांच्या कृत्रिमाची आहे असें मला निश्चयानें वाटतें. ”

यावर राजपुत्र साशंक मुद्रेनें म्हणाला, “ असें काय ? आजपर्यंत अशा गोष्टी मी ऐकत मात्र होतों. आतां त्या स्वतः पाहण्यास सांपडतील. ” असें म्हणून तो सावधगिरीनें पुढील कृत्यें पहात उभा राहिला. इतक्यांत डुकराच्या डुरकण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो जिकडून आला तिकडे राजपुत्र व गालव हे पाहतात तों एक मोठा मदोन्मत्त कैसाळ डुकर ते उभे होते त्याच जागेकडे रोख धरून


आवेशानें येत आहे असें त्यांच्या नजरेस पडलें. त्या बरोबर **गालवमुनी** ओरडून राजपुत्रास म्हणाला, "**ऋतध्वजा!** संभाळ, संभाळ बरें! पहा! हा डुकर येत आहे हा सामान्य डुकरापेक्षीं नाहीं. हा मूळचा राक्षस **तालकेतु** म्हणून मी सांगितला तोच आहे. तर याला पुढें येऊं देऊं नको. आला असतां फार नाश करील. आणि कदाचित् याच्या मागून दुसरेही याचे सहचारी येतील. यास्तव हा एकटा पुढें येत आहे तोंच याचा नाश करावा हें उत्तम."

असें **गालवमुनी** बोलत आहे तों वराहरूपी राक्षस बाणासारखा तुटून धांवत धांवत अगदीं नजीक आला. राजपुत्रानेंही विलंब न लावतां त्यावर रोखून एक बाण सोडला; तो नेमका त्या वराहाच्या उरांतच जाऊन खुसपला. त्या वेदनेनें तो जमिनीवर तर पडलाच, परंतु ज्या वेगानें तो येत होता त्या वेगासारखा दोन तीन कदम तसाच धडपडत पुढें आला व त्यानें मोठ्यानें डुरकणी फोडिली; आणि **ऋतध्वज** दुसरा बाण सोडणार इतक्यांत, तो डुकर सांवरून उभा राहिला आणि पुढें येण्याचें सोडून मागें तोंड करून पळून जाऊं लागला. ही त्याची कृति पाहून ऋषींस मोठा आनंद व आश्चर्य वाटलें. "शाबास! **ऋतध्वजा** शाबास!" असा सर्वांनीं मोठा जयघोष केला. **गालव** मुनीनें राजपुत्रास घाईनें जवळ येऊन सांगितलें कीं "आतां त्वरा करून या दुष्टाचा पाठलाग कर." त्याबरोबर, राज-



**कुवलयाश्व** हा कांहीं सामान्य घोड्यांपैकीं नव्हे; तो जिकडे नेईल तिकडे कधीं अडचण किंवा आडमार्ग असणार नाहीं. यामुळें खालीं जाण्याचा जो भास होई त्यानें छाती भरून येई तेवढेंच काय तें, पण तो मनांत त्रिलकुल भ्याला नाहीं.

असा बराच वेळ गेल्यावर, त्यास एकदम उजेड दिसूं लागला, त्यामध्यें सर्व वस्तु टकटकांत स्पष्ट व सतेज अशा दिसत होत्या. बराच वेळ दृष्टि असून नसल्यासारखी झाल्यामुळें जो कंटाळा आला होता तो तर गेलाच; पण उलटें त्याच्या डोळ्यांना जास्त सुख झालें. उजेडांत आल्यावर तो घोडा थांबला. इतक्या वेळच्या प्रवासानें राजपुत्रही बराच थकून गेला होता. म्हणून जरा उतरून विश्रांति घ्यावी असें त्यानें मनांत आणलें. आपण आलों आहों कोठें व जावें कोणिकडे याचा कांहींच पत्ता त्यास लागेना. पहिल्यानें त्यानें चोहोंकडे पाहिलें, तों त्यास तेथें कोणीही मनुष्य किंवा मनुष्य वस्तीचीं चिन्हें दिसलीं नाहींत; चहोंफेर अरण्य लागलेलें. नंतर त्यानें लांबवर दृष्टि देऊन पाहिलें तंव एका जुनाट वाड्याचें गोपुर त्याच्या दृष्टीस पडलें. पण तिकडे जावें कसें? कारण मार्ग किंवा पाऊल वाटही लागलेली





कोठें नव्हती. मग तसाच वेलीच्या गुंतागुंतींतून व झाडांचीं आडवीं आलेलीं झुडपें एकीकडे सारीत सारीत तो जेमतेम त्या वाड्याच्या शिखरावर दृष्टि ठेवून चालला. जेव्हां वाड्याच्या अगदीं जवळ आला तेव्हां तो वाडाही अगदीं शून्य दिसला; असे जरी होतें तरी आंतून तो झाडून सारवून नीटनेटका केलेला होता. त्याच्या सभोंवतालच्या जागेसही बागेचा आकार दिलेला व तीही नीटनेटकी केलेली होती. यावरून तेथें वसती असावी असा त्याचा तर्क झाला. पण त्याला तेथें बराच वेळ झाला असतांही कोणी त्याची विचारपूस वगैरे करण्याला आलें नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या भात्याला अडकविलेला शंख होता तो मोठ्यानें वाजविला. तरीही कांहीं दाद लागेना. बरें, वाड्यांत जावें तर त्याचे दरवाजे बंद केलेले. या गोष्टीचा त्याला मोठा चमत्कार वाटला. आपण आलों कोठें, आहों कोठें व हें आहे तरी काय, याचा कांहींच उल-गडा त्यास होईना. एवढें मोठें राजमंदीर पण कोणाचाही वास नसावा किंवा असलाच तर कोणीही परक्या मनुष्याची वास्तपुस्त करूं नये, हें आश्चर्यकारक नव्हे तर काय म्हणावें! यावेळीं तो फार थकून गेला होता; क्षुधेनें व तृषेनें त्याला अगदीं घेरून टाकलें होतें. पण ती शमवि-ण्याचा उपाय त्यास कांहींच सुचेना. न सुचून तो चिंताक्रांत होऊन गेला.

ज्यावेळीं तो आश्रमांतून निघाला तेव्हां ओपींचा समय असून सुंदर चांदणें होतें, पुढें तो फाटलेल्या भेगेंतून खालीं उतरत असतां केवळ अमावस्येच्या रात्रीपेक्षांही काळा किट्ट अंधार लागला. त्यानंतर त्याच्या घोड्याचे पाय पुनः जमिनीला लागून, तो भर दोन प्रहरच्या उन्हा-

मध्यें आला. तेव्हां ह्या सर्व गोष्टींचा त्याला मोठा अचंबा वाटला. कुवलयाश्वही थकलेला व खाण्यापिण्यानें आक्रांत झालेला दिसत होता. शेवटीं इकडे तिकडे फिरून, पहावें कांहीं निर्वाहाचा उपाय मिळाला तर, या हेतूनें तो घोड्यावरून उतरला. घोड्याला त्यानें एका झाडाखालीं बांधलें व पलीकडलें कांहीं गवत उपटून त्याच्या पुढें टाकलें. व क्षणभर आतां करावें काय अशा साशंक मुद्रेनें इकडे तिकडे पहात आहे तों तिकडून कोणी रूपवती स्त्री आपल्याकडे येत आहे असें त्यानें पाहिलें; तेणेंकरून त्याच्या जीवाला जरा समाधान वाटलें. आणि आतां हा तिला कांहीं विचारणार तों ती त्याच्या जवळ येऊन व त्याच्या विचारण्याचा भाव ओळखून, कांहीं एक न बोलतां आपल्या पाठीमागून येण्याविषयीं त्याला तिनें सूचना केली, व स्वतः त्या राजवाड्याच्या दरवाज्याशीं गेली तों तो पटकन उघडला. त्याबरोबर ऋतध्वज राजपुत्रास लौकर येण्याविषयीं तिनें खुणावलें. याचें पूर्वीं पेक्षांही त्याला जास्त आश्चर्य वाटलें. तथापि पुढें काय प्रकार होतो हें पहावें म्हणून तो तसाच तिच्या मागोमाग आंत शिरला. त्याबरोबर तो दरवाजा फिरून बंद झाला.

राजपुत्र आंत गेला, तो त्या स्त्रीच्या मागोमाग एका सुंदर संगमरवरी दगडाच्या पायऱ्यांच्या जिन्यावरून एका विस्तृत दालनांत गेला. त्या ठिकाणचा भव्यपणा व सौंदर्य पाहून तो क्षणभर चकित झाला. तेथील एकेक वस्तु पहावी तों ती मोठ्या किमतीची व विलास पुरविणारी अशी पाहून तो अगदीं गोंधळून गेला. अशा चमत्कारिक गोंधळांत तो आहे तों ती त्याच्यापुढें आलेली स्त्री त्यास हाक मारून म्हणते

" महाभाग ! असे आपण पुढें यावें." या तिच्या शब्दां बरोबर त्याची दृष्टि समोरच असलेल्या एका पलंगाकडे गेली, व त्यावर निजलेली दुसरी एक तरुण स्त्री होती तिची व याची एक दृष्टि झाली. क्षणभर याचें मन त्या मंदिरांतील वस्तुसमुदाय पाहण्यांत जें गोंधळलें होतें, त्यांतून भानावर आल्यासारखें झालें व वीज लवल्याप्रमाणें भास होऊन पुनः गोंधळांत शिरलें. त्याची पुढें येण्याची इच्छा होती पण त्याचे पायच त्याला उचलतना. अशी त्याची गोंधळलेली स्थिति पाहून त्या पहिल्या स्त्रीनें बोलण्यास आरंभ केला.

ती ह्मणाली"हे महाभाग! आपल्यास कोणतेही प्रकारची शंका घेण्याचें कारण नाहीं. आपण निर्धास्त यावें. भूत, पिशाच किंवा राक्षसयोनीपैकीं आम्ही नसून उत्तम व प्रसिद्ध अशा गंधर्व कुळांत आमचा जन्म झालेला आहे. आपल्या चर्येवरून आपणही क्षत्रिय असून महाशूर आहां असें मी समजतें. या लोकीं आपलें येणें कशा अर्थानें झालें असावें व त्यांतून आमच्या या वाड्याकडे येण्याचा आपल्यास कसा मार्ग सापडला याचेंच मला आश्चर्य वाटतें. पण ज्या अर्थी आपण येथें अवचित आला आहां त्या अर्थी या आमच्या सखीला संकटसागरांतून सोडविण्यासाठींच देवानें तुम्हाला इकडे पाठविलें असा माझे मनाचा निश्चय होतो. एरवीं आपलें दर्शन दुर्लभ आहे."

असें तिचें भाषण चाललें असतां, राजपुत्राचें लक्ष त्या निजलेल्या तरुणीकडेच लागलें होतें तें तेथून निघेना, व त्याचा पायही जागचा हालेना. तो आपल्या मनांत म्हणूं लागला, "माझी अशी स्थिति कशानें झाली ? याचें कारण काय असावें ? आजवर जे विकार मला कधीं भासले नाहींत

ते आज कां उत्पन्न होत आहेत ? तथापि त्या तरुण स्त्रीला पाहून माझ्या मनाला मोठा उत्साह वाटत आहे! त्यापेक्षां ही स्त्री धन्य होय !

श्लोक. ( इंद्रवज्रा ).

ही कोण कोठील असे, कळेना । मच्चित्त ही पासुनिया ढळेना ॥
पाहुन या रम्य हिच्या मुखातें । उत्साह लोटे मम मानसातें ॥ १ ॥
शोभे हिची कृष्ण विशाल वेणी । तैशीं शिरीं गुंफिलि दिव्य लेणीं ॥
पाहुन हीच्या शुभ आननातें । आनंद भेटे मम लोचनातें ॥ २ ॥

असा विचार मनांत करीत करीत मोठ्या श्रमानें तो पुढें आला. त्यामुळें त्या निजलेल्या स्त्रियेला लाज वाटून, तिच्या तोंडावर सात्विक भाव उत्पन्न झाले. ती उठून पलंगाखालीं उ-



तरली, जवळच जें आसन होतें तें तिनें पुढें केलें व आपण स्वतः पलंगाच्या एका बाजूला उभी राहली. या वेळची तिची चालचर्या राजपुत्राच्या मनांत फारच भरली. तिची मृदु व नाजुक शरीरलतिका, गोरी व तेजस्वी अंगकांति, काळा सूक्ष्म व लांब केशकलाप, विशाळ व काळेभोर नेत्र, रुंद व तेजस्वी कपाळ, मृदु व टवटवीत गाल, पोंवळ्यांप्रमाणें लाल ओठ, उच्च व वर्तुल अशा पुष्टस्तनांनीं भरलेला उरोभाग, केळीच्या गाभ्याप्रमाणें सरळ व कांति-

युक्त पोटऱ्या, तिची निश्चल व प्रेमळ दृष्टि, चपळ व संभावितपणाची चालचलणूक इत्यादिकांनीं, राजपुत्राला मोह उत्पन्न झाला.आणि या स्त्रीची आपल्यास कशी प्राप्ति होईल याचें तो चिंतन करूं लागला. कारण म्हटलें आहे.

**श्लोक.** ( इंद्रवज्रा ).

चापल्यधारी कटिभाग जीचा । पायीं ध्वनी कोमल नूपुरांचा ॥
नाकीं चकाके नथ तीं तुऱ्याची । झाकी पडूनी वरल्या हिऱ्याची ॥ १ ॥
नेत्रा हरी सुंदर कांति जीची । वेणी करी भ्रांति भुजंगमाची ॥
नारी अशी पाहुन जो भुलेना । योगी तया कीं पशु कांन माना? ॥ २ ॥

परंतु **ऋतध्वज** हा यापेकीं एकाही वर्गांत खपण्यासारखा नसल्यामुळें त्याला सहजच तरुणपणाला उचित अशा कामविकारांनीं ग्रासलें यांत नवल नाहीं. शेवटीं विवेकानें भानावर येऊन, तो त्या स्त्रियांच्या समीप आला व त्याच्यापुढें केलेल्या आसनावर बसून बोलूं लागला, “हे स्वर्गीय स्त्रियानो! मी येथला एकंदर प्रकार पाहून अगदीं गोंधळून गेलों आहें. मी कोण आहें, कोठून आलों इत्यादि जाणण्याविषयीं आपल्यास इच्छा उत्पन्न होईल. यास्तव मी आपला वृत्तांत मग सांगेन. परंतु तुमच्यापेक्षां माझी इच्छा फार उत्कट आहे. कारण जो जो प्रकार एथें माझ्या नेत्रांस विषय झाला आहे त्यावरून मला कांहीं अलौकिकच नवल वाटत आहे. मी एका राक्षसाच्या मागें लागलों असतां वाट चुकून येथें आलों आहे. हे राक्षस मोठे मायावी असतात असें ऐकतों. त्यांस हवें तें रूप धरतां येतें. मायेचीं नगरें, मायेचे वाडे, मायेचीं जनावरें ते निर्माण करतात व शत्रूस फसवतात. यामुळें येथूनचाही तसाच प्रकार असावा, असा माझा तर्क होतो. तर तुम्ही कोण आहां? हा राजवाडा कोणाचा? येथें मनुष्यांची वस्ती कां नाहीं?

तुह्मी येथें कां ? व कशा आल्या ? तुमचा येथें उद्देश काय वगैरे वृत्तांत अगोदर निवेदन करा. तसेंच तुमच्या आतांच बोलण्यांत आलें कीं, ही तरुणी तुमची सखी असून कांहीं मोठ्या संकटांत आहे; व तिच्या संकटाचा मीं परिहार करावा; तर तें एवढें संकट कोणतें ? कारण ही सुंदर स्त्री इतकी तेजस्वी व टवटवीत आहे कीं, एखाद्या सुंदर कोमल फुलालाही सहज लाजवील. तथापि हिची मुखचर्या फिक्कट व गंभीर दिसत आहे. यावरून कांहीं मोठ्या घोरांत हिचें मन असावें असें अनुमान होतें. तर कृपा करून तें कोणतें व मी कसें परीहार करावें हा सर्व प्रकार सांगावा; आणि ह्या तुमच्या सखीलाही उभें राहून बहुत श्रम होतील, यास्तव बसण्यास सांगावें अशी माझी विनंती आहे."

असें भाषण ऐकून **कुंडला** म्हणाली, "महाभाग ! आपण फार थकलेले दिसत आहां, यासाठीं मी आपणास पाय धुण्याकरतां पाणी व कांहीं थोडा उपहार देतें त्याचें ग्रहण करावें. आपण शांत झाल्यावर आम्ही आपली हकीगत आपल्यास सांगूं."

नंतर कुंडलिकेनें स्वच्छ पाण्याचा एक कलश भरून आणला व एका ताटांत कांहीं खाण्याचे पदार्थ घालून तें त्याच्या पुढें ठेवलें.

---


## प्रकरण तिसरें.

मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें राजपुत्राची स्थिति पाहून व त्याचें भाषण श्रवण करून **कुंडलेला** आपल्या सखीच्या कल्याणाची बरीच आशा वाटूं लागली.

**ऋतध्वजाचा** उपहार संपल्यावर ती **मदालसेस** हाक मारून म्हणाली "ये **मदालसे** ! कांहीं लाजूं नको. ये एथें बैस ये. आणि या महाभागाच्या बोलण्याला मान दे. मीही ते विचारीत आहेत, ती तुझी हकीगत इत्थंभूत सांगतें." असें म्हणून, जिला जास्तच लाज उत्पन्न झाली आहे, अशा त्या सुकुमार तरुणीला आपल्या शेजारीं बसवून घेऊन ती सर्व वृत्तांत याप्रमाणें सांगू लागली.

'महाराज ! स्वर्गलोकीं **विश्वावसु** नांवाचा एक गंधर्वांचा राजा आहे. त्याचीच ही कनिष्ट कन्या. हिचें नांव **मदालसा**. कोणे एके समयीं ही आपल्या बागेंत क्रीडा करीत होती व मी हिचे जवळ नव्हतें. अशा वेळीं अकस्मात् **वज्रकेतु** नामक राक्षसाचा पुत्र **पातालकेतु** यानें अंधकाररूप माया निर्माण करून हिला हरण केलें. कांहीं वेळेनें मी येऊन पाहतें तों ही कोठेंही आढळेना. तेव्हां हिला कांहीं तरी अपघात झाला असें मला वाटलें. त्या सर्व बागेंत मी शोध केला. पण शोध लागणार कसा ? कारण तेथें कोणीच नव्हतें. पुढें काय करावें अशा विचारांत चिंतातुर होऊन उभी आहें तेव्हां माझ्या मनांत आलें कीं आतां राजवाड्यांत जाऊन कांहीं परिणाम नाहीं. कारण तेथें एकच हाहाकार होऊन जाईल, तिच्या माता पितरांस तर अनिवार शोक प्राप्त होईल, व स्वतः मलाही हिच्यावाचून करमणार नाहीं. आणि हेंही एक असो; पण ही बातमी तिकडे घेऊन जाण्याचें तरी आपल्याला कसें धैर्य व्हावें ? यापेक्षां मजवर वीज कोसळून मरण येईल तरीही फार बरें. पण पुढील ही अनर्थ-परंपरा आपल्याच्यानें सोसवणार नाहीं. तर यापे-

क्षां आपणही आतां घरीं न जातां हिच्या शोधार्थ बाहेर निघावें. जर करतां शोध लागलाच तर ठिकच आहे. नाहींतर प्राणत्याग करावा. असें म्हणून साधू, वैरागी, पशुपक्षी वगैरे जें कोणी भेटेल त्यांस हिचा शोध विचारावा. असें करतां करतां, अकस्मात् मला कामधेनूचें दर्शन झालें. मी मनोभावानें तिची पूजा केली व विचारलें "जे आई माते! तुझें दर्शन हाच माझी इच्छा पूर्ण



होण्याला शुभशकुन आहे असें मी समजतें, तर मजवर प्रसाद करून, माझी प्रियसखी **मदालसा** हिला कोणी हरण करून नेलें ती कोठें सांपडेल, व आम्हांस ती कशी प्राप्त होईल हें निवेदन कर."


'तेव्हां तिनें मला सांगितलें कीं, "**कुंडले**! तूं भिऊं नको. मी हा सर्व प्रकार जाणतें. तुझ्या सखीची तुला लौकरच भेट होईल. पाताललोकांमध्यें **पातालकेतु** व **तालकेतु** असे दोघे राक्षस **वज्रकेतु** नामक राक्षसराजाच्या पोटीं **शंकराच्या** वरानें उत्पन्न झाले आहेत. ते फार पराक्रमी व प्रबळ झाले असून हल्लीं सर्व पृथ्वीला पीडा देत आहेत. यांच्या पैकीं **पातालकेतु** हा स्वर्गलोकीं भ्रमण करीत असतां, या तुझ्या सखीला, ती आपल्या मंदिराच्या बागेमध्यें सखीसह क्रीडा करीत असतांना, अकस्मात् त्यानें

पाहिलें व मायामय अंधकार उत्पन्न करून, तिला पळवून नेलें. तिला त्यानें पाताललोकीं चंद्रकांत नामक नगरांत एकांत निर्जन स्थळीं, मोठ्या जीर्ण अशा वाड्यांत नेऊन ठेवलें आहे. त्याच्या मनांतून तिच्याशीं लग्न करावें असें आहे. यास्तव तुझ्या सखीचें बरें करावें असें तुझ्या मनांत वसत असलें तर तूं त्या ठिकाणीं जा व तिला संकटांतून सोडीव. आतां असें विचारशील कीं, मी काय उपाय करावा व तिला कसें सोडवावें? तर तोही मी तुला सांगतें. कदाचित् ती सुकुमारी या राक्षसाधमाच्या धाकानें प्राणत्याग करील. यासाठीं या राक्षसाच्याच हातीं पायीं पडून व त्याचा विश्वास जोडून तूं नित्य तिच्या सन्निध ऐस व हरएक पापापासून तिचें निवारण कर. तिला बंधमुक्त करण्याला तिचें पूर्वार्जित दुर्दैव संपतांच, कोणी एक राजपुत्र येईल. त्याची खूण अशी कीं, त्या तालकेतु व पाताळकेतु दानवाऽधमांच्या हातानें जेव्हां ब्राह्मणांच्या यज्ञाचा भंग होईल तेव्हां क्षत्रिय सूर्यकुळांत उत्पन्न झालेला राजपुत्र त्यांचा नाश करील. तो असा कीं, हे दानव वराहरूप धारण करून त्या यज्ञाचा विध्वंस करण्यास मायेनें यत्न करतील व तो राजपुत्र यज्ञाचें रक्षण करीत असतां, बाणानें त्यांस ताडन करून, त्यांचा पाटलाग करीत करीत त्यांच्या या नगरास येईल. त्यांच्या पैकीं एक तर बाणानें विव्हळ होऊन तत्काळ प्राण सोडील. परंतु दुसऱ्याशी याचें मोठें युद्ध होईल. व त्यांत तो राजपुत्र विजयी होईल. हाच राजपुत्र अशा प्रकारें त्या दानवांचा विध्वंस करून, तुझ्या सखीला सोडवील व तिला वरील. यांत किमपि अंतर व्हावयाचें नाहीं. हें तूं सत्य मान."

'अशी कामधेनूची वाणी ऐकून, मला विश्वास आला व कांहींसें समाधान वाटलें. नंतर त्या कामधेनूस नमस्कार करून व तिचा निरोप घेऊन, मी तत्काळ पाताळ लोकाचाच मार्ग धरला. तेथें गेल्यावर **पाताळकेतू**च्या नगराचा शोध करून, तेथें गेलें. मग तेथें मात्र मला माझ्या सखीचा कांहीं शोध लागला. कारण तेथें मला असें कळलें कीं, **पाताळकेतूनें** स्वर्गलोकांतून कोणीएक अप्सरा मायाबळानें पळवून आणली आहे खरी. व तिला त्यानें या ठिकाणीं एकीकडे कोणाचाही वारा न येई अशा निर्जन स्थळीं व बळकट अशा वाड्यामध्यें ठेवलें आहे. कसा?—हा प्रकार आपल्यास दिसतोच आहे. पण ती कोण कोठील वगैरे कोणालाच खबर नव्हती. तथापि त्यांणीं सांगितलेल्या खाणाखुणांवरून मी ताडलें कीं, ती हीच माझी सखी असावी; आणि तेंच अनुमान खरें झालें. पण त्याचवेळीं नागरिकांनीं जी आणखी एक बातमी मला सांगितली तेणेंकरून मात्र मला अत्यंत खेद उत्पन्न झाला. ती बातमी ही कीं, तो राक्षसपति हिच्याशीं लग्न करणार आहे व तें लौकरच होईल. त्यास जर ती संमति देईल तर ठीकच; नाहींतर बळजबरीनें तो आपले हेतु तडीस नेल्याशिवाय राहणार नाहीं, असा त्याचा निश्चय ठरला आहे. ही बातमी ऐकून जरी मला मोठी काळजी उत्पन्न झाली व माझ्या सखीला भेटण्याची जरी फार उत्कंठा झाली होती, तरी तिच्या कडे जावें कसें व ती भेटते कशी याची मोठी पंचाईत वा[ट] लागली. पण एक बरें होतें कीं, माझ्या सखीनें अ[द्या]प लग्नाला संमति दिली नव्हती व तोही तिची याबद्दल काकळ[ती]नच करीत होता. यामुळें हिच्या सुटकेचा कांहीं उपाय काढ[ण्या]

येईल, अशी मला आशा लागली. मात्र तो उपाय, त्या दुष्टानें तिच्यावर जबरदस्ती केली नाहीं, त्या पूर्वी झाला पाहिजे. नाहींतर एवढें कष्ट करून व शहाणपण लढवूनही सर्व व्यर्थ जाणार आहे. असें मनांत येऊन मी त्याच उद्योगास लागलें.

प्रथम मी हा वाडा कोठें आहे याचा तपास करून, त्याला



जाण्याला मार्ग सांपडेल कीं काय हें पाहिलें. तसेंच हिच्या अन्नपाण्याची वगैरे काय सोय आहे; जर कोणी तें तिला पोंचविण्याकरतां जात असतील तर त्यांच्या हातें निरोप पाठवावा किंवा स्वतः आपणही वेषांतरानें जावें अशा बुद्धीनें तीही चौकशी करून पाहिली. पण तो राक्षस मायावी आहे, व त्याची कदर मोठी जबर आहे यामुळें ते उपाय बहुतेक खुंटल्यासारखेच मला भासूं लागले. अशा विवंचनेंत मी कांहीं दिवस असतां मला एक युक्ति सुचली व तीच अखेरीस सिद्धीस गेल्यासारखी दिसत आहे. ती अशी कीं मी समक्ष त्या **पाताळकेतू**लाच भेटण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें भेटून त्याला म्हणालें, "महाराज! मी एक योगिनी आहे. तुमचें कांहीं कार्य करावयाचें आहे म्हणून

ऐकलें व माझ्याच्यानें होण्यासारखें आहे असें वाटलें म्हणून मी तुमचेकडे आलें आहें. मी असें ऐकलें कीं, आपण एक रूपवती अप्सरा आणली आहे व तिच्यावर आपलें फार मन बसलें आहे. तिच्याशीं लग्न करावें असाही आपला हेतु आहे. परंतु ती या गोष्टीला अनुमोदन देत नाहीं असें वाटतें."

'या प्रमाणें मी जों बोलत आहें तोंच तो धिक्कारयुक्त मुद्रेनें मोठें हास्य करून मला म्हणाला, "मग बोल, बोल, काय तुझें म्हणणें तें! तिला सोडून देऊन तुझ्याशीं लग्न लावूं कीं काय? असेंच तूं म्हणतेसना? मी त्याही गोष्टीचा पाहिजे तर विचार करीन!" हे तो शब्द अशा कांहीं तिरस्कारानें बोलला कीं मला त्याचा मोठा राग आला व भयही वाटलें. पण मला माझें कार्य साधावयाचें होतें म्हणून हिकडे कांहींच लक्ष न दिल्यासारखें करून म्हटलें, "राक्षसराज! माझें बोलणें पुरतें ऐकून तरी घ्यावें. माझी अशी विनंति आहे कीं, मला तिची भेट करून दिल्यास मी तिला वश करीन, व तुमच्या आधीन होईल असें करीन. माझ्या विद्येनें मी अशा गोष्टी सिद्धीस नेल्या आहेत. तर माझ्या चातुर्याचा व विद्येचा आपण अनुभव घेऊन पहावा. आणि हें आपलें काम सिद्धीस गेल्यावर खुश होऊन मग जें बक्षीस आपण द्याल तें मी घेईन."

'या मागूनच्या बोलण्यानें त्या अधमाचें मन वळलें, असें दिसलें. व तो माझकडे दृष्टी रोखून मला म्हणाला, "हे पहा! तूं आतां हें काय म्हणते आहेस म्हणून; नाहीं तर मला एवढ्या वशी-करणाची जरूरी आहे असें नाहीं. कारण माझा निश्चय ठरून गेला आहे. तूं प्रयत्न करून पहात असलीस तर पहा. ती तला वळली तर त्यांत तुझें

व तिचें कल्याणच आहे. ती मला एवढी नाजुक दिसले कीं तिच्या जीवाला पीडा देण्याला मला सहसा धैर्य होत नाहीं. तथापि ती नच ऐकेल व आपलाच हेका धरून बसेल, तर तिचें दुर्दैव होय असें मी समजतों. मीं तर येते त्रैयोदशीला तिला वरणार, आज प्रतिपदा आहे, तर तुला मी बारा दिवसांचा अवधि देतों; तेवढ्या मुदतींत जर तुझ्यानें कांहीं झालें तर पहा; मजकडून अडकाठी नाहीं. पण माझी एक मात्र अट आहे कीं, जर तुझ्यानें हें कार्य न झालें तरी मी तिला वरणारच. परंतु तूं आपल्या कार्यांत चुकलीस म्हणून तूं मात्र माझ्या भक्ष्यस्थानीं पडशील. ही गोष्ट तुला कबूल असली तर पुढें सर; नाहीं तर, मी तुझ्यावर दया करतों; तूं आपली आल्या वाटेनें परत जा!"

'मी मनांत विचार केला कीं मला माझ्या प्रियसखीची जर भेट होत आहे तर तिच्या पेक्षां माझे जीवित मला प्रिय आहे कीं काय? शिवाय मला जगून तरी काय कर्तव्य आहे? यास्तव मी त्याची ही अट मोठ्या उत्साहानें कबूल केली. व आणखी सांगितलें "राक्षसराज! आपण स्वस्थचित्त असावें. आपली अट मला मान्य आहे. माझ्या विद्येंत माझ्या कुशळतेची जर मला पक्की खात्री आहे तर या अटीची काय कथा? या पेक्षां आणखी भयंकरही अट असली तरी ती मान्य करण्यासही मी तयार आहें. मला आपल्या प्रियपात्राची भेट मात्र एक-वार होऊं द्या."

'यानंतर त्यानें एका सेवकास, मला **मदालसेच्या** वाड्याकडे घेऊन जाण्याविषयीं तावडतोब आज्ञा केली. 'जातां जातां तो पुन्हा म्हणाला, "जा बाई जा; आणि तूं प्रतिज्ञा करतेस त्याप्रमाणें तुला यश येऊं दे. मी आतां भूतलावर

जातों. तेथें गालव नामक ब्राह्मणानें फिरून यज्ञास आरंभ केला आहे असें मला समजलें आहे. किती कठिण ब्राह्मण आहे म्हणून म्हणावा ! तीन चार वेळां त्याच्या यज्ञाचा विध्वंस केला तरी आपलें कर्म तो सोडीत नाहीं. बरें आहे. जो हविर्भाग तो देवांसाठीं देतो, तो आम्हीच लुटून नेतों, यांत काय वाईट आहे ? वास्तविक माझा प्रतापच एवढा आहे. या ब्राह्मणानीं हा हविर्भाग देवतांस न देतां आम्हासच द्यावा हें योग्य आहे. तर मी आतां पुनः भूतलावर त्यांचा समाचार घेण्यास जातों. तोंपर्यंत हें काम तूं सिद्धीस ने." असें म्हणून तो निघून गेला. हें भाषण त्याचें मीं ऐकलें, त्यानें माझा आनंद दुप्पट झाला. कारण कामधेनूच्या वाणीची मला आठवण होती, व ती सत्य होण्याचा समयही जवळ आला आहे असें त्या राक्षसाधमाच्या भाषणावरून मी अनुमान बांधलें. मला आपल्या सखीची भेट होणार म्हणून जो आनंद झाला होता तो कामधेनूच्या वाणीच्या प्रत्यंतरानें अधिक झाला हें उघडच आहे. त्यामुळें अवसान येऊन मी लौकर लौकर चालूं लागलें. इतकी कीं तो सेवक मोठा धटिंगण होता तरी त्याच्या पुढें होऊन त्यालाच लौकर चल म्हणून प्रार्थना करूं लागलें. शेवटीं आम्ही या वाड्याशीं येऊन पोंचलों. तों त्याचे दरवाजे जसे तुम्ही पाहिलेत तसेच बंद होते, पण त्या सेवकानें कांहीं युक्ति केल्याबरोबर ते उघडले. ही युक्ति मी तेव्हांच त्याच्यापासून शिकून घेतली. ती तो कांहीं पहिल्यानेंच सांगेना, पण मी त्याची फार विनवणी केली व मी काय कामासाठीं आलें आहें तें जेव्हां मी त्याला सांगितलें तेव्हां त्याला वाटलें कीं, काम मोठें योग्यतेचें आहे,

आणि तें बहुधा सिद्धीस जाईल. व न जाणों, पातालकेतूची हिजवर कृपादृष्टि होईल, यास्तव हिच्यावर एव्हांच सहज उपकार होत आहेत तर करून ठेवावे; पुढें मागें ही विसरणार नाहीं. असें त्याच्या मनांत येऊन, त्यानें मजपासून तसें कबूल करून घेऊन मला ती युक्ति सांगीतली. असो.'

'याप्रमाणें मी वाड्यांत शिरल्यावर, त्या सेवकानें मला हा जिना दाखवून वर जाण्यास सांगितलें आणि तो दरवाजा बंद करून निघून गेला. मी वर येऊन पाहतें तों येथें कोणीही नसून फक्त ही सखी मात्र दैन्यावस्थेंत पडलेली मी पाहिली. ती शोकानें व्याप्त झाली असून अगदीं भानरहित होती. "सखे मदालसे!" अशी मी हाक मारली ती बरोबर दचकून जी तिनें किंकाळी मारली तिनं माझें काळीज थरारून गेलें. आणि ती बरळत सुटली कीं "राक्षसाधमा! अझूनही तूं माझा पिच्छा सोडीत नाहींस ना? मला आणखी किती छळणार? इतर माणसांस ज्याप्रमाणें तूं भराभर खाऊन टाकतोस त्याप्रमाणें मला खाऊन, क्लेशमुक्त कां करीत नाहींस? तूं पक्कें समज कीं, मी तुझ्या इच्छेला म्हणून कधीं वश होणार नाहीं. इ०."

'हें तिचें बरळणें ऐकून तिची मला फार फार काकळून आली. नंतर मी तिच्या जवळ जाऊन तिला उचलून बसती केली व जवळच एक पाण्याचा कलश होता त्यांतील थोडें पाणी तिच्या डोळ्यांस लाविलें. आणि तिचे अस्ताव्यस्त झालेले केस एका हातानें सारून, तिला म्हटले, "सखे मदालसे! भिऊं नको. मी राक्षस नव्हे तर तुझी सखी कुंडला आहें. तुला भेटण्यासाठीं आलें आहें. तर डोळे उघडून मजकडे पहा तरी."

या माझ्या शब्दाबरोबर तिनें डोळे उघडून मजकडे टक लावून पाहिलें, व हिकडे तिकडे नजर फिरवून चौफेर पाहिलें, व दुसरें येथें कोणी नाहीं असें जाणून तिला जो आनंद झाला तो मला सांगतांही येत नाहीं. तिनें मोठ्या प्रेमानें मला आलिंगन दिलें आणि म्हणाली, "बाई कुंडले! तूं येथें कशी आलीस? किंवा तुलाही त्या राक्षसानें हिरावून आणिलें किं काय? पण तसें त्यानें केलें असतें तर तो तुला एथें मजकडे कशासाठीं आणता? काय खरा प्रकार असेल तो मला चटकर सांग! मला बाई मोठी भीति वाटते. आणि तूंच होऊन जर एथें लपून आली असलीस तर तूं आपली आलीस तशी लौकर परत जा कशी; नाहीं तर तो राक्षस जर करतां अकस्मात् आला तर मजप्रमाणें तुलाही छळण्यास सोडणार नाहीं."

'मी तिला धीर देऊन म्हटलें, "प्रिये सखे! तूं घाबरूं नको! सर्व गोष्टी यथास्थित आहेत. तुला सोडविण्यासाठींच मी एथें आलें आहें व ज्यानें तुला पळवून आणलें त्या राक्षसाधमाच्या अनुमतानेंच आलें आहें. तो सर्व प्रकार मी तुला मग सांगेन. परंतु तुला त्यानें कसें धरून आणलें व काय काय पीडा दिली तें मला अगोदर सांग. तूं फार कृश झालेली दिसत आहेस त्यावरून त्यानें तुझा फार छळ केला असावा." असें मी विचारल्यावर तिनें इत्थंभूत हकीगत मला निवेदन केली. ती ऐकूनच मला फार कष्ट झाले मग स्वतः भोगणाराला काय झाले असतील हें काय सांगावें! नंतर मीही आपली सर्व हकीगत, **मदालसा** नाहींशी झाल्यापासूनची, कामधेनूचें आश्वासनासह तों या नगरांत येऊन **पातालकेतूची** संमती घेऊन हिला भेटलें, तेथपर्यंतची

तिला सांगितली; याप्रमाणें आम्ही दोघीजणी कामधेनूच्या आश्वासनावर विश्वास ठेवून इष्टकालाची वाट पाहात राहिलों आहों. मी येथें येऊन अकरा दिवस झाले. तो दांडगा राक्षस आतां येतो, घटकेनें येतो, याची आम्हाला भीति वाटत आहे; तथापि तो आतांपर्यंत आला नाहीं. आजचा बारावा दिवस हा सरल्यावर उद्यां तो आपल्या मुदतीप्रमाणें येऊन कदाचित् लग्नाची गोष्ट काढील. यास्तव हे पराक्रमी! महाबाहो ! याच अरिष्टापासून आमचें आपण रक्षण करावें असें आम्ही इच्छितों.'

'आतां मी कोण हेंही आपल्यास सांगतें तें ऐकावें. माझ्या बापाचें नांव **विंध्यवान्** असून माझा विवाह **पुष्करमालीशीं** झाला. माझें नांव **कुंडला** मी हिची सखी, हें तुम्हाला मघाशींच कळविलें आहे. माझ्या पतीला **शुंभासुरानें** मारल्यापासून, व्रतस्थ राहून, देवार्चनानें परलोकसाधन मी करीत असतें. माझा लहानपणापासून **मदालसेवर** मोठा जीव, यास्तव देवतार्चन होऊन उरल्या वेळांत मी हिच्या समागमानें काळक्षेप करावयाचा निश्चय केला.'

"तर हे महाभागा ! आम्ही आपला वृत्तांत आपल्यास सांगितला. आतां आपला वृत्तांत ऐकण्याविषयीं आम्ही फार उत्कंठित आहों. तर तो सांगून आमची चिंता दूर करावी. ही चिंता कोणती म्हणून विचाराल तर सांगतें. माझ्या या सखीची अवस्था काय झाली होती तें आतां सांगीतलेंच आहे. अशा स्थितींत हिला आश्वासन देऊन, कामधेनूच्या वाणी-प्रमाणें सर्व घडून येईल अशी समजूत करून हिला मी आतां पर्यंत वाचविलें आहे. परंतु हिच्यानें आतां धीर निघत नाहीं. हिला त्या असुराचें भय पडलें आहे. माझें मेलें कांहीं होवो;

परंतु आतां आजचा एकच दिवस उरला आहे; तो सरला म्हणजे माझ्या सखीची मोठी कठिण अवस्था आहे. तिनें कालच प्राणत्याग करण्याचा निश्चय केला होता. व आतांही ती याच विचारांत आहे, कीं तो दुष्ट येण्याच्या अगोदर आपल्या जीवाचा अंत करून टाकावयाचा. आपल्या हृदयाविरुद्ध त्याच्याशीं लग्न करून आजन्म वैर संपादून घ्यावयाचें नाहीं. मी तरी हिला कोठवर थांबवून धरावें ? परंतु मघाशीं आपल्या शंखाचा नाद आमचे कानीं आला त्यावेळीं मी कांहीं कामाला खालीं गेलें होतें. तेव्हां हा नाद कोणीं केला ? बहुधा तो असुर विजय मिळवून मोठ्या उत्साहानें आला असें जाणून, ही बावरत बावरतच खिडकीशीं येऊन पाहूं लागली. तों तीस आपली मूर्ति दिसली. त्याबरोबर तिची भीति नाहींशी होऊन मोठा उत्साह वाटला. आणि काय असेल तें असो मी आपल्याला खरेंच सांगतें; तिच्या मनांत आपल्याविषयीं मोठा स्नेह उत्पन्न झाला. नंतर तिनें मजला लौकर वर येण्यास हाक मारून, हा वृत्तांत सांगितला. आणि म्हणाली, " सखे **कुंडले** ! तुझें अश्वासन बाई खरं होईलसें दिसतें. खालीं कोणी महाशूर तेजस्वी पुरुष आला आहे. त्याला पाहून माझे डोळे निवाले. तर त्यांस कृपा करून झटकर वर घेऊन ये. ते कदाचित् आपलें दैन्य दूर करतील." असें ऐकून मी 'हो ' म्हणून तशीच खालीं आलें व आपल्याला भेटून वर घेऊन आलें."

" या पुढील सर्व प्रकार आपल्याला विदित आहेच. आमची काय अवस्था आहे ती आपल्याला दिसतच आहे व आमचेवर कोणतें संकट आहे तेंही आपल्यास आतां कळलें

आहे. तेव्हां या राक्षसाच्या पीडेपासून माझ्या या सखीचें आपण रक्षण करावें इतकीच माझी आपल्यास प्रार्थना आहे. आपण शूर आहां,व आपल्यास पाहिल्यानेंच माझ्या सखीचें आपल्यावर मन बसलें आहे तर तिला आपण आपल्या बरोबर घेऊन स्वदेशाला जावें. कोठून तरी ही त्या राक्षसाच्या हातांत न पडावी. मी आपल्याला पाताळलोकांतून पृथ्वीतलावर वाट काढून देतें. पण ह्या सर्व गोष्टी तो दुष्ट येण्याच्या पूर्वी घडल्या पाहिजेत, आणि त्याची येण्याची मुदत तर सरत आली. तेव्हां विलंब लावणें ठीक नाहीं. या उपर आपली मर्जी. शेवटीं एवढेंच मागणें आहे कीं, ही माझी सखी आपली दासी होऊन आपल्या पायांशीं आली आहे. तर तिचा आपण अव्हेर करूं नये."

**कुंडला** याप्रमाणें बोलत असतां, **मदालसेचे** हृदयांत लज्जा उत्पन्न होऊन, हा पुरुष या पुढें काय बोलतो व हा कोण आहे हें जाणण्याची तिला फार उत्कंठा झाली. ती म्हणाली, "बाई **कुंडले** ! हें तूं काय बोलत सुटली आहेस. कोणाचेंही आपल्याला कुळशीळ कळल्यावांचून असें बोलणें तुला शोभते कां? आणि कामधेनूच्या वाणीचीही तुला विस्मृति पडली असें दिसतें. मग तुझ्या या बोलण्यांत काय जीव आहे? माझ्या दैवीं जर दुःखच भोगणें असेल तर तें कुठून चुकणार आहे?"

नंतर **कुंडला** म्हणाली, "हो खरेंच. मीही एथें थोडी वसरलेंच. मी एवढें स्पष्ट बोलूं नये. तथापि आपल्यावर जो प्रसंग आहे, त्याचे भरांत मला विशेष भान राहिलें नाहीं. तथापि खरा झाला तसा आपणास सांगितला आहे. आपण साक्षात् रूपानें देवपुत्रच असून भाषणविनयादि

गुणही सर्वोत्कृष्टच आहेत. यास्तव या थोड्याही सहवासानें हिच्या मनांत तुमच्या विषयीं प्रेम उत्पन्न होऊन तुमच्या ठिकाणीं ही आसक्त झाली आहे. परंतु आतां तिनें असें सुचविलें तेंही खरेंच आहे कीं कामधेनूच्या वचनाप्रमाणें **पातालकेतु** व **तालकेतु** हे वराहरूपानें पृथ्वीवर संचार करीत असतां त्यांस जो कोणी मारील तोच हिचा भर्त्ता होईल. असें ठरलेलें आहे. तर यास काय उपाय करावा? हें दुसरें संकट आतां उद्भवलें आहे. कामधेनूचें वाक्य तर कधीं असत्य होणार नाहीं. हिचें अंतःकरण तर तुमचें ठिकाणीं आरूढ झालें आहे. असें असून जर हिला दुसऱ्याची भार्या व्हावें लागलें तर त्यानें हिला स्वर्गतुल्य जरी सुख दिलें तरी यावज्जन्म हिला दुःखच भोगावें लागेल. मिळून हिला या राक्षसाच्या संकटांतून जरी आपण मुक्त केलें तरी दुःखच होणार असा हिचे भाषणाचा आशय आहे. व तो खराच आहे. परंतु मला तसें वाटत नाहीं. आपण कोणी तरी अलौकिक भाग्यशाली पुरुष आहां. आणि आमची ही सखीही निष्कपट असून अत्यंत सोज्वळ आहे. यास्तव दैवयोगानें तिचा आपल्याशीं संयोग होईल अशी मला बळकट आशा वाटते. हिचें सुख आपल्या हकीगतीवर अवलंबून राहिलें आहे. यास्तव हे महाभागा! आपला यथातथ्य वृत्तांत सांगून आमची चिंता लौकर दूर करावी. आतां विलंब लावूं नये."

**मदालसे**ला पाहिल्यापासून राजपुत्र **ऋतध्वज** याचें चित्तही तिच्या ठिकाणीं आसक्त झालें होतेंच. तशांत त्यानें **कुंडले**च्या मुखानें जेव्हां हा सर्व तिजविषयींचा वृत्तांत श्रवण केला तेव्हां तर त्याला आशा उत्पन्न होऊन, तीं

सफळ होण्याचा संभव दिसूं लागला. तो श्रमानें फार थकला होता तरी तितक्यांत त्याला हुशारी आली, व त्याच्या मुखावर तेजस्वीपणा दिसूं लागला. तो उत्साहानें म्हणाला. "हे धर्मज्ञे! तुमच्या सखीची ही खेदकारक दशा पाहून मला पराकाष्ठेचें वाईट वाटतें. हिला या अरिष्टांतून सोडविण्याचा जो प्रयत्न मजकडून होण्यासारखा असेल तेवढा केल्यावाचून मी राहाणार नाहीं असें आणखी मी आश्वासन देतों. आतां माझा वृत्तांत तुम्ही विचारतां तर तो मी तुम्हास जसा आहे तसा सांगतों."

अशा प्रकारें उपक्रम करून, त्यानें आरंभापासून आपलें नांव गांव कुळशीळ वगैरे सांगितलें. नंतर आपल्याला यज्ञ रक्षणार्थ **गालव**मुनीनें आणलें, तेथें वराहरूपानें **पाताळकेतु** आला असतां, त्यांस बाणानें विद्ध केल्यावर, त्याच्या मागोमाग पाठलाग करीत असतां, एका अंधकारमय खाचेंत आपण अश्वासह पडलों, पुढें कांहीं वेळानें स्पष्ट उजेड दिसूं लागला व पुढें शोधल्यावर हा वाडा दिसला, येथें आल्यावर कोणीच आपल्या नजरेस पडेना म्हणून शंख वाजविल्यावर तुम्ही ( **कुंडला** ) भेटलां, इ० सर्व वृत्तांत राजपुत्रानें निवेदन केला. तो ऐकून **मदालसे**च्या मनांत लज्जा, आशा, हर्ष व विनय इत्यादि वृत्ति उत्पन्न होऊन, ती **कुंडले**कडे मधून मधून संकेतानें चोरून पाहात असे. शेवटीं राजपुत्रानें खालीं लिहिल्याप्रमाणें बोलून आपलें भाषण संपविलें.

"हे भद्रशीले! याप्रमाणें माझी हकीगत आहे. जशी तुम्ही निष्कपटपणानें आपली हकीगत सांगितली, तशीच मीही इत्थंभूत सांगितली आहे. ही अर्थात् तुमच्या कामधेनूच्या आश्वासनाशीं फारच मिळते. व जसें या तुमच्या

सखीचें चित्त मजविषयीं आसक्त झालें आहे असें आपण सांगितलें तसेंच मीही स्पष्टपणेंच तुम्हास सांगतों कीं, मलाही आजवर कामविकार कसा असतो हे माहीत नव्हतें, पण या कल्याणीच्या दर्शनानें त्याची अनिवार्य च्छाया मजवर दिसूं लागली. तस्मात् मी या गोष्टींत तुमच्या अधीन आहें. जें आपल्यास योग्य दिसेल तसें करा. मी तर ह्या कल्याणशीलेच्या रक्षणाचा निर्धार केलाच आहे. माझा जो बाण पातालकेतूला लागला आहे तो बहुधा त्याला मृत्युप्रदच आहे असे मीं समजतों. तो जरी पळून इकडे आला आहे तरी त्या बाणानें मेला असावा. किंवा तसें घडलें नसल्यास तो तुमच्या संकेताप्रमाणें आज उद्या इतक्यांत येथें येईलच. मी तोंपर्यंत येथून जाऊं इच्छित नाहीं. तुमच्या म्हणण्याप्रमाणें हिला पळवून घेऊन जातां येत नाहीं. शूराला शत्रु आला असतां पाठ दाखविणें यासारखें मरणप्राय कांहींही नाहीं. तर मी येथेंच राहून त्याच्याशीं युद्ध करून, त्याचा वध करीन व अशा उपायानें या कल्याणीचें पाणिग्रहण करण्यास आपल्याला पात्र करून घेईन."

राजपुत्राचा असा निश्चय पाहून **कुंडला** व **मदालसा** यांस मोठा हर्ष झाला. **मदालसेच्या** मनांतील प्रेम अधिकच दृढ झालें व **कुंडला** त्याची फार स्तुति करूं लागली. नंतर ती **कुंडला मदालसेस** म्हणते, "हे **मदालसे** ! या महाभागानीं जें भाषण केलें तें सर्व खरें आहे. कारण कामधेनूचें वचन अन्यथा कसें होईल? तूंही यांस मनानें वरिलें आहेस. तर माझें मनोगत असें आहे कीं, तुम्हां दोघांचा विवाह मीं पाहावा. एवढा पाहिला व तूं सुखी झालीस म्हणजे माझ्या सर्व श्रमाचें फळ मला मिळालें."

असें म्हणून ती **ऋतध्वजा**कडे वळली व त्यास उद्देशून म्हणाली, "हे वीर पुरुषा! तुम्ही धन्य आहां. कारण दीनाचें रक्षण तुमच्याकडून जसें व्हावें तसें होत आहे. तुमचा इतिहास ऐकून **मदालसे**चें चित्त स्थिर झालें. फार दिवसांच्या कष्टानंतर एकदम सुख प्राप्त झालें म्हणजे तें जास्त सुखकर होतें. राहूनें ग्रासलेलें चंद्रबिंब जसें ग्रहणांतून मुक्त झाल्यावर जास्त शोभतें, तसें या माझ्या सखीचें मुख आनंदानें अतिशय उल्लसित दिसत आहे. हीही सुंदर असून, कुळशीळानें तुम्हास अनुरूप अशीच आहे. चंद्राचे ठिकाणीं कांति, सूर्याचें ठिकाणीं प्रभा, दैववानाचे ठिकाणीं संपत्ति, साधूच्या ठिकाणीं क्षमा, ह्या जशा साहजिकपणेंच प्राप्त होतात, तशी ही तुमचे ठिकाणीं अत्यंत आसक्त आहे. यास्तव कामधेनूच्या वचनानें तुमच्याशीं संयोग होऊन, हिचा भाग्योदय व्हावा म्हणजे ही धन्य होईल व मला आनंद होईल. यास्तव, हे वीरपुरुषा! यथाविधीनें आपण हिचें पाणिग्रहण करावें अशी माझी प्रार्थना आहे."

**ऋतध्वज** म्हणाला, "हे धर्मज्ञे! आपण माझी प्रार्थना करावी अशी कोणती गोष्ट आहे? पण तुम्हाला मी काय उत्तर द्यावें हेंच मला समजत नाहीं. कारण मी एथें येऊन सर्वस्वी तुमच्या अधीन झालों आहें. यांत सर्व आलें. यास्तव जें कर्तव्याकर्तव्य असेल तें तुम्हीं करावें. तो अधिकार मजकडे उरला नाहीं."

असें त्याचें अनुकूळ वाक्य ऐकून **कुंडलेनें** तत्काळ आपल्या **तुंबरु** नामक कुळगुरूचें स्मरण केलें. त्याबरोबर तोही तेथें हातांत दर्भ समिधा घेऊन प्रगट झाला. त्यास **कुंडला, मदालसा** व **ऋतध्वज** या त्रिवर्गानें साष्टांग

प्रणिपात केल्यावर, **कुंडलेनें** सर्व मजकूर त्यास कळविला, आणि ती म्हणाली, " हे सद्गुरो ! या माझ्या सखीला संकटांतून सोडविण्यास उद्युक्त झालेल्या या वीर राजपुत्रावर हिचें अत्यंत मन बसलें आहे. तसेंच याचेंही हिच्यावर आहे. आणि मला कामधेनूनें जें आश्वासन दिलें आहे त्यास अनुसरून या महाशूर राजपुत्रानें हिला हिरावून आणणाऱ्या **पातालकेतु** नामक राक्षसाला बाणप्रहारानें मरणोन्मुख केलें असल्यामुळें, हिचें यांच वराशीं लग्न व्हावें असें निश्चित आहे. यास्तव मजवर कृपा करून, यांचें यथासांग लग्न झालेलें मी पहावें, ही जी माझी इच्छा ती पूर्ण करण्यास आपण समर्थ आहां; म्हणून आपलें स्मरण करून एथवर मागविलें आहे."

ही प्रार्थना त्याणें तत्काळ मान्य केली. तो म्हणाला, " **कुंडले** ! तुझी इच्छा पूर्ण करणें हें मलाही इष्टच आहे. कारण माझा तुझ्यावर जसा लोभ आहे तसा **मदालसे**वरही आहे. आणि हा राजपुत्रही धर्मरक्षण व दीनपालन करण्यांत दक्ष असून, स्वतःही धर्मात्मा आहे, यास्तव त्याचें कल्याण करणें मला अवश्य आहे. तर मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें यांच्या लग्नासंबंधी मंगलाची तयारी उद्या पावेतों करतों. उद्या त्रयोदशी आहे, शुभ मुहूर्त आहे; फार उत्तम आहे. तों पावेतों **मदालसेला** इष्टदेवतास्मरण करण्यास सांग व तूंही विघ्ननिवारणार्थ कांहीं जपजाप्य कर. हा राजपुत्रही अगदीं थकून गेलासें दिसत आहे तर त्यासही थोडी विश्रांति घेऊं द्या."

त्रयोदशीचे दिवशीं प्रातःकाळीं लौकरच **नाळकेतूचा** एक सेवक येऊन आपल्या स्वामीची आज्ञा सांगूं लागला कीं,

"हे स्त्रियानो! माझा स्वामी जो **ताळकेतू** त्याची अशी आज्ञा आहे कीं, आजचा दिवस **मदालसेच्या** लग्नसंकेताचा आहे. माझा भाऊ **पातालकेतू** यानें आजवर हा बेत तसाच राहूं दिला हा मोठा मूर्खपणा केला. असो, झाली गोष्ट तीस उपाय नाहीं. माझा बंधु **पातालकेतु** हा हल्ली कोणा राजपुत्राच्या बाणानें विद्ध झालेला मरणोन्मुख होऊन पडला आहे. यास्तव त्याच्या अभावीं मला वरण्यास **मदालसा** अझून तरी राजी आहे किंवा नाहीं? तसेंच (**कुंडलेकडे**) तोंड फिरवून ) तुझ्या यत्नास तरी काय फळ आलें आहे? नाहींतर तुमच्या अटीप्रमाणें तुम्ही खाऊन मरण्याला लौंकरच सिद्ध असावें."

इतक्यांत **ऋतध्वज** तेथें आला; त्याजकडे पाहून तो सेवक चमत्कारयुक्त मुद्रेनें म्हणतो, "पण हा पुरुष येथें कशासाठीं आला आहे? एथें कोणाचाही संचार असूं नये अशी महाराजांची सक्त आज्ञा असतां हा एथें कसा आला? हें सर्वच मोठें आश्चर्य आहे. मला तर हें कांहीं तरी अनर्थसूचक दिसतें. तर आधीं हा सर्व प्रकार मी आपल्या स्वामीस जाऊन निवेदन करतों.—आणि काय ग ए **कुंडले**! हें सर्व काय गुह्य आहे? ही सगळी काय मसलत आहे. ठीक आहे, तूं आमच्या महाराजांच्या हितासाठीं एथें आलीस नव्हे का? या तुझ्या कपटाचें फळ तूं आतांच भोगशील." असें रागानें रागानेंच बडबडत व पाय आपटीत तो निघून जाऊं लागला. **कुंडला** व **मदलसा** ह्या थोड्या घाबरल्या सारख्या होऊन राजपुत्राकडे पाहात राहिल्या. तेव्हां त्या राक्षसास मोठ्या धीरानें हाक मारून राजपुत्रानें सांगितलें, "अरे राक्षसाधमा! तुझ्या स्वामीस जाऊन तूं माझा असा निरोप सांग

कीं, तूं आपल्या प्रियपात्राला ज्या निर्जनस्थळीं बंदींत अडकावून टाकलें आहेस तेथेंच, तुझा बंधु **ताळकेतु** याला मारणारा जो शत्रु तो मी येऊन तिचें आज शुभवेळेवर पाणिग्रहण करणार आहे. करतां तो सोहळा पाहण्यासाठीं त्यानें तुला बोलाविलें आहे. समजलास? असें जाऊन सांग. मी त्याला उचित असा सत्कार करण्याची तयारी करून वाट पाहत राहतों."

तालकेतूला मारणारा असे राजपुत्राचे तोंडचे शब्द कानीं पडतांच तो सेवक भयानें घाबरून जाऊन पळतच निघून गेला. पुढें राजपुत्र काय बोलणार आहे याचीही त्यानें वाट पाहिली नाहीं. तो सेवक तसाच धांवत जाऊन हें अनर्थकारक वर्तमान **पाताळकेतूला** निवेदन करता झाला. त्याबरोबर त्याला मोठा क्रोध येऊन त्यानें हातांत एक गदा मात्र घेऊन **मदालसेच्या** वाड्याचा मार्ग धरला. हें वर्तमान लागलेंच राक्षसनगरांतही पसरलें आणि सर्व राक्षस आपापलीं शस्त्रास्त्रें घेऊन एकमेकास हाका मारून म्हणूं लागले, "अरे चला, पाहातां काय? हा क्षत्रियाचा पोर आमच्याच नगरांत येऊन, आमच्या स्वामीच्या प्रियसर्वस्वावर हल्ला करून तें लुटून घेऊन चालला आहे. केवढी ही छाती! धांवा पाहतां काय! वाड्याला चहोंकडून वेढून घ्या! कदाचित् तो जीवाच्या आशेनें पळून जाईल." यावर दुसरे प्रत्युत्तर करतात "चला हा मी आलोंच. तो काय पळून जातो? धावतां धावतांच त्याला धरून आपटूं. तालकेतु शुकरवेशानें गेल्यामुळें त्याना त्याला सहज विद्ध करतां आलें. म्हणून आतां त्याला आम्ही ऐकतों कीं काय?"

याप्रमाणें राक्षसांच्या नगरांत एकत्र गडबड उडून गेली. राक्षसांच्या सेनेनें एकदम त्या वाड्याभोंवतीं घेरा दिला व शस्त्रांचा प्रहार करण्यास सुरवात केली. हें पाहून **ऋतध्वज** आपल्याशीं म्हणतो, " वाहवा ! फार खासें झालें. वाड्याभोंवती बराच समुदाय जमला आहे. आतां यांची एकदमच रणयज्ञांत आहुति द्यावयास बरें पडेल. आजपर्यंत एकेकच राक्षस मजपुढें येत असे. परंतु एकेक मारीत बसण्यापेक्षां, हा आतां एकदम मोठा सूड उगवण्यास मिळाला आहे ही मोठी उत्तम युक्ति सापडली ! " असा मनांत हर्ष पावून, धनुष्यबाण हातीं घेऊन, तो खालीं आंगणांत येऊन उभा राहिला आणि त्या राक्षससमुदायास उद्देशून म्हणतो, " अरे तुम्ही एकत्र जमून आलां हें फार चांगलें केलें. कारण त्यानें माझे बरेच श्रम वांचविल्यासारखे झाले. आतां तुम्हा सर्वांचाही एके क्षणामध्यें नाश करून यमपुरास पाठवितों. थांबा ! " असें बोलून बाणांची इतकी कांहीं वृष्टि केली कीं, त्या राक्षससेनेस त्यांनी आच्छादून टाकलें असतां ते हतवीर्य होऊन घाबरे झाले. शेकडों मृत्युमुखीं पडले. व जे उरले त्यांस बाणांनीं होणाऱ्या पीडेनें धीर न निवाल्याकारणानें हातचीं शस्त्रें तशींच टाकून देऊन ते पळत सुटले. तों " अरे पळतां काय ? हा मी आलों तुमचा स्वामी तुमच्या साहाय्यास" असें धीराचें भाषण करून पातालकेतु पुढें येऊं लागला. तेव्हां ज्या अस्त्राची देवता त्वष्टा आहे अशा दिव्य अस्त्राचा प्रयोग करून राजपुत्रानें तें पातालकेतूवर सोडलें. त्याच्या देदीप्यमानज्वालांनीं पातालकेतुच्यानें पुढें येववेना. अशा रीतीनें तो भयचकित होऊन क्षणैक निश्चल उभा राहिला असतां, राजपुत्रानें त्याजवर असा अचुक बाण सोडला

कीं तो त्याच्या दंडांत शिरून त्यास घायाळ करता झाला.



त्याच्या वेदनेनें पाताळकेतूनें हातची गदा सोडून पलायन केलें. हें आपल्या स्वामीचें कृत्य अवलोकन करून इतर राक्षसगण जो केवळ धीर धरून कसा तरी उभा राहिला होता तोही सैरावैरा पळत सुटला. आणि क्षणाच्या आंत त्या रणभूमीवर सैन्यापैकीं कोणीही उरलें नाहीं.

ही शत्रूची युद्धाची विलक्षण तऱ्हा पाहून मग राजपुत्रही त्यांच्या मागोमाग नगरांत गेला. हें वर्तमान नगरवासी राक्षसांस कळतांच ते आपली घरें दारें टाकून, अरण्यांत पळून गेले. याप्रमाणें शून्य झालेल्या त्या राक्षसनगरांत राजपुत्रास कोण सांपडणार ! नंतर तो पाताळकेतु व तालकेतु यांच्या वाड्यांत गेला. तों तेथें तालकेतु बाणानें विद्ध झालेला मरणोन्मुख होऊन कण्हत पडला होता. त्यास पाहून त्याची राजपुत्रास दया आली व त्याला या वेदनांतून मुक्त करावें अशा हेतूनें तत्काळ आपल्या तरवारीनें त्याचें मस्तक धडापासून मोकळें केलें. नंतर दुसरीकडे पाहतो तों रडण्याचा आक्रोश त्याच्या कानीं आला. त्या सुरानें शोधीत जातां तो एका भुयाराच्या दरवाजाशीं आला. उघडून पाहतां तों

शेकडो देव, किन्नर, मनुष्य इत्यादिक त्या दोघा राक्षसबंधूंनीं पकडून आणून बंदींत ठेविलेले त्याच्या दृष्टीस पडले. त्यांस राजपुत्रानें बंदमुक्त करून राक्षसांचा विध्वस केल्याबद्दलचा सर्व वृतांत थोडक्यांत सांगितला, व त्यास आपापल्या स्थानांस सुखानें जाण्याविषयीं परवानगी दिली. तेव्हां ते हर्षयुक्त होऊन म्हणतात, "हे पुण्यशील महाबाहो! आमची सर्वांची अशी इच्छा आहे कीं, **मदालसे**बरोबर आपला जो मंगलदायक विवाह व्हावयाचा आहे त्याचा उत्साह आम्हांस करूं द्यावा. तो सिद्धीस नेऊन नंतर आम्ही आपापल्या ठिकाणास जाऊं." असें म्हणून ते सगळेजण राजपुत्राची स्तुति करीत व त्याला मंगलाशिर्वाद देत, **मदालसे**च्या वाड्याकडे चालले.

**ऋतध्वजानें** पाहिलें कीं, **पातालकेतु** आदिकरून दानव जे पळून गेले त्यांचा पाठलाग करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण एक तर आपल्यास या प्रदेशाची माहिती नाहीं म्हणून ते सांपडणें कठिण. आणि दुसरें **मदालसे**चा पाणिग्रहणरूप जो अचिंत्य लाभ घडून आला आहे तोही आजच पूर्ण व्हावयाचा आहे. यास्तव आतां व्यर्थ कालक्षेप करणें बरोबर नाहीं. असें मनांत आणून, जयसूचक आपला शंख त्यानें वाजविला. त्याच्या नादानें दशदिशा भरून गेल्या. तो त्यानें वाजविण्यासाठीं तोंडाशीं धरला असतां असें वाटलें कीं शत्रूस जिंकून, त्यांचें यशच जणों हा पीत आहे कीं काय?

इकडे **मदालसा** व **कुंडला** या **ऋतध्वजाचें** राक्षसांशीं युद्ध चालूं झाल्यावर अगदीं चिंतेंत पडल्या होत्या, त्यांच्या कानीं हा शंखध्वनि पडतांच त्यांस मोठा आनंद झाला, व त्या

वीराचा योग्य सत्कार करण्यासाठीं त्या वाट पाहात बसल्या. तसेंच **कुंडलिकेनें तुंबरुगुरूस** लग्नाची तयारी करून ठेवण्यास सांगितलें. तों तो विजयी राजपुत्र, सोडविलेल्या देव किन्नरादि गणांसहवर्तमान तेथें आला.

**कुंडलेनें** सांगितल्याप्रमाणें **तुंबरूनें** अग्नि सिद्ध करून, राजपुत्राकडून विवाहसंबंधी होमहवनादि क्रिया यथासांग करविल्या. व नेमलेला शुभ योग येतांच संकल्पपूर्वक **मदालसेला** राजपुत्राच्या हातांत दिलें. त्यावेळीं जमलेल्या त्या देवादिगणांनीं त्यांजवर पुष्पवृष्टि केली. व या जोड्याचें सदोदित कल्याण असो असे आशीर्वाद देऊन, व त्यांचा निरोप घेऊन ते आपापल्या स्थानांस निघून गेले.

**तुंबरुगुरूनें** सर्व मंगळकार्य यथासांग संपादिल्यामुळें **कुंडलिकेस** हर्ष झाला; व तिनें आपल्या गुरूचे मोठे उपकार मानले. आपल्या जीवलग सखीचा संयोग तिच्या योग्य वराशीं झाल्यामुळें, तिला आतां या जगांत कांहीं कर्तव्य असें उरलें नाहीं. असें जाणून ती **मदालसेस** म्हणाली, "हे सखे! सुंदरवदने! तुझ्या सौंदर्यादि गुणानुरूप तुझ्या इच्छेप्रमाणें दैवयोगानें तुला हा पति प्राप्त झाला आहे, व त्याच्या सहवर्तमान तूं शोभूं लागलीस हें पाहून मी कृतार्थ झालें. आतां मला इतःपर या जगांत कांहीं कर्तव्य उरलें नाहीं. तर मलाही पुढील योनींत असाच चांगला जन्म प्राप्त व्हावा म्हणून मी आतां तीर्थोदकांच्या स्नानानें निष्पाप होऊन, निश्चितमनानें उत्कृष्ट तपश्चर्या करण्यासाठीं जातें, मला परवानगी दे." असें भाषण करीत असतां, तिचा कंठ भरून आला व आपल्या सखीचा आतां चिरकाळ वियोग होणार हें मनांत येऊन, तिजविषयींच्या स्नेहानें गहिंवर

आला. तिनें मदालसेला आलिंगन दिलें व तिच्या हनुवटीला हात लावून म्हणाली, "कल्याणशीले! तूं स्वभावानेंच नम्र व सद्गुणी आहेस. तथापि तुझें मी बरें इच्छिणारी म्हणविते म्हणून थोडें सांगतें. कुलस्त्रियांना पति हेंच परम दैवत होय. त्यांवाचून त्यांना गति नाहीं. यास्तव त्याच्या मनाप्रमाणें वागून व सुखसंतोष देऊन त्याच्या प्रीतीस पात्र हो. तसेंच सासू सासरा वगैरे गुरुजन यांची शुश्रूषा करणें हा वधूजनाचा धर्म आहे यास्तव त्यांचाही संतोष राहील अशा नम्रपणानें व विनयानें वाग, असें केलें असतां त्यांच्या आशीर्वादानें तुझें निरंतर कल्याण होईल. या पेक्षां तुला जास्त काय सांगावयाचें आहे?"

नंतर ती राजपुत्राकडे तोंड फिरवून म्हणते, "महाभाग! तुम्ही ज्ञानसंपन्न असल्यामुळें तुम्हा सारख्या उत्तम पुरुषांस इतर पुरुषांनींही उपदेश करणें योग्य नाहीं; मग आम्हासारख्या स्त्रियांचा काय पाड? परंतु या सुकुमारी विषयीं माझें अंतःकरण स्नेहानें ओढलें जात असल्यामुळें मी तुम्हांस तुमच्या धर्माचेंच स्मरण करवितें.



कारण कीं, हिला कांहीं अजून प्रौढ अवस्था प्राप्त झाली नाहीं व माझ्यावांचून इतर कोणाचा सहवास नाहीं, असें असून हिला मी केवळ तुमच्या भरंवशावर सोडून जाणार. यास्तव मी प्रार्थना करतें कीं, तुमचे

कडून हिला अंतर मिळूं नये. आपण सूर्यासारखे तेजस्वी व इंद्रासारखे महापराक्रमी आहां. तुम्ही हिला पति प्राप्त झालां हें हिचें मोठें भाग्य आहे. तर हिचें पालण पोषण करणें व ममतेनें वागवून सुमार्गास लावणें हा सर्व अधिकार तुमच्याकडे आहे. पतीनें भार्येचें पालण सर्वदा करीत असावें. कारण कीं भार्या ही धर्म, अर्थ, आणि काम या त्रिवर्गाच्या साधनाविषयीं पतीचें साहाय्य करणारी असते. भार्या आणि भर्ता ही दोघेही जेव्हां परस्परास अनुकूळ होतात तेव्हांच ह्या त्रिवर्गाचा लाभ होतो. भार्येवांचून एकट्या पुरुषासच धर्मादि पुरुषार्थ कसे प्राप्त होतील? तशी भार्याही एकटी पतीवांचून ते संपादन करण्याविषयीं कधींही समर्थ होणार नाहीं. म्हणून ज्या प्रमाणें स्त्रीनें भर्त्याचें त्याप्रमाणें पुरुषानें स्त्रीचें मन संतुष्ट व स्वपरायण करण्याविषयीं तत्पर असलें पाहिजे. आतां देवता, पितर, व अतिथि यांचे पूजन भार्येनेंच करण्यास योग्य आहे. तें पुरुषांच्या हातून यथासांग घडणार नाहीं. पुरुषानें बाहेरून यत्नानें द्रव्य संपादन करून घरीं आणावें आणि भार्येनें त्याची व्यवस्था करावी हेंच योग्य आहे. नाहींपेक्षां, भार्याच जर नसेल किंवा असून ती जर अविचारी व दुष्ट असेल, तर त्याच्या द्रव्याची हानि होते. भार्येवाचून पुरुषास धर्मार्थादिकांची अपेक्षाच नसते असें म्हणावयास चिंता नाहीं. कारण तो केवळ उदासीन असतो. तशीच भार्या तरी पुरुषावांचून काय करील? अबलत्वास्तव व भरणपोषणासाठीं ती परस्वाधीनच आहे. तस्मात् धर्मार्थ काम हे त्रिवर्ग पुरुषार्थ उभयतां दंपत्यानेंच परस्परांच्या साहाय्यानें सिद्धीस नेतां येणार आहेत. असे शास्त्राचे

सर्व अभिप्राय मी तुम्हांस दर्शविले. त्याप्रमाणें तुम्हीं उभयतांनीं एकमेकांस अनुकूळ होऊन धनपुत्रादिकांच्या सहवर्तमान बहुतकाळपर्यंत आनंदानें सुखरूप असावें, एवढेंच मी इच्छितें. आतां मला जाण्याला परवानगी असावी. कसें? सद्गुरुमहाराज! आणखी यांस काय उपदेश करावयाचा आहे?"

**तुंबरु** म्हणाला "तूं जे गृहस्थाचे धर्म सांगितलेस व दंपत्यांनीं कसें वागावें याचा उपदेश केलास तो योग्य आहे. त्याप्रमाणें यांनीं वागावें इतकेंच नाहीं पण कोणीही वागलें असतां त्या दंपत्याचें सदोदित कल्याणच होईल. चला; गंधर्वांचा राजा जो **चतुराक्ष** त्याजकडे माझें कांहीं पूजेचें प्रयोजन आहे, तर मला आतां लौकर गेलें पाहिजे. ह्या राजपुत्राची **गालव**मुनीच्या आश्रमांत फार वाट पहात असतील. नंतर त्यास घरीं जाऊन मातापितरास भेटण्याचीही उत्कंठा असेल तर त्याला आतां जाऊं देणें योग्य आहे."

या नंतर **मदालसेनें** व **ऋतध्वजानें** सर्वांस नमस्कार केल्यावर, **तुंबरु** व **कुंडला** ह्यांनीं त्यास आशीर्वाद दिले व तीं दोघें आकाशपंथानें निघून गेलीं. **ऋतध्वजानें** आपल्या **कुवलय** अश्वास सिद्ध करून, त्यावर **मदालसेस** आपल्या पुढें बसविलें व **गालव**मुनीच्या आश्रमाचा मार्ग धरला. कांहीं काळानें ज्या मार्गानें ते पाताळलोकीं प्राप्त झाले होते, त्यापेक्षां सुखकर व जवळच्या मार्गानें ते आश्रमांत येऊन पोंचले. इकडे **ऋतध्वज** राक्षसाच्या मागे गेल्यापासून **गालव**मुनीनें निर्विघ्नपणें यज्ञ पूर्ण केला होता. तरी सर्वांस राजपुत्राविषयीं काळजी लागून राहिली होती, तीही त्याच्या अकस्मात् आगमनानें

लोकरच दूर झाली. **ऋतध्वज** आला असें पाहून **गालव** आदिकरून सर्व ऋषि समूहास मोठा हर्ष झाला. ते आश्चर्य करूं लागले कीं, हा राजपुत्र परम धन्य होय. यानें दानवाचा नाश करून साक्षात् विजय लक्ष्मीच अशी ही सुंदरी आपली भार्या करून आणली. तस्मात् हा तिच्या सहवर्तमान फारच शोभत आहे. या उभयतां दंपत्याचा योग्य आदर सत्कार व पाहुणचार करून व आपलें इष्ट कार्य सुरक्षित तडीस गेल्याबद्दल राजाचे उपकार मानून **गालव** मुनीनें राजपुत्रास आपल्या नगरास जाण्यास अनुज्ञा दिली.

## प्रकरण चवथें.

**ऋतध्वज** नगरांत आल्याचें वर्त्तमान कानीं पडतांच **शत्रुजित्** राजास जो आनंद झाला तो काय सांगावा? **ऋतध्वजानें** पित्याच्या पायांवर डोकें ठेवून नमस्कार केला असतां त्यास उठवून राजानें आलिंगन दिलें व पाठीवर हात फिरवून, म्हणाला "मुला, तुझी जसजशी हकीकत घडली असेल तसतशी मजला सांग." या प्रमाणें आपला वृत्तांत



सांगत असतां, **गालव**ऋषीच्या आश्रमीं गेल्यावर राक्षसांचीं कपटरूपें व त्यांच्या कपटयुक्ति, **तालकेतु**च्या मागें लागून पाताळगमन, तेथें प्रथम **कुंडला**दर्शन, नंतर म-

दालसाप्राप्ति, दानवांचा संहार करून पुनरागमन इत्यादि सर्व वृत्तांत त्यानें पित्यास निवेदन केला. तो ऐकून शत्रुजित् राजाला पुत्राच्या पराक्रमाचें मोठें कौतुक वाटलें. तो पुत्रास म्हणतो, "वत्सा! तूं सत्पुत्र आहेस. आपल्या वंशाचा नांवलौकिक फार उत्तम राखलास. त्या सद्धर्मचारी मुनींचें भयापासून रक्षण केलेंस, यज्ञाचा विध्वंस करणाऱ्या दानवांचा नाश केलास, आणि उत्तम स्त्रीरत्न संपादन केलेंस. यास्तव तूंच उत्तम पुरुष या पदवीस योग्य आहेस. पहा, पित्यानें जें यश व जें द्रव्य संपादन केलें असेल व जे पराक्रम केले असतील, त्यांत जो न्यूनता आणतो तो अधम पुरुष जाणावा; यांचा नाश न करतां जेवढें आहे तेवढेंच रक्षण करून जो असतो त्यास मध्यमपुरुष म्हणतात; पण जो आपल्या सामर्थ्यानें पित्यानें मिळविल्यापेक्षांही जास्त संपादन करतो तो उत्तम पुरुष. तस्मात् तूं मजपेक्षांही श्रेष्ठ आहेस. कसा म्हणून म्हणशील तर पहा, पूर्वजांनीं जें मिळविलें होतें त्याचें रक्षण करून मी यथाशक्ति प्रथम गोब्राह्मणाचें व धर्माचें साह्य करीत होतों. पण तूं तर आमच्या वंशाचें यश सर्वत्र विस्तृत केलेंस. पाताळास जाऊन तेथें पराक्रम गाजवून उत्तम स्त्रीची प्राप्ति करून घेतलीस, हें विशेष केलेंस. असा तूं माझ्यापेक्षां गुणवान् मुलगा मला मिळालास तेणेंकरून मी पुण्यवान् लोकांत श्रेष्ठ होऊन धन्य झालों. जे कोणी पुत्राचे पराक्रमानें प्रसिद्धीस येतात, ते मात्र पुत्रासंबंधी जो अनुपम आनंद त्यास पावतात. ज्याला पित्याच्या नांवावरून लोक ओळखतात त्याला धिःकार असो. जो पुत्राचे नांवानें प्रख्यात होतो त्याचें जन्म सफळ झालें असें म्हटलें पाहिजे. यास्तव हे पुत्रा! तुझ्या यो

गानें मी कृतकृत्य झालों आहें. आतां माझी एवढीच इच्छा आहे कीं, उत्तरोत्तर ऐश्वर्यानें व पराक्रमानें वृद्धिंगत होऊन ही गंधर्वकन्या जी तुझी भार्या–जिचा लाभ होणें केवळ दुर्लभ–तिच्या सहवर्तमान तूं दीर्घकाळपर्यंत सुखरूप वास करावा. हिची किमपि उपेक्षा करूं नको." असा पित्यानें गोड शब्दांनीं बहुतप्रकारें त्यास बोध केला, व त्याचप्रमाणें **ऋतुध्वज** पुढें मनोभावानें वागूं लागला.

**शत्रुजित्**राजानें पुत्राकरतां एक उत्तम एकांत व सुखाचें मंदिर तयार करून दिलें. त्यांत तो आपल्या प्रियेसहित वास करून उपवनांत व रमणीय पर्वतादिकांच्या शिखरांवर क्रीडा करीत असे. तशीच ती त्याची पत्नी **मदालसा** ही प्रतिदिवशीं प्रातःकाळीं सासूसासऱ्यांस नमस्कार करून, त्यांचा आशीर्वाद घेत असे. ती त्यांच्या आज्ञेंत वागून आपल्या पतीचेंही मन संतुष्ट ठेवण्यांत तत्पर असे.

**अयोध्या** नगरीपासून कांहीं अंतरावर एक मोठा रमणीय बाग राजपुत्रानें आपल्या इच्छेप्रमाणें तयार करविला व त्याचें नांव **प्रियकरंडक** असें ठेविलें. त्या बागांत कोणतेही प्रकारचा उणेपणा म्हणून ठेविला नव्हता. नानाप्रकारचीं फळपुष्पांचीं व शोभेचीं झाडें झुडपें लाविलीं होतीं. सुखानें प्रवेश करतां यावा म्हणून लहान मोठ्या वाटा केल्या होत्या, जागोजाग कुंज तयार केले होते, पुष्करणी होत्या, कुंडें होतीं व त्यांतून पाट काढून पाणी चहोंकडे खेळविलें होतें. राजपुत्राचा आवडता बाग काय तो हाच, तेव्हां तेथील सर्व पदार्थ सुवर्णाचे किंवा रत्नमण्यादिकांचे होते असें वर्णन केलें असतां वाचकांस नवल वाटावयास नको.

या बागांत राजपुत्र पुष्कळ काळ घालवीत असे. बहुत

करून विशेष काम काज नसलें म्हणजे विश्रांतीची त्याची जागा हीच असे. एकेसमयीं मदालसेसहवर्तमान बागेंत फिरत असतां तो तिला म्हणतो—

श्लोक.

जाई सुंदर ही, तशी मृदु जुई, नेवाळि ही शेवती
शुभ्रा सुभ्रु! सुपीत चंपक सुमीं ही वाटिका शोभती।
पुष्पीं शीतजलें सुगंधित कसा हा वायु गे वाहतो
या काळीं वपुत्र्याग सौख्यकरसा सेवीं सुखें तन्वि! तो ॥

"प्रिये! हा बाग मी तुजसाठीं तयार करविला आहे. तर यांत तुला कोठें काय कमीपणा वाटतो तो मला सांग. तो दूर करण्याला मी थोडा सुद्धां विलंब लावणार नाहीं. एथें किती प्रकारचे वृक्ष, किती प्रकारचीं सुंदर सुंदर झुडपें, कसलीं कसलीं फुलें व वेली दिसत आहेत. पहा! तसेच हे पशु पक्षी जागोजाग यथेच्छ क्रीडा करीत आहेत, ती पाहून तरी किती मौज



वाटते! आपल्याला पाहून त्यांला यत्किंचित्‌ही भय किंवा शंका वाटत आहेसें दिसत नाहीं. हा वारा तरी किती मंद वाहत आहे, व आपल्या शीतळ स्पर्शानें सुखवीत आहे! याठिकाणीं प्रत्यक्ष शुकाचार्याचेंही अंतःकरण मदनवश होऊन वेडें होईल. मग साधारण जन जे आपल्या प्रियेसह क्रीडेच्याच उद्देशानें येथें येतील त्यांची काय अवस्था व्हावी! अशा बागाचें वर्णन कवि मोठें रसभरीत करितात, तें एरवीं

वाचतांना अत्युक्तिरूप वाटतें, पण अशा समयीं तें कीती खरें आहे हें स्पष्ट समजतें. आणि तूं बरोबर असल्यावर तर त्या वर्णनाचा प्रत्यक्ष अनुभव येतोसें भासतें !"

कोणी कवि बागेचें वर्णन करतो तें किती मनोहर आहे !

**कटाव.**

केळी रंभा बकुळि पोफळी, दाडिंभि बदरी निंब आंवळी, सरल तगर मंदार नारळी, पुन्नाग खदिर चंपकावली, वट वृक्षाची दाट साउली, किंचित विलसे वंच कावली, करवंदीच्या बहुत जाळी, फळें त्यांजवर फार दाटलीं, त्यांहूनि मधुरच आम्र आगळी, अश्वत्थोत्तम ज्याचे ठायीं, वास करी सागर जावाई, कीं जलचंदन सुगंधि पाहीं, उड्या घेतल्या सुर प्रियांहीं, वेष्टित वरती भुजंग शोभती, गंधाकरितां तत्पर असतीं, बिल्व तुळसी शमी दारुण, चिंच बदामी वंश अर्जुन, दिवस शोभती साग मार्गण, चाले तेथें ऐसें सवन, सुवर्ण चंपक आणि कृष्णागरु, काम लिंबकी देवदारु, रिठा बिभीतक भूमिरिंगणी, शोभा तेथें दिसे रंगिणी, कंटक अंकित वंश जोडतो, वृक्षराज बहु उंच तोडतो.

ऐसी शोभा ती पहाहो । दुःख नसे कोणाहो ॥ १ ॥

गुलाब पुष्पं बहुत दाटलीं, तेशी जाई सवन शोभली, शेवंति वर ते भ्रमर गुंजले, गुलदावरिचे वाफे शोभले, बकुली सुमनें दाट दीसती, तशीच विलसे शुभ्र शेवती, जुई नेवाळी गुलछबु धत्तुर, शुभ्र मोगरा सुरक्त करविर, अमर वासिचे दुर्लभ भारी, पारीजातक वेती नारी, अराटी कोराटी चमेली, दवणा मर्वा

पाच सांवळी, केतकी विष्णु शिरीं करि धारण, सुगंध उत्तम तयासि कारण, सहस्र पत्री कमल इंदिरा, निशिदिनिं साधारण करी सुंदरा.

ऐसी पुष्पें परिसाहो। आनंद तुम्हांला लाहो॥ २॥

सन्मुख विलसे पक्षिराज तो, रमावरातें प्रिय बहु दिसतो, सुवर्ण पिच्छे बर्हिमयूर, टाहो करिती सुंदर प्रचूर, वक्रनासिकी उत्तम कीर, शब्द बोलती मधुर मधुर, पिकजोडा सहकार तरुवर, चातक पक्षी आणि चकोर, चक्रवाक ते असति बरोबर, कपोत बुलबुल टिटवि मनोहर, वायस कुक्कुट बगळे वार, शब्दित करिती वन बहुवार, साळुंकी ही बोलत सुस्वर, आनंद वाटे मनासि भरपुर, बदक कोळसा गृध्र सुतार, चिमण्या चुँचुँ वारंवार, करिती तेशी चतुर सुगरी, रंग तरंगी भीति ततूरि, खंज चंचल जयास उपमा, अन्यत्र नसे अणुभर कामा, तित्तिर पक्षी भक्षित अग्नि, लावा तैसा उत्तम गगनी.

ऐसे पक्षी गण गगाहो। ऐका श्रोते जनाहो॥ ३॥

नंतर राजपुत्र म्हणतो, "यांत वर्णिल्याप्रमाणें सर्व प्रकार आहे किंवा नाहीं, पहा! तेव्हां आतां मी पुनः पहिलाच प्रश्न करतो कीं, विलासप्रिये! आणखी याठिकाणीं काय पाहिजे असें तुझ्या मनाला वाटतें?"

**मदालसा** म्हणते, "प्रियकरा! तुह्मी मला रंजविण्यासाठीं एवढे तत्पर असतां एथें कमीपणा असण्याचा संभव आहे काय? फक्त माझ्या मुखा वाटे वदाविण्याची व तें तुम्हीं ऐकण्याचीच जर तुमची इच्छा असली तर मी मनःपूर्वक आनंदानें म्हणतें कीं या विलासस्थानांत कांहीं एक उणें

नाहीं. पण माझ्यासाठीं आपल्याला एवढे श्रम पडले याचा वरीक मला खेद वाटतो. आपल्या ठिकाणीं जें माझें प्रेम आहे तें स्थिर होण्यासाठीं किंवा जास्त वाढण्यासाठीं अशा प्रयत्नांची कांहीं आवश्यकता होती असें मात्र नाहीं. आपल्या गुणामुळें मी आपल्याला नित्य सहजवश आहें. बागेची शोभा पाहून मला आनंद होईल, पण ती नसली म्हणून मी कधीं हट्ट घेतला आहे? हे मोठमोठे वृक्ष व त्यांजवर चढलेल्या वेली पाहून आपल्या आलिंगनाची आठवण मला होईल. पण यांस न पाहतांही आपल्या आलिंगनाविषयीं मी किती उत्कंठित असतें! या फुलांचें सौंदर्य न पाहतांही तुमच्या मुखाकडे पाहण्याला माझे डोळे किती लोभाविष्ट असतात! तेव्हां मजसाठीं जे एवढे श्रम घेतले हे मजवर उपकारच आहेत तरी ते घेतले नसते तर चाललें नसतें कां? मला वाटतें हा बाग माझे साठींच निर्माण केला असें म्हणण्यापेक्षा एथेंच त्याची फार आवड होती असें कां म्हणूं नये?"

ऋतुध्वजास प्रियेच्या या विलासयुक्त कोटिक्रमाच्या भाषणानें मोठा संतोष झाला. तिची हनुवटी धरून तो म्हणतो, "सखे! तुला खरेंच सांगतों, तुझ्या सान्निध्यानें मात्र ह्या बागेपासून मला इच्छित सुख लाभेल; तुजवांचून इतर तें मला कधीं मिळावयाचें नाहीं हें पक्कें समज. कदाचित् तुझ्या समागमानेंही बागेचें सुख मला अनुभवतां येईल. कारण तुझे कोमळ हात हे वृक्षलतांचे पल्लवच आहेत. तुझे तेजस्वी आणि सुंदर मुख हें कमळच होय. भुवया या त्यावरील भ्रमरपंक्ती होत. ऊरु हे केळी होत. गालामधील व हनुवटी वरील खळ्या ह्या पुष्करणी होत. उरावरील त्रिवली

या पाटासारख्या होत. गोरें व पुष्ट स्तनयुग्म हें निंब इत्यादि फळें किंवा चक्रवाक पक्षांचें जोडपें, किंवा क्रीडार्थ तयार केलेले पर्वतक इत्यादि होत ! तुझ्या शरीराच्या सुवासापुढें बकुलचंपक इत्यादि फुलांच्या सुगंधाची कोण इच्छा करील ? तुझ्या केशांपुढें मयूराच्या पिच्छकलापाची काय कथा ? डोळ्यांचें तेज पाहून हरिणांनीं पळून जाऊं नये तर काय करावें ? तूं अनुकूळ व गोड वाणीनें बोलूं लागलीस म्हणजे कोकिलकलरवाची काय मातब्बरी राहिली ? याप्रमाणें आणखी पुष्कळ वर्णन करतां येईल. पण तुझें सौंदर्य व वागेचें वैभव ही एवढीं विस्तृत आहेत कीं माझी तर काय-पण उत्तम कवीचीही वाणी केवळ अपुरती आहे असें खचित आढळून येईल. तर असें तुझें मनोहर वागरूप शरीर मला प्राप्त झालें असतां या कृत्रिम बागेची, सांग बरें, मला काय जरूर असावी ? हे गंधर्वकन्ये ! मग यावरून हें उघडच होत नाहीं काय ?—कीं तुला आनंद देण्यासाठींच व संतोषित करण्यासाठींच ही निर्माण केली आहे !"

**मदालसा** प्रेमाविर्भाव दाखवून हर्षानें म्हणते, "प्रियकरा ! एखाद्याची स्तुति झाली म्हणून किती करावी ? माझें रूप इतक्या वर्णनास पात्र आहे असें कांहीं मला वाटत नाहीं. तथापि ज्यापेक्षां आपल्याला तें तसें वाटतें त्यापेक्षां माझ्या रूपाचा मला मोठा अभिमान वाटतो. माझ्या जिवलगा ! जर मी आपल्याला एवढी स्पृहणीय वाटत आहें, तर खरोखरच माझें जीवित धन्य होय ! पण इतका वेळ चालल्यानें मी थकलें आहें; तर या समोरच्या क्रीडापर्वतावरील झाडाखालीं आपण अमंळ बसूं या."

या गोष्टीस राजपुत्राचीही अनुमति पडली व तीं दोघे

तेथें जाऊन बसलीं. थोड्याच वेळेनें त्यांच्या समोरून चाललेलें एक हरिणाचें जोडपें त्यांच्या दृष्टीस पडलें.

तेव्हां **मदालसा** म्हणते, "ही पहा मौज इकडे, ही हरिणी धांवत असून, तिच्या समागमाच्या इच्छेनें हा हरिणही



तिच्या मागून कसा चालला आहे. पण हें काय? त्यास या लांडग्यानें अवचित मध्यें येऊन अडविलें किहो! तो त्या विचाऱ्यावर अडव्या तिडव्या उड्या घालून खेळत खेळत मारून खाण्याच्या विचारांत आहेसें दिसतें. व हें सर्व कृत्य ती विचारी हरिणी दुरून भयभीत होत्साती पाहात आहे. हाय! हाय! काय करील बापडी तरी! ती पहा, ती या भयानें व दुःखानें विव्हळ होऊन खालीं धाडकन पडली सुद्धां! तर हे कृपाळू प्राणेश्वरा! दीनांचें रक्षण करणें हें आपलें गृहीत व्रतच आहे, त्या पेक्षां या वेळेस या लांडग्याच्या दाढेंतून या हरिणास सोडवा. विलंब लावूं नका. नाहीं तर आतां तो याला खाऊन टाकील. प्रिया! त्वरा करा! त्वरा करा! माझ्यानें हें नाहीं पाहवत!"

राजपुत्राच्या मनांतून लांडग्याला हुसकावून लावावयाचें होतेंच. तथापि पुढें काय मौज होते ती पाहावी म्हणून तो स्वस्थ पाहात बसला होता. परंतु **मदालसेचे** काकळुत-

वाणी शब्द ऐकून, त्याच्यानें धीर धरवेना. त्यानें तत्काळ बाण सोडून त्या लांडग्यास खालीं पाडलें. हें पाहून थरथर कांपत असतांहीं तो हरिण त्वरेनें आपल्या प्रियकरणीजवळ धावत जाऊन मोहानें तिचें अंग चाटूं लागला. कांहीं वेळानें ती हरिणीही शुद्धीवर येऊन उभी राहिली. आणि आनंदानें ते हरिणांचें जोडपें त्वरेनें उड्या मारीत मारीत तेथून दूर ठिकाणीं निघून गेलें. पशूंमधील हा अन्योन्य-प्रेमाचा चमत्कारिक प्रकार पाहून राजपुत्र व **मदलसा** यांस मोठें कौतुक वाटलें.

याप्रमाणें आपल्या भार्येसहित नित्यशः अनेक प्रकारच्या क्रीडा करून **ऋतुध्वज** आपला काळ सुखांत घालवूं लागला. पण असा कांहींकाळ लोटल्यावर त्यास या आयुष्य-क्रमाचा लौकरच कंटाळा आला. त्यानें विचार केला कीं, एके ठिकाणीं राहून असाच विलासांत काळक्षेप करणें चांगलें नाहीं. तर आपल्या शौर्यास व योग्यतेस शोभेल असें कांहीं-तरी चांगलें कृत्य आपण केलें पाहिजे. कारण म्हटलें आहे; जो मनुष्य खाणें पिणें व मौजा मारणें यावांचून अन्य कांहीं जाणत नाहीं, तो केवळ पशु असून भुईला भारच होय. असा विचार करून पित्याकडे जाऊन तो म्हणतो, "तात! माझे मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली आहे कीं, नित्य आपले हातून कांहीं तरी पुण्यकर्म व्हावें–कांहीं लोकोपयोग व्हावा. सुखांत व विलासांत नेहमीं निमग्न असून, एके ठिकाणीं आळसांत काळ घालवावा हें मला बरें वाटत नाहीं. तर या **कुवलयाश्वावर** बसून पुनः गोब्राह्मणांचें संरक्षण करण्यासाठीं रोज प्रातःकाळीं पृथ्वीवर संचार करावा असें म्हणतों. कारण या पृथ्वीवर शतावधि महापापी

दानव वास करीत आहेत, व जे लोक पुण्यकर्मांत गुंतलेले असतात त्यांस त्यांच्याकडून अनेक प्रकारच्या पीडा होत असतील यांत शंका नाहीं. तर त्या दुष्टांचा संहार करून, त्यांची बाधा पुण्यशील मनुष्यांस होणार नाहीं, असें करावें असें मनांत येतें. तर या बेतास आपली अनुज्ञा असावी."

हें पुत्राचें भाषण ऐकून शत्रुजित्‌राजास जो आनंद झाला तो गगनांत मावेना. तो आपल्याशीं म्हणतो, पुत्र



असला तर असाच असावा कीं जो पित्याचें प्रियच करील व त्याल नित्यश: आनंदच देईल. नंतर उत्साहानें तो पुत्रास अलिंगून म्हणाला, "वत्सा! तुझा विचार फार पोक्त आहे. तथापि मला एवढेंच सांगावयाचें—व तें बाप या नात्यानें मला सांगितल्यावांचून राहवत नाहीं—कीं त्वां इच्छेप्रमाणें रोज पृथ्वीवर फिरून, त्या अवकाशांत जे दुष्टांचें शासन होईल तें करून, दोन प्रहराचे आंत परत घरीं यावें व मला भेटावें. यापेक्षां जास्त वेळ बाहेर राहूं नये. कारण तुजवांचून आम्हा उभयतांना व तुझे भार्येला करमावयाचें नाहीं हें तूं जाणतच आहेस."

एवढी अट त्याजपासून कबूल करून घेऊन व त्याच्या मनोरथाचें अभिनंदन करून, त्याला जाण्याला परवानगी दिली. राजपुत्रही पित्याच्या वचनाप्रमाणें नित्यनेमानें प्रात:काळीं उठून घोड्यावर बसून, दोन प्रहर दिवसपर्यंत पृथ्वीवर

संचार करी, व सज्जनांचें क्षेम घेऊन व दुर्जनांचा संहार करून घरीं येई व बापाचे चरणवंदन करी. बाकीचा जो दिवस उरे त्यांत तो आपल्या भार्येसहित विहार करण्यांत घालवी.

इकडे नित्यसहवासानें **मदालसे**ला पतीचा हा कांहीं वेळ होणाराही वियोग कष्टप्रद वाटूं लागला. कुमुदिनीप्रमाणें दिवस उगवतांच तिचें मुखकमल म्लान होऊन जाई, व **ऋतुध्वजा**च्या वदनचंद्रोदयाची वाट पाहात वसे. एके दिवशीं **ऋतुध्वजास** येण्याला उशीर झाला असतां सुचेनासें होऊन ती आपल्याशींच म्हणते, "जातेवेळीं मला मुद्दाम सांगून ठेविलें होतें कीं, मी आज लौकरच परत येईन. सारीपाट खेळावा असें मनांत आहे. मलाही खेळण्याचा उत्सवच, मी केंव्हांपासून खेळाची वगैरे सर्व तयारी करून ठेविली आहे. पण अजून प्रियकराचें कां बरें येणें होत नाहीं ? नेहमीचाही वेळ टळून गेला. लौकर येईन म्हणून म्हटलें तेंही बाजूस राहिलें. पण रोजच्या पेक्षांही जास्त वेळ कां लागावा ? कांहीं कळत नाहीं.

(चिंतातुर होऊन)" माझा प्राणसखा सुखरूप असेलना? देवा! माझें पूर्वसंचित पुष्कळ होतें म्हणूनच माझी या नररत्नाशीं गांठ पडली. एरवीं मी गंधर्वकुमारी खरी, तरी राक्षसांच्याच भक्ष्यस्थानीं पडलें होतें कीं नाहीं ? त्यांतून सुटणें दुरापास्तच होतें. पण देवांनं सर्व गोष्टी अनुकूळ घडवून आणल्या. हे देवाधिदेवा ! हे गंधर्वकुळगोपना ! माझें आतां एवढेंच मागणें आहे कीं, हा हातीं लागलेला हिरा मला बहुतकाळ जिरावा !

"मी आपल्याकडून राजपुत्राला संतुष्ट ठेवण्यांत कांहीं उणें पडूं देत नाहीं. तिकडूनही मजवर राग होत नाहीं. राग होत नाहीं इतकेंच नाहीं, पण कमी जास्ती कांहीं झालें

तरी त्याची क्षमा होऊन, मला संभाळून घेतात. तरी काल मी थट्टेनें कांहीं लावून बोललें, त्याचा जरा तिथें राग आला, तो तर अजून मनांत शिल्लक नसेल ना ? त्यामुळें तर येण्याला वेळ लागला नसेल ? काय असेल तें असो. पण नेहमींच्या क्रमाप्रमाणें तो राग लौकरच नाहींसाही झाला होता; त्याचा एवढा दंश राहिला असेल असें वाटत नाहीं. छे, पण मी किती वेडी. अगदींच कीं विसरलें. माझ्यावर राजपुत्राचें किती प्रेम आहे ? तें मला माहीत नाहीं काय ? तो असल्या रागाचे तुकडे तुकडे करून टाकून, मजवरील कृपेचा ओघ एकसारखा अप्रतिबंध चालू ठेवील यांत संशय नाहीं."

" मला वाटतें मामजीकडून परस्परच बोलावणें होऊन तिकडे तर धाईनें जाणें झालें नसेल? पण तसें असतें तर माझ्या प्राणेश्वरानें मला तसा निरोप पाठविला नसता काय ? कारण त्याच्या विरहानें माझी काय दशा होते ती त्याला माहीत नाहीं असें नाहीं. बहुधा त्याला बाहेरच कांहीं मोठं काम पडलें असावें. हें काम काय बरें असावें ! राक्षसांशीं युद्ध करण्याचें तर नसेल ना ! मला या गोष्टीची बरीक भीति वाटते व मोठीच काळजी येऊन पडते."

" बरं, आतां आल्यावर मी हट्ट घेऊन बसेन ; कोठेंच बाहेर जाऊं देणार नाहीं. पण माझ्यानें एवढा हट्ट धेववेल काय ? पाहीन बरं वेववेल कीं नाहीं. आज बरी संधि आहे. मी पहिल्यानें बोलणारच नाहीं, मौनव्रत धारण करीन. आणि माझा प्रियकर माझी विनवणी करूं लागला म्हणजे सहजच बाहेर जाऊं न देण्याची माझी अट कबूल करून घेईन. वा ! चांगली संधि आली आहे !–पण माझ्यानें हें मौन धारण

करणं कांहीं वाईं होणार नाहीं. दुसरी कांहीं युक्ति असली तर त्तरी. कारण आपली तर अशी गत होते दृष्टीस पडतांक्षणींच:-

श्लोक.

"न पाहूं अशा बुद्धिनें लोचनाला
अत्या घातल्या स्वीकरूनी धिराला ।
तरी आवडी दृष्टि उन्मेष होई
न चाले कसा यत्न हा लेष बाई ॥ १ ॥

सख्याशीं न बोलेन ऐशा मतीनें
जिभेशीं जरी घातली खीळ मौनें ।
तरी हें कसें हासरें तोंड होई
मनोहेतु कीं सूचवी सर्व बाई ॥ २ ॥

जरी घट्ट चित्तास केलें विवेकीं
सरोमांच हा घर्म देहास झाकी ।
प्रियाच्याकडे धाव घे हेंहि मेलें
करूं काय गे यत्न कांहीं न चाले ॥ ३ ॥

प्रियाच्या सकृत् वक्त्रचंद्रोदयाला
पहातां क्षणीं मान जाई लयाला ।
टिकेना कसा निश्चयो अंतरींचा
सखीची घडे व्यर्थ ही बोधवाचा ॥ ४ ॥"

असा मनांत विचार करीत आहे, इतक्यांत घोड्याच्या टापा ऐकूं आल्या. त्यावरून बहुधा **ऋतुध्वज** आला असावा असें जाणून जागचे जागींच ती वाट पहात वसली. मनांत हेतु कीं आज कसेंही करून राजपुत्रापासून वाहेर न जाण्याचें कबूल करून घ्यावयाचें. **ऋतुध्वज** धाईनेंच आंत आला आणि पाहतो तों आज घरांत सर्वत्र सामसूमच दिसत आहे. रोज जशी **मदालसा** त्याच्या येण्याबरोबर उत्सुकतेनें पुढें येऊन विचारपूस करून त्याला आनंदवीत

असे, तसा प्रकार त्याला दिसला नाहीं. याचें त्याला मोठें आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " हें काय बरें ! येथें तर सर्व व्यवस्था करून ठेवलेली दिसत आहे. खेळाची तयारी करून ठेवली आहे, तशीच उपभोगाच्या वस्तूंची सिद्धता आहे. पण प्रिया कोठेंच दिसत नाहीं. हा काय चमत्कार आहे ! हें पाहून माझें मन तर अगदीं खट्टू होऊन जातें. तिच्यावांचून हें मंदिर कसें अगदीं उदास दिसत आहे!" असें म्हणत म्हणत चोहोंकडे त्यानें नजर फिरविली.

**ऋतुध्वजा**ची ती आश्चर्ययुक्त मुद्रा व **मदालसे**ला भेटण्याची उत्सुकता ही पाहून **मदालसे**ला त्याची फार काकळूत आली, तरी या लक्षणांनीं तिच्या मनास संतोष झाल्यावांचून राहिला नाहीं. त्याबरोबर तिला हशाची जी उकळी आली ती आवरेना. हा फिस फिस शब्द कशाचा होत आहे म्हणून राजपुत्र इकडे तिकडे पाहूं लागला, तों **मदालसा** एकीकडे खालीं मान घालून बसली आहे असें त्याचे दृष्टीस पडलें. तेव्हां जवळ जाऊन तो तिला म्हणतो, "प्रिये! **मदालसे**! हें आज तूं काय आरंभिलं आहेस? याचा मला कांहींच उमज पडत नाहीं. तूं अशी एकीकडे कां बसली आहेस ? मुक्याचें व्रत कां? तुला राग येण्यासारखें कोणी काय केलें ? –किंवा कांहीं संकट तुजवर आलें, झालें तरी काय ? तुझा शोक, तुझें संकट, तुझा राग घालविण्याला मी समर्थ आहें. तर मला वास्तविक प्रकार काय असेल तो सांग."

ती कांहींच बोलत नाहीं असें पाहून, तिची हनुवटी धरून, नको नको म्हणत असतां तो आणखी बोलूं लागला, " सखे ! असें बोलल्यावांचून रागावणें काय कामाचें ? यावरून दुसऱ्यानें काय समजावें ? तूं हें काय मनांत आणलें

अहिस हें मला खरोखरच कांहीं कळत नाहीं. तर पहिल्यानें मजशीं दोन शब्द बोल बरें?"

**ऋतुध्वजाची मदालसेवर** अतिशय प्रीति असल्याकारणानें तो तिच्या रागाचीं कारणें शोधून काढून तिची अनेक प्रकारें समजूत करूं लागला, व तिनें बोलावें म्हणून विनवणी करूं लागला. तेव्हां अधिक अंत पाहणें बाजवी नाहीं असें मनांत आणून ती **मदालसा** त्यास उत्तर देते, "प्रियकरा! आपण माझी विनवणी करावी एवढी कांहीं मी हट्टी नाहीं. मीही आपल्यास असेंच सांगतें कीं आपण आज काय मनांत आणलें होतें हेंही मला खरोखरच कांहीं कळलें नाहीं! माझा शोक, माझें संकट, माझा राग दूर करण्याला आपणच समर्थ आहां म्हणूनच येथें बोलावयाचें आहे. नाहीं तर इतराशीं बोलून काय फळ?"



**ऋतुध्वज** उत्कंठेनें उत्तर करतो, "सखे! बोल बोल लौकर बोल. मी कांहींएक आज मनांत आणलें नाहीं. तूं निःशंकपणें सांग. तुझ्या कष्टाचें निवारण जसें माझेकडून होण्यासारखें असेल तसें तें केल्यावांचून मी कधीं राहणार नाहीं. मला कळूं दे मात्र."

**मदालसा** म्हणते, "बरें तर सांगतें. पण अगोदर मला वचन मिळावें कीं माझें संकट दूर करीन असें."

**ऋतुध्वज** म्हणतो, "ही काय भलतीच शंका! मी तुला सुख देण्याला एवढा तत्पर असतांही तुला माझ्याविषयीं विश्वास येत नाहींना?"

**मदालसा** म्हणते, "छे छे! तसें नव्हे. पण आपलें उगाच म्हटलें, बरें असो. पण मी खरी खरी सांगीतली तर आपल्याला ती गोष्ट आवडणार नाहीं. कारण माझ्या कष्टांचें कारण आपणच आहां!"

असें ऐकून **ऋतुध्वज** खट्टू होऊन आश्चर्यानें म्हणतो, "म्हणजे! तुझ्या संकटाचें कारण मी? तो कसा? मी काय केलं बोवा? तुला पीडा देणारा अधम दुसरा कोणी नसून मीच निघालों? मी असा काय अपराध केला?"

**मदालसा** म्हणते, "प्रियकरा! आपणास राग येऊं नये. आपण कांहीं अपराध केला नाहीं, तरी पण मी खरेंच सांगतें, माझ्या कष्टांचें मूळ तुमचे पाशींच आहे!"

खिन्न मुद्रेनें **ऋतुध्वज** म्हणतो, "तें कसें बरें?"

**मदालसा** म्हणते, "आपण घरीं येण्याला विलंब कां लावतां? येण्याला उशीर झाला म्हणजे माझा जीव टांगणीस लागून राहतो हें ठाऊक नाहीं काय? यासाठीं माझी एवढीच पदर पसरून प्रार्थना आहे कीं, आपण मुळीं बाहेरच जाऊं नये असें मला वचन मिळावें! म्हणजे आपल्या वियोगानें जें दुःख होणार तें होणार नाहीं व उशीरानें जें भय उत्पन्न होतें त्याचेंही अनायासें निवारण होईल. यासाठीं मी असा निश्चय केला आहे कीं, आजपासून मी आपल्याला मुळींच दृष्टीआड होऊं देणार नाहीं. तर माझा निश्चय तडीस जाईल असें करावें म्हणजे माझें सगळें संकट दूर झालें! आणि हें विनाप्रयासानें आपल्याच हातून दूर होईल. इतरांचा एथें कांहीं उपयोग होणार नाहीं. (जरा थांबून) मग माझी एवढी विनवणी मान्य झालीना?"

**ऋतुध्वज** हर्षानें हसून म्हणतो, "वाहवा! एवढ्या साठीं-

च कां हा एवढा रुसवा ? हेंच कां एवढें संकट ! आणि निश्चय तरी किती दृढ आहे ! मला वाटलें होतें–दुसरें तिसरें कांहीं आहे. पण शेवटीं या एवढ्या द्राविडी प्राणायामाचें मूळ फारच अल्प आहे असें झालें. असो; मला येण्याला उशीर लागला व कित्येक वेळां लागतो ही गोष्ट खरी आहे. पण त्याचें कारण काय हें जर तुला कळलें तर, तूं ही विचारी आहेस व माझी खात्री आहे, कीं तुझा रुसवा क्षणभरही टिकणार नाहीं ! ”

हें ऐकून **मदालसा** म्हणते, “ खरेंच कीं काय ? मग आपल्या आजच्या उशीराचें कारण मला कळेल का ? ”

**ऋतुध्वज** म्हणतो, “हो न कळण्याला काय झालें ? याही पेक्षां मोठी गूढ गोष्ट असली तरी कळवितों–मग ही तर काय ?–मला ती नाहीं तरी सांगावयाचीच होती.”

असें म्हणून **ऋतुध्वज** आपल्या मित्राच्या भेटीचा वृत्तांत सांगूं लागला. तो म्हणाला, “ प्रिये ! आजचा दिवस कांहीं विलक्षण आनंदाचा गेला. आज अवचित् माझ्या दोवा बालमित्रांच्या भेटीचा लाभ झाला. अहाहा ! ते मित्र किती उपकारी आहेत ! त्यांचें अंतःकरण तरी मजविषयीं किती प्रेमभरित आहे ! असे मित्र मला मिळाल्यामुळें, मला वाटतें, मजसारखा धन्य जगांत मीच !

‘ मी लहान असतांना मजबरोबर खेळण्याला पुष्कळ लोकांचीं मुलें येत असत. त्यांच्यांत, पाताळलोकचा नागांचा राजा **अश्वतर** नामक आहे, त्याचे दोवे पुत्रही नित्य खेळावयास येत असत. **अश्वतर** नागराजा हा मोठा धार्मिक व पुण्यशील आहे; त्याला गुणांची फार आवड. परोपकार करण्याविषयीं तर त्याच्या इतका कोणीही मिळणार नाहीं. अशा त्या नागराजानें माझ्या वडिलांची

कृपा संपादून, आपले दोघा मुलांस माझ्या संगतींत राहूं देण्याविषयीं परवानगी मागून घेतली. मनांत हेतु इतकाच कीं,--आह्मी सहवासांत राहून एकमेकाचे गुण शिकावे व दोष असतील ते दूर करावे. याप्रमाणें आम्ही सर्व मुलें मोठ्या हर्षानें एकमेकांच्या संगतींत अनेक प्रकारच्या बाललीला करून दिवस घालवीत असूं व सायंकाळ झाला असतां आपल्या घरीं जात असूं. असे कांहीं दिवस गेल्यावर आमची एकमेकांवर फारच प्रीति जडली—ती इतकी कीं, आम्हांस परस्परांवांचून एक दिवसही चैन पडूं नये. आम्ही एकत्र मिळूनच स्नान, अभ्यंग, वस्त्रपरिधान, गंधानुलेपन, अलंकार धारण व भोजनसेवन इत्यादि गोष्टी करीत असूं. त्या माझ्या मित्रमंडळांतही हे माझे नागमित्र मला फारच आवडत असत. कारण ते मनमिळाऊ असून फार चतुरही आहेत. त्यांची वस्ती पाताळलोकीं असे. तिकडील नानाप्रकारच्या गोष्टी आम्हांस ते सांगून आमचें मन रंजवीत. त्यांच्या बरोबर पोहण्याला व लांकर चालण्याला मी शिकलों. अहाहा ! तो काळ किती मौजेनें गेला ! मनांत आपपर भेद नाहीं, कोणाचा द्वेष नाहीं, भय कसें तें ठाऊक नाहीं, सर्व जग आनंदरूपच त्या बालस्थितींत वाटत होतें. अशा निर्विकार निर्लेप सुखाचा अनुभव जो तेव्हां मिळाला तो मिळाला. या उपर तो केवळ दुर्लभच होय !

'अशा रीतीनें बालपण जाऊन, जों तारुण्याला आरंभ झाला, व जग म्हणजे काय ? त्यांतील रचना कशी आहे ? साधु, धार्मिक, सज्जन कोण ? त्यांस पीडा देणारे कोण इत्यादि गोष्टींचा भेद मला कळूं लागला, तसतसा

माझ्या खेळाचा मलाहि पोरकटपणा वाटून वीट येत चालला. व असें वाटूं लागलें कीं आपण कांहीं तरी कीर्तिकारक असें कृत्य करावें. असे विचार मनांत घोळत आहेत तों वडिलांकडे **गालवमुनी** येऊन त्यानें मला नेण्याची गळ घातली. ती मला समजतांच मला आनंद वाटून मुनीबरोबर पाठविण्याची मी आज्ञा मागितली. ती मिळाल्यावर मी मुनीबरोबर निघून गेलों. अर्थात् आमची मित्रमंडळी-ही आपापल्या घरीच गेली. तेव्हांपासून त्यांच्या पैकीं कोणाचीही भेट आजपर्यंत झाली नाहीं.

'तिकडे ते दोघे नागपुत्र—**चंद्रचूड** व **उच्छिखंडक** हे-ही नंतर आमचेकडे न येतां आपल्या घरींच राहूं लागले. कांहीं काळानें **पाताळ-केतूचा** पराभव करून त्याला मारल्याचा वृत्तांत पाताळलोकांत पसरला असतां, तो या दोघांच्या-हि कानीं गेला. **पाताळ-केतूच्या** वधानें नागलो-कांस सुख होऊन, पृथ्वी-चा भार हलका वाटूं लागला. माझे बालमि-



त्रांस माझे प्रतापाची ही कीर्ति ऐकून फार संतोष झाला व त्यांस माझे भेटीची उत्कट इच्छा झाली. पण त्यांच्या पित्यानें कांहीं अनुष्ठान मांडिलें असल्यामुळें, त्यांना भेटीस येण्याला बनलें नाहीं. कारण रोज समिधा फुलपत्री वगैरे आणण्याचें काम त्यांच्याकडे आहे व तेही स्वतः

धर्मिष्ट असल्यामुळं त्यांस पित्याची आज्ञा उल्लंघन करतां येत नाहीं. परंतु शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें त्यांची भेटीची उत्कंठा दिवसेंदिवस वाढतच गेली. शेवटीं सवडींत सवड करून आज ते आपले घरीं येण्यास निघाले होते; तों वाटेंत त्यांची माझी गांठ पडली.

'आमची दृष्टादृष्ट होतांच आम्ही तत्काळ एकमेकांस ओळखलें. व मला ते म्हणाले, "ऋतुध्वजा! महाभागा! बरा भेटलास, आम्ही तुझे भेटीसाठीं तुझ्याच घराकडे चाललों होतों. आपला वियोग होऊन फार दिवस झाले, नाहीं बरें!" असें म्हणून ते मला निरनिराळे कडकडून भेटले. कुशलप्रश्न वगैरे झाल्यावर, आम्ही जवळच वाहणाऱ्या नदींत स्नानें वगैरे करून तेथील वन्य फलमूळांनीं सर्वांनीं एकत्र उपहार केला. तो किती मिष्ट लागला म्हणून सांगूं! तशी गोडी आपल्या एथें जीं उत्तमोत्तम पक्कान्नें नित्य तयार होतात त्यांतही मिळावयाची नाहीं. नंतर आम्ही नव्या नव्या गोष्टी सांगण्यांत व पूर्वी ज्या बालक्रीडा केल्या त्या आठविण्यांत वेळ घालविला. आणि बराच वेळ झाल्यामुळें परस्परांचे निरोप घेऊन आपापल्या मार्गास लागलों—तर, प्राणवल्लभे! यामुळं मला येण्याला उशीर झाला. मग याबद्दल तूं काय आतां म्हणशील तें मला म्हण.'

असें भाषण ऐकून **मदालसा** लज्जायुक्त होऊन म्हणाली, "आतां काय म्हणायचं आहे? उशीराचें कारण तर अगदीं योग्य आहे. व तें तसें असेल असें मला वाटून चुकलेंच होतें. पण म्हणतातना—'ज्याला ठेच लागेल त्याला कळ येईल.' मग ती ठेच कोणत्याही प्रकारें लागो. आपलीं सगळीं कारणें खरीं असलीं तरी त्यांनीं मला जी काळजी लागते, ती म्हणजे

लेशमात्र कमी होतें असा अर्थ नाहीं. बरें तें असो. पण आपण आपल्या त्या मित्रांना येथवर कां नाहीं आणलें? तेही इकडेच येण्यास निघाले होते, त्यांना आग्रह केला असता तर ते आले नसते का? व आपल्याला एवढे प्रिय जे आपले लहानपणचे मित्र, ते माझ्या तरी दृष्टीस सहजीं पडले असते. मग आपण कां आग्रह केला नाहीं बरं?"

ऋतुध्वज म्हणाला, "हो, पुष्कळ केला. मी केला नसेन असें तुला वाटतें तरी? पण त्यांना सवडच नव्हती. प्रथमच मी सांगितलेंना कीं, त्यांच्या पित्यानें कांहीं एका अनुष्ठानास आरंभ केला आहे, व यांच्याकडे फुलपत्री मिळवून आणण्याचें काम आहे. त्यांतच वेळ काढून ते आज इकडे येण्यास निघाले होते. पण इकडे आल्यानें त्यांचा बराच वेळ मोडता व त्यांच्या कामांत व्यत्यय आला असता. यास्तव मीही आपला आग्रह सोडला. शेवटीं जाते वेळीं त्यांनीं मला आश्वासन दिलें कीं, 'पित्याच्या अनुष्ठानाला व्यत्यय येईल या अडचणीस्तव आतांच तुझे नगराकडे आम्हाला येतां येत नाहीं, याबद्दल आम्हाला क्षमा कर. पण आम्ही लौकर तुमचे भेटीला सावकाशपणें सवड करून येऊं.' असें म्हणून एकेकानें एकेक असे हे दोन रत्नमणि आपल्या शिरांवरून उतरून मला कृपाळूपणें अर्पण केले. ते हे पहा. तुजसाठीं मी संभाळून आणले आहेत. माझ्या आवडत्या मित्रांनीं भक्तीनें दिलेलीं हीं रत्नें तुझ्या मस्तकावर शोभत असावीं अशी हौस आहे. तर हीं घे."

**मदालसा** तीं रत्नें घेऊन म्हणाली, "हीं रत्नें फारच उत्कृष्ट आहेत. आणि हीं मित्रांनीं दिलीं असल्यामुळें तर अमूल्यच आहेत. तर हीं आपणच स्वतः धारण करावीं

असें मला वाटतें. अथवा–( आठवल्या सारखें करून ) आपलें बोलणें मला मान्य आहे. मात्र मजपाशीं असलेलें हें कंठभूषण आपण घालावें म्हणजे झालें. बाहेर न जाऊं देण्याचा माझा हट्ट कांहीं चालणार नाहीं हें मी समजतें. आणि आपल्या हातून प्रजापालनरूप जें सत्कार्य होत आहे त्याला अडथळा आणावा हेंहीं मला योग्य नाहीं. यास्तव हें कंठभूषण ग्रहण केलें तरी बरेंच कार्य झालें असें होईल. कारण, यांत असा गुण आहे कीं, जो कोणी हें घालील त्याच्या जीवाला मिळून कशाची धास्ती नाहीं. भूक तहान यांचीही पीडा होणार नाहीं. आपण बाहेर जातां, त्यावेळीं कोणतें संकट येईल याचा नेम नसतो. तर आपण हें धारण केलें असतां मला विशेष काळजी वाहण्याचें कारण उरणार नाहीं. हें मला माझ्या आईनें ममतेनें मुद्दाम दिलें होतें. आणि यामुळेंच त्या राक्षसाच्या अटकेंत असतां माझे दिवस निभावले. हें माझे लक्षांत नव्हतें. पण जेव्हां **कुंडला** येऊन मला भेटली तेव्हां तिच्या लक्षांत आलें व तिनें जाते वेळीं मला यास जपण्याविषयीं व याच्या उपयोगाविषयीं मुद्दाम बजावून सांगितलें. यापूर्वींच मीं आपल्यास हें दिलें असतें तर बरें झालें असतें. पण पहा मला कशी ती सयच नाहींशी झाली."

ठीक आहे असें म्हणून **ऋतुध्वजानें** तें कंठभूषण आपले गळ्यांत बांधलें व ते दिव्यमणि **मदालसेच्या** मस्तकावर चढविले. तेणेंकरून ती विशेष शोभूं लागली असतां तिला जवळ घेऊन तो म्हणतो, " प्रिये ! आतां तरी तुझा राग कांहीं कमी झाला का ?"

असें वाक्य ऐकून **मदालसा** म्हणते, " प्राणनाथ ! सर्व

समजूत झाल्यावर आतां हें लावून बोलणें कां हवें ? माझा राग तो कोठवर असणार ? जोंवर येथें ऐकणें आहे तोंवर. आम्हाला काळजी लागते म्हणून राग आणणें जरूर पडतें इतकेंच. नाहींतर राग कशाचा ! पण इतकें मात्र लक्षांत असावें कीं, हें कंठभूषण आपण जपून बाळगावें. आपल्यापासून दूर झालें तर मला मोठी भीति उत्पन्न होईल."

---

## प्रकरण पांचवें.

मागील प्रकरणांत सांगितल्या प्रमाणें **ऋतुध्वज** बाहेर जाऊं लागला म्हणजे **मदालसे**च्या आग्रहावरून कंठभूषण घालूनच जात असे. पण स्वतः त्याला त्याची आवड वाटत होती किंवा आवश्यकता वाटत होती असें नाहीं. आतां **मदालसे**च्या आग्रहाचीं कारणें दोन होतीं. एकतर तें गळ्यांत असतां **ऋतुध्वजा**चे जीवास कशापासूनही धास्ती नाहीं असें ती मानीत होती. आणि दुसरें असें कीं त्या भूषणानें तो कांहीं अलौकिक तेजानें शोभत असल्यामुळें त्यास पाहून **मदालसे**च्या डोळ्यांस मोठा संतोष होत असे.



एके दिवशीं नित्याप्रमाणें पृथ्वीवर संचार करीत असतां **यमुना**नदीचे कांठीं **पातालकेतू**चा कनिष्ठ भ्राता जो **तालकेतु** त्याची गांठ पडली. याठिकाणीं तो दुष्ट, मायेनें ऋषीचा वेश घेऊन व एक आश्रम बांधून बसला होता. त्यास

ऋतुध्वजानें अवलोकन करतांच, हा कोणी मोठा तपस्वी आहे असें जाणून, प्रणाम केला. तो तापालकेतूनेंही राजपुत्रास ओळखलें, व त्यास लागलेंच पूर्व वैराचें स्मरण झालें. तेव्हां त्या वेषधारी ऋषीनें



हाक मारून, त्यास म्हटलें "हे राजपुत्रा ! तूं सत्यप्रतिज्ञ आहेस असें तुझ्या तोंडावरूनच दिसत आहे. त्यापेक्षां मीं तुला सांगतों तेवढें माझें कार्य तूं कर. माझी प्रार्थना व्यर्थ करूं नको. पहा, तुम्हीं राजे लोकांनीं धर्मबुद्धि असलें पाहिजे. तुमचे कडून आम्हांस धर्माचरणांत साहाय्य मिळावें हें योग्य आहे !"

राजपुत्र उतावीळपणानेंच त्यास उत्तर करतो, "होय महाराज ! मी धर्माचरण करणाऱ्यास संकटांतून सोडविण्या-साठींच फिरत असतों. जर कोणी दुष्ट त्यांस पीडा करील तर त्याचा मी चांगला समाचार घेत असतों. यास्तव आ-पलें काय कार्य करणें आहे तें मोकळे मनानें मला सांगावें. मी तें केल्याशिवाय राहणार नाहीं !"

राजपुत्र मोठा उदार आहे व तसाच शूरही आहे हें त्या राक्षसास पक्केपणीं ठाऊक होतें. त्याशीं लढून आपला घड परिणाम कांहीं लागावयाचा नाहीं. यास्तव त्याला मायिक युक्तीनेंच फसवून नाशाप्रत नेलें पाहिजे, असें मनांत आ-णून त्यानें ही पुढील युक्ति रचली. तो म्हणाला, "राज-

पुत्रा ! तूं जसा शूर आहेस तसा उदारही बहुत आहेस. माझे मनांत धर्मार्थ यज्ञ व कांहीं इष्टिही कर्तव्य आहेत. परंतु, त्या यथासांग करण्यास द्रव्य पाहिजे हें तुला ठाऊकच आहे, तें मजपाशीं नाहीं. यास्तव, हे वीरा ! हें तुझें कंठभूषण मला दे. आणि मी जाऊन येईं तों पर्यंत या माझ्या आश्रमाचें येथें राहून रक्षण कर. मी आतांच यमुनेच्या जलांत बुडी मारून, सकळ जलाशयांचा व जलचरांचा राजा जो वरुण, त्याची प्रजांस पुष्टि देणारी अशी वेदोक्त वारुण मंत्रांनीं स्तुति करून व माझे यज्ञकार्यांत त्याचें साहाय्य संपादून लौकरच येथें परत येतों. तावत्काळ पर्यंत तूं मात्र येथें बैस. जाऊं नको. तूं हा आश्रम टाकून गेल्यास, मला पीडा देण्यासाठीं टपून बसलेल्या दानवादिकांकडून त्याचा विध्वंस होईल, व तूं केलेल्या उपकारांनीं उलट मला जास्त संकटांत लोटल्याप्रमाणें मात्र होईल."

हें त्या कपट्याचें लाघवी भाषण ऐकून राजपुत्राचें मन द्रवलें. तत्काळ त्यानें आपल्या गळ्यांतलें भूषण काढून त्याचे पुढें ठेवलें; मनांत कांहींएक किंतु आणला नाहीं. तें भूषण **मदालसेचें** होतें व तिनें तें दूर न करण्याविषयींही पुष्कळ सांगि... होतें, याची त्याला यावेळीं आठवण झाली नाहीं [illegible] नाहीं. पण त्यानें मनांत आणलें कीं या तपस्व्याची याचना मोडूं नये. मग घरीं गेल्यावर हा वृत्तांत **मदालसेस** सांगून तिची समजूत कशी तरी घालतां येईल.

राजपुत्र सरळ स्वभावाचा होता. त्यास राक्षसाच्या मायिक आडंबराची कांहींच कल्पना झाली नाहीं. साधु आणि असाधु यांचीं बाह्य लक्षणें दिसावयाला एक सारखींच असतात. भेद काय तो मनाच्या शुद्धीचा. असाधूंविषयीं म्हटलें आहे :—

### अभंग.

लटकें तें ज्ञान लटकें तें ध्यान । नामसंकीर्तन , नाहीं प्रिय ॥१॥
लटकाचि दंभ घातलें दुकान । चाळविले जन, पोटासाठीं॥२॥
लटकेंची केलें वेद पारायण । नाहीं तें स्फुरण, प्रेम कथे ॥ ३ ॥
लटका तो जप लटकें तें तप । समाधि ही झोप, व्यर्थ सारी ॥४॥
वाढविली दाढी जटेचा साक्षेप । व्यर्थ खटाटोप, सर्व जाणा ॥५॥

मोठ्या भक्तीनें कंठभूषण देऊन, राजपुत्र आणखी म्हणाला, "हे ऋषे! आपण स्वस्थ अंतःकरणानें आपल्या कार्यास जावें. आश्रमाच्या संरक्षणाची काळजी मनांत किमपि धरूं नये. माझ्या कुडींत प्राण आहे तों पर्यंत येथून मी हलणार नाहीं. तुम्ही वरीक इष्ट कार्य उरकून लौकर परत यावें."

राजपुत्रानें पुढें केलेलें कंठभूषण घेऊन तो वेशधारी राक्षस, आनंदित होत्साता, **यमुना**जलांत शिरला. व लगेच बुडी देऊन दिसेनासा झाला. आपण मोठें सत्कार्य केलें असें समजून, राजपुत्रही मनांत हर्षयुक्त होत्साता आश्रमाशींच निश्चित बसला.

इकडे तो वेषधारी राक्षस **यमुना** जलांत शिरला खरा; तरी त्यानें यज्ञाचें नुसतें ढोंग केलें असल्यामुळें, न दिसे अशा दूर ठिकाणीं बाहेर निघाला व कांठावर येऊन तसाच **ऋतुध्वजाचे** नगरास गेला. **अयोध्येस** गेल्यावर **शत्रुजित** राजास भेटून **मदालसा** व इतर जन यांचे समक्ष सांगूं लागला, "तुमचा **ऋतुध्वज** नामक महाशूर राजपुत्र आर्तत्राणार्थ रोज पृथ्वीवर फिरत असतोना? तो फिरत फिरत आमचे आश्रमीं आला. तों तेथें कोणीएक महादुष्ट पापी दैत्य येऊन आम्हा ऋषींच्या तपास विघ्न करूं लागला. म्हणून त्याच्याशीं त्या

वीरानें यथाशक्ति युद्ध केलें. परंतु तो दैत्य महामायावी असल्याकारणानें त्याचें निवारण न होऊन, दैत्यानें राजपुत्राचें वक्षस्थळ शूलानें विदारण केलें, व त्याला जमिनीवर पालथें पाडलें. तेव्हां त्याचे प्राण मरणक्लेशानें व्याकूळ होऊं लागले असतां, मी तेथें जवळच होतों, त्यानें मला हाक मारून हें आपल्या गळ्यांतलें भूषण मला दिलें व सांगितलें कीं 'माझे घरीं जाऊन ही माझी झालेली अवस्था त्यांस कळीव, व खुणेसाठीं हें कंठभूषण त्यांस दे.' असें बोलून त्यानें प्राण सोडला. त्याची अशी अवस्था पाहून कुवलयाश्वही दुःखसूचक खिंकाळून ओरडूं लागला. त्यास तो राक्षस घेऊन गेला. हें वर्तमान तुम्हांस कळविण्यासाठीं मी मुद्दाम आलों आहें. हें वर्तमान मोठें दुःखदायक तर खरेंच! व तें कळविण्याचें धैर्य न होऊन परत जावें असेंही माझे मनांत आलें. पण न सांगूनही उपयोग काय? कारण केव्हां तरी तें कळलेंच पाहिजे. फिरून, तें कळविण्याविषयीं राजपुत्रानें मला बजावून सांगितलें व मीही कबूल केलें होतें, म्हणून न सांगितल्यास मजकडे मित्रवंचन केल्याचा दोष येईल. खरा प्रकार झाला तो तुम्हांस सांगितला. यापुढें तुम्हांस जें



काय और्ध्वदेहिक कर्तव्य असेल तें करा. हें त्याचें कंठभूषण संभाळा, मी जातों." असें बोलून, कंठभूषण जमिनीवर टाकून देऊन, तो निघून गेला.

वरील दुर्वार्ता कानीं पडतांच ते सर्व लोक अत्यंत शोकानें विव्हळ होऊन गेले. तसाच राजा व राजपत्नी हीं दोघें दुःखित होऊन मूर्च्छेनें व्याप्त होऊन पडलीं. मग सेवकजनांनीं शीतोपचार केल्यावर भानावर येऊन तीं मोठ्यानें आक्रोश करून विलाप करूं लागलीं. त्यांच्या शोकाचें वर्णन एका कवीनें खालील पद्यांत किती सुरेख केलें आहे.

## पद.

( "अहारे देवा" या चालीवर. )

अहारे ईशा ! कसा झालासी रुष्ट ।
काय म्यां केलें कर्म तें दुष्ट ? ॥ ध्रु० ॥

ब्राह्मणासी कीं चरणें ताडिला ? ।
किंवा साधूंचा द्वेष बहु केला ? ।
म्हणुनि तान्ह्या सुकुमार बाळाला ।
मुकलें वाटे जीवा दयाळा ॥ १ ॥ अहारे० ॥

हरिणी पाडसा वियड पाडिला ? ।
ब्राह्मणान्नाचा नाश कीं केला ? ।
हा हा ! सकुमारा राजसा बाळा ।
मुकलें वाटे जीवा दयाळा ॥ २ ॥ अहारे० ॥

माझें तान्हें बाळक सुकुमार ।
काळें कैसा केला अविचार ? ।
दुजा नाहीं वंशीं या कुलभास्कर ।
म्हणुनि ईशा तुजवरी भार ॥ ३ ॥ अहारे० ॥

बाळक माझें देईवा ईशा ।

उदास भासति दाही्ही दिशा ।
तुजविण पुरवी कोण माझी आशा ।
दुःसह दुःख हें जाण जगदीशा ॥ ४ ॥ अहारे० ॥

झालें मी वांझ प्रसवुनी मुला ।
परदेशीं त्याविण झाले धरेला ।
बरें जरि सोडिता प्राण देहाला ।
तुज इशा स्तवीतें जोडुनी कराला ॥ ५ ॥ अहारे० ॥

इकडे **मदालसेची** तर विचित्रच अवस्था झाली. तिनें तें ओळखीचें प्राणप्रियाच्या गळ्यांतलें भूषण पाहतांच, आपला प्रिय मरण पावला, आपल्याला आतां वांचून काय कर्तव्य आहे ? असें मनांत आणून तत्काळ प्राणत्याग केला. याप्रमाणें राजवाडा जसा आक्रोशानें भरून गेला, तसें सगळें नगरही महाशोकानें अगदीं व्याप्त झालें ! सर्व लोक राजपुत्राचे गुण आठवून खेद करूं लागले. शेवटीं राजानेंच आपला शोक शांत करून, रडें आवरलें. आणि **मदालसेचें** शांतवन करावें म्हणून तिजकडे जाऊन पाहतो तों ती मृत होऊन पडली आहे ! हाय ! हाय ! केवढा हा घात ! पण झालें तें तिच्या गुणानुरूपच झालें असें मानून, शोक करणाऱ्या प्रजाजनांस तो बोलूं लागला, " जन हो ! या गोष्टींचा आतां तुम्ही शोक करूं नका. व मीही करीत नाहीं. कारण एथें आपण थोडेसे वेदांतांत शिरलें पाहिजे. आणि वेदांतही अशाच समयासाठीं उपयोगाचे आहेत असें मला स्पष्ट कळून येत आहे. तुम्ही आपल्या मनांत विचार करा कीं, मनुष्याचा देह हा केवळ अशाश्वत आहे. शास्त्रदृष्टीनें आत्मा मात्र अविनाशी आहे, आणि देह नश्वर आहे. सुखदुःखादि विकार व

संयोगवियोगादि पीडा ह्या आत्म्याला होणें नाहींत, देहाला आहेत. तेव्हां आत्मिक बुद्धिनें कोणाचाही वियोग होणें व तज्जन्य पीडा होणें हें अशक्य होय. यास उदाहरण प्रत्यक्ष **मदालसे**चेंच आहे! तिला आपल्या भर्त्याचा वियोग होतो असें वाटतांच शृंखलीभूत देहाचें विसर्जन करून, ती एकदम उत्तम लोकास गेली व सर्व दैहिक पीडेपासून मुक्त झाली! अर्थात् ती तेथें आतां आपल्या पतीसहित मोठ्या आनंदांत असेल. तर आपण देहबुद्धीनें एथें शोक करीत बसणें कांहीं योग्य नाहीं. ही लोकयात्रा तर चालली पाहिजे. आणि तिला अनुसरून आपल्यास आतां पुढील तजविजीस लागलें पाहिजे. हाच मार्ग आपलें दुःख विसरून जाण्यास उरला आहे.

"आणखी माझा मुलगा आज्ञाधारक होता, स्वधर्मचारी होता, यथाशक्ति गोब्राह्मणांचें रक्षण करीत होता, आणि माझ्या आज्ञेनें धर्मकार्य करीत असतांनाच त्याचा अंत झाला, तर त्याचें जीवित धन्य होय. अगोदर वीरांस युद्धांत मरण येणें फार उत्तम. त्यांत धर्माचरणानें व साधुसंतांचें रक्षण करीत येणें तर सर्वांत उत्तम. त्यास उत्तमलोकच प्राप्त होणार. मग ज्याच्या दैहिक पीडांचे निवारण होऊन ज्याला उत्तमगति प्राप्त झाली, त्याच्या मरणाबद्दल आपण किमर्थ शोक करावा? चांगल्या गोष्टीविषयीं कधीं कोणीं शोक केला आहे?

"तशीच ही त्याची पत्नी **मदालसा**, सत्कुलोत्पन्न असून महासाध्वी असल्यामुळें, स्त्रियांस पतिवांचून अन्य दैवत नाहीं असेंच मानीत होती. सर्वदा पतिधर्मास अनुसरून पतीच्या मनाला अनुकूळ अशीच वागत होती. यास्तव

हिनें पतीचा वध झालेला श्रवण करतांच तत्काळ स्वदेहाचा त्याग केला आणि पतीच्या समागमें उत्तमलोकास गेली. तेव्हां हीही जाणत्या लोकांनीं शोक करण्यास कशी योग्य होईल? जर कदाचित् पतीचा वियोग झाला असूनही वांचली असती तर मात्र शोक करण्यास पात्र होती. आतां तर हिनें केलें तें फार योग्य केलें. हिनें पतीचा वियोग क्षणमात्रही अनुभवला नाहीं. तेव्हां हिच्याहून आणखी धन्य ती कोण सांपडणार?

"अशा प्रकारें आपला पातिव्रत्यधर्म संभाळून माझी सून जी सौभाग्यानें पतीबरोबर आनंदांत वास करण्यास गेली, व जीनें आमच्या कुळास सत्कीर्तीनें उद्धरलें, तिचा आपण काय म्हणून शोक करवा? माझ्या पुत्रानेंही ब्राह्मणरक्षणार्थच प्राणत्याग केला व ब्राह्मणांच्या व माझ्या ऋणांतून मुक्त झाला. तेव्हां त्यानेंही माझ्या वंशाचें उत्तमत्व व आपलें शूरत्व स्पष्ट स्थापित करून आमच्या कुळास उद्धरलें, म्हणून त्याचा शोक करणेंही नीट नाहीं."

असें भाषण करून राजा गप्प बसला. प्रजाजनही राजाच्या बोलण्यास मान देऊन, पुढील तजविजीस लागले. राजपत्नी तर पुत्रमोहानें अगदीं विव्हळ होऊन गेली होती, पण तिनेंही राजाचें बोलणें ऐकून आपला शोक क्षणेक आवरला, आणि कांहींशी आनंदाची मुद्रा दाखवून पतीस म्हणूं लागली, "मुनींच्या रक्षणार्थ युद्ध करतां करतां माझा पुत्र मरण पावला, हें ऐकून जसा मला आनंद होत आहे तसा पूर्वीं माझ्या आईनें किंवा बहिणीनें किंवा जें मला कांहीं प्रिय असेल त्यानेंही कधीं दिला नाहीं. माझ्या पुत्रानें जी कीर्ती मिळविली ती कांहीं लोकोत्तर आहे. तीणेंकरून मी या भूतळावर धन्य

झालें, व माझ्या प्रसूतिजन्य क्लेशाचा परिहार झाला असें मी मानतें. जे अनेक प्रकारच्या व्याधीनें मरण पावतात, किंवा आपल्या बांधवांस स्वमरणानें दुःखित करतात, ते मातेच्या उदरीं व्यर्थ जन्मास आले असें जाणावें. जे याचकांस इच्छित द्रव्य देतात, मित्रांवर अनुग्रह करतात, शत्रूंचा निग्रह करतात, कधीं माघार घेत नाहींत, त्याचाच पिता पुत्रवान् व त्यांचीच माता वीरप्रसू म्हणावी. आणि या न्यायानें माझ्या पुत्रानें आपल्या सत्कृतीनें मला धन्य केलें असतां मी त्याचा शोक कां मानावा? पहिल्यानें अज्ञानानें क्षुद्र मानववृत्तीला वश होऊन मोह पावलें व शोक वाहात बसलें. पण आतां मला उलट आनंद व धन्यताच वाटत आहे."

यानंतर सर्वांचा शोकाग्नि शांत झाल्यावर, राजानें यथाविधि पुत्रपत्नीचें दहन करून, सर्व संस्कार केले व पुत्रास व तिला दोघांसही तिलांजली दिली.

इकडे **यमुना** जलांतून निघालों असें दाखवून **तालकेतु** राक्षस बाहेर आला. आणि राजपुत्र प्रणिपात करीत असतां, त्यास आशीर्वाद देऊन, तो मोठ्या प्रेमानें मधुर वाक्य बोलूं लागला कीं, " हे उदार राजपुत्रा! बहुत दिवसपर्यंत माझे मनांतून वरुणाचें यज्ञरूप कार्य कर्तव्य होतें. पण तसा योग आजवर आला नाहीं. आतां तुझे साहाय्यानें तो हेतु सिद्धीस गेला. हे तुझे मजवर मोठे उपकार झाले. साधुसंतांचा असा परामर्श घेतोस तेव्हां तूं धन्य आहेस. तूं हें केवढें तप करीत आहेस! राजे लोकांस प्रजेच्या कल्याणासारखें दुसरें मोठें तप नाहीं. तें तूं स्वबाहुबलानें करीत आहेस; म्हणून तुझे सदोदित कल्याणच असो. आतां तूं सुखरूप आपल्या घराला जा,

मीही आपल्या नित्यकर्माला लागतों." असें त्यानें म्हणतांच, त्या मायावी ऋषीस नमस्कार करून व त्याचा निरोप घेऊन, राजपुत्र आपल्या **कुवलय** अश्वावर आरूढ होऊन, **अयोध्या** नगराकडे येण्यास निघाला.

वाटेनें येत असतां त्याला फार अशुभसूचक शकुन होऊं लागले. वावटळी सुटल्या. त्यांच्या योगानें धुळीनें दशदिशा झाकल्या जाऊन, उदास दिसूं लागल्या. पशुपक्षी आर्तस्वर काढून ओरडूं लागले. डावे हाताला कोल्ह्यांची कुई ऐकूं येऊं लागली. हीं सगळीं दुश्चिन्हें पाहून राजपुत्र मनांत डचकला. परंतु त्यानें इकडे कांहीं लक्ष दिलें नाहीं. मातापितरांचे दर्शन घ्यावें व **मदालसेस** भेटावें याविषयीं तो फार उत्कंठित झाला होता. आणि आपलें राहणें मर्यादेच्या बाहेर कां झालें, असा प्रश्न त्या त्रिवर्गाकडून झाला असतां, आपण केवढें पुण्यकारक कृत्य केलें, तें सांगून त्यांस निरुत्तर करून कसें थक्क करून सोडूं या विचारांत तो गुंग होऊन गेला. यामुळें त्यानें आपला घोडा तडक शहराकडेसच चालविला.



नगरांत प्रवेश करीत असतां, सर्व नगरवासी जन "हा काय चमत्कार आहे?" अशा आश्चर्य भय व आनंद या मिश्र वृत्तीनें युक्त होत्साते, त्याजकडे चकित दृष्टीनें पाहात राहिले. या अपूर्व चिन्हाचें आश्चर्य करीत करीत **ऋतुध्वज**ही त्वरित राजवाड्यापुढें येऊन उभा राहिला.

त्यास पाहतांच द्वारपाळांनीं ती आनंदकारक वातमी धावतच राजास व राणीस विदित केली. ती ऐकून ही खरी किं खोटी याविषयीं संदिग्धांतःकरण आहेत तों प्रत्यक्ष राजपुत्रच समोर येऊन नमस्कार करूं लागला. अहाहा! काय त्या वेळच्या आनंदास पुसावें! दोन प्रहरीं जमिनीवर तळमळ करीत उडणाऱ्या मासळीस जसें पाण्यांत नेऊन सोडावें किंवा मरणोन्मुखास जीवन प्राप्त व्हावें तसा प्रकार त्यावेळीं झाला. त्याचें वर्णन करतांना, मोठा कल्पक कवि झाला तरी त्यालाही हात टेकावे लागतील. मग साधारण जनांची गोष्ट कशास हवी? यास्तव त्याची कल्पना करण्याचें वाचकांवरच सोपवून पुढील कथेस आरंभ करूं. कारण हा आनंद फार वेळ टिकणारा नसून, **मदालसे**च्या मृत्यूच्या वर्तमानानें राजपुत्रास जें दुःख होणार आहे त्यापुढें याचा कोठंच लोप होऊन जाणार आहे!

संस्कृतांत एक म्हण आहे कीं, "अत्यादरः शंकनीयः" म्हणजे कोठंही वाजवीपेक्षां फाजील आदर झाला कीं तेथें शंका घ्यावयाला कांहीं तरी कारण आहे असें समजावें. यास अनुसरून, पित्यास व नागरिक जनांस जो भारी आनंद वाटत आहे याचें कारण काय असावें याचें अनुमान बरोबर न झाल्यामुळें, राजपुत्रास संशय येऊं लागला. तो मनांत म्हणतो "माझ्या आगमनानें हे लोक एवढे आनंदानें वेडे कां बरे झालेले दिसत आहेत? यांस माझ्याविषयीं कांहीं वाईट वर्तमान कळलें होतें कीं काय? किंवा त्या मुनीस साहाय्य करून मी जें मोठें परोपकाराचें व सद्धर्माचें काम केलें तें यांच्या कानावर येऊन, हे माझें आनंदप्रदर्शनरूप अभिनंदन करीत आहेत? हा सगळा

प्रकार आहे तरी काय? तर याचा उलगडा आपण प्रत्यक्ष पित्यासच विचारून करावा हें बरें." असें मनांत आणून तो बापास म्हणतो, "तात! इकडील सर्व वर्तमान कुशळ आहेना? मला पाहून आपणा सर्वांस भारी आनंद झालेला दिसतो. तर याचें कारण काय हें माझ्या लक्षांत येत नाहीं. मला आपण कृपायुक्त होऊन सांगाल तर बरें होईल!"

पुत्रागमनानें **शत्रुजित्** राजाचें मुख जें प्रफुल्लित झालेलें दिसत होतें; तें त्याच्या या प्रश्नाबरोबर, एकदम म्लान होऊन गेलें. त्याच्यानें कांहीं वेळ मुळींच बोलवेना. कंठ दाटून आला. डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. शेवटीं मोठ्या अवसानानें तो इतकेंच बोलला "मुला! आम्हीं मात्र उभयतां कुशल आहों हें तूं पाहातच आहेस. बाकीच्या प्रश्नाचें उत्तर मी काय देऊं?" असें म्हणून तो जागचे जागींच विव्हळ होऊन स्वस्थ राहिला. तेव्हां जवळ सेवकजन उभे होते, त्यांनीं राजपुत्रास सर्व वृत्तांत निवेदन केला. "कोणी एक ऋषि मुद्दाम राजसभेंत येऊन राजास भेटला व त्यानें तुम्ही युद्धांत मरण पावल्याचें सांगून खुणेसाठीं आपलें कंठभूषण दाखविलें. अर्थात् ही दुर्वार्ता श्रवण करतांच, खरी मानून महासाध्वी **मदालसा** बाईसाहेब यांणीं प्राण सोडला." हे शेवटले शब्द ऐकून, आपले कानांत जणो तप्त तेल ओतलें कीं काय असें राजपुत्रास वाटलें. त्याला पराकाष्ठेचें दुःख झालें. तथापि मातापितरांच्या समक्ष तें दाखविण्यास तो लज्जायमान होऊन कांहींच न बोलतां जागचे जागीं मूर्च्छा येऊन पडला. मग सेवकांनीं उपचार केल्यावर शुद्धीवर येऊन चिंताक्रांत होत्साता तो आपल्याशीं म्हणूं लागला, "कायहो! ही स्त्री केवढी साध्वी म्हणून म्हणावी!

मजवरील तिचें प्रेम निरपेक्ष व उत्कट खरं! माझ्या मरणाची दुर्वार्ता ऐकतांच तिनें एकदम प्राण सोडला; केवढें हें धाडस! आणि मी पहा किती निष्ठुर, किती क्रूर, व किती नीच आहें! ती मृगलोचना प्रिया माझेसाठीं मरण पावली असून, मी अद्यापि जीव धरून स्वस्थ बसलों आहें! तस्मात् मी किती स्वार्थबुद्धि आहें? प्रियेपेक्षांही माझ्या प्राणांवर माझी जास्ती ममता आहे! हा माझा केवढा नीचपणा! धिक्कार असो मला! व माझ्या जीविताला!! प्रिये! मला आजवर वाटत होतें कीं, माझा तुजवर फार फार जीव आहे म्हणून. पण तें सर्व खोटें बरें!! हें तुझ्या पाठीमागें आतांच कींगे माझ्या अनुभवाला आलें! असें मला पूर्वींच कळतें तर मी वृथा प्रेम दाखवून तुला खचीत फसविलें नसतें! पण आतां काय करावें?"

अशा चिंतेंत तो गढून गेला असतां, त्याला रडण्याचे हुंदक्यावर हुंदके येऊं लागले. पण करतो काय बापडा? मनांत लज्जा उत्पन्न होऊन ती या हुंदक्यांस पारजिरवून टाकी. एकीकडून लज्जा आणि एकीकडून दुःखाचा जोर! अशा कोंडमाऱ्यांत त्याच्यानें तेथें बसवेना. मनाला उद्वेग वाटूं लागला. त्यानें ऊर भरून आला. तो रडून मोकळा करावा तर संकोच. अशा स्थितींत त्याचे डोकें चढून गेलें. मग मोठ्या वेगानें कसें तरी धैर्य करून तो उठला, आणि तसाच आपल्या मंदिराकडे निघून गेला.

मंदिरांत गेल्यावर त्याच्या शोकाला व विलापांना काय पुसावें! एवढा वेळ पर्यंत जो शोक त्यानें दाबून ठेवला होता, त्याचें एकदम सगळें उग्र स्वरूप प्रगट झालें! मनोवृत्तीचें विशद वर्णन करण्याविषयीं ज्याचा हातखंडा अशा एका कवीनें म्हटलें आहे:-

### श्लोक.

शोक–क्षोभ–प्रसर–शमनीं यत्न जो जो करावा
मोठ्या कष्टें करून हृदयीं सावधानें धरावा ।
त्यातें त्यातें मथुन पसरे अंतरीं हृद्विकार
क्षेत्रीं जैसा वितत सिकता–सेतुतें तोयपूर ॥

म्हणजे "शोकाला पूर आला असतां, त्याला अवरण्याचा जो जो यत्न करावा तो तो केवळ व्यर्थ होय. शेतांत पाणी फार तुंबलें म्हणजे तें जसें बांध फोडून बाहेर पसरतें तसा शोकही दाबून ठेविल्यानें वाढत जाऊन, शेवटीं हृदय फोडून रोदनाच्या रूपानें प्रगट होतो." ही उक्ति किती खरी आहे! **ऋतध्वजाची** स्थिति अशीच झाली. कारण त्यानें आपल्या प्रियेच्या मंदिरांत आल्याबरोबर, रामाच्या वियोगानें विव्हळ झालेल्या भरतादि आप्तजनांचाच प्रकार मांडला. त्याचें वर्णन पंडित करतात :—

### श्लोक.

मोकळा करून कंठ तेधवां । आठवून मनिं जानकीधवा ॥
ते रडे भरतही तसा रडे । जोंवरी नयन होति कोरडे ॥

रडून रडून दमल्यावर तो म्हणाला, "पण **मदालसेनें** प्राण दिला ही गोष्ट तरी खरी काय? किंवा तिनें माझी परीक्षा पाहण्यासाठींच हें कांहीं तरी गौडबंगाल केलें असावें?' असें म्हणून, तो उठला व "हा प्रिये! हा प्रिये!" असें ओरडत ओरडत सगळें मंदिर धुंडाळून पाहूं लागला, तर पण तेथें त्याला कोण सांपडणार? शेवटीं खट्टू होऊन 'आतां तेथील पदार्थांची उडवाउडव करण्यास सुरवात केली. तें तूं सांगितलेली ही वस्तु पहावी, ती पहावी, ही **मदालसेच्या**साठीं प्राणत्याग होती, ती तिला फार सुरेख दिसत असे."

आली कीं काय म्हणून वारंवार चहोंफेर दचकून पाहावें. मधून मधून रडण्याची उकळी यावी. पुनः कांहीं विचार मनांत येऊन स्तब्ध राहावें. तिचें बोलणें कसें, चालणें कसें, हें आठवावें; व तिच्या बरोबर ज्या अनेक क्रीडा केल्या त्यांचें स्मरण करावें. अशा स्थितींत तो म्हणूं लागला, "प्रिये! तूं दुराग्रही व कठोर हृदयाची कधीं नव्हतीस. मग तुला स्वप्राणत्यागाचें साहस कसें झालें? तूं मला दिलेलें कंठभूषण मी दुसऱ्यास दिलें म्हणून तुला राग आला काय? पण तुझा हा राग घालविण्याला फार वेळ लागला नसता. माझे हातून घडलेला परोपकार तुला कळता तर तो राग क्षणांत पार निवून जाता. मागें एकदा येण्याला उशीर झाल्यामुळें तूं रागवून बसली होतीस; आणि मी मित्रांच्या भेटीचा वृत्तांत सांगितला मात्र, तों तो रागविग तर गेलाच, पण उलटा तुला केवढा आनंद झाला, हें मी कसा विसरेन?

"दयाशीले! तुझी माझ्यावर ममता तरी किती होती! पण ती या समयीं गेली कुठें? मला आठवत नाहीं काय? उन्हाळ्याचे दिवसांत एकदा सायंकाळीं आपण **प्रियकरंडक** बागेंत जावयास निघालों होतों, तों तूं कांहीं कामांत गुंतली होतीस. म्हणून 'पुढें चलावें, ही मी आलेंच मागोमाग' असें म्हटल्यावर मी कुंजांत तुझी वाट पाहात, एका सेवकाशीं गोष्टी बोलत बसलों. वायूच्या मंद झुळकीनें बोलतां बोलतां मला किंचित् डुलकी आली; तों तो सेवक निघून गेला होता, त्या...लीस. तेव्हां मला निजलेला पाहून हळूच माझे मनोवृत्तीचें ...ला शालू पांघरूण घातलास. त्या बरोबर अशा एका कवीनें ...ऊन मीं म्हटलें, 'सेवका! पांघरूण क-

शाला रे!' तेव्हां हसून तूं म्हणालीस, 'सेवक कशाला पांघरूण घालील? त्याचें काय अडलें आहे? मींच घातलें. मला वाटलें, झोप फार सुखकर लागली आहे; जागें करणें चांगलें नाहीं. पण जागा पडली उघडी व वाराही थंड वाहत आहे, यास्तव अंगावर कांहीं असलें तर बरें. झोप मोडल्याबद्दल मला क्षमा असावी. खरोखर तसा माझा हेतु नव्हता!' अहाहा! ही गोष्ट कोण विसरेल? माझ्या सेवेवि-षयीं किती तुझी तत्परता! किती नाजुक प्रेम! व केवढी काळजी!! पण या समयीं ती तत्परता, ती प्रीति, ती काळजी कोठें गेली? आता तुझ्या मागें माझी काय कष्ट दशा होईल हें तुझ्या लक्षांत आलें नाहीं काय?

"पण खरें पाहतां, माझी दुर्वार्ता कानीं पडतांच तूं केलेंस तें योग्यच केलेंस! आपल्या कृतानें तूं आपली पतिनिष्ठा उत्कृष्ट प्रकट केलीस! मी मात्र कठोर हृदयाचा अद्याप जीव धरून राहिलों आहें! एवढे कठोर जे हे माझे प्राण त्यांचें शासन मला कोणत्याही उपायानें करणें अवश्य. तर मी काय करूं बरें? तुझ्यावांचून मला इतःपर कोठेंही सुख म्हणून लागणें नाहीं हें निश्चित आहे. तर पूर्वजन्मीं मी असाच कांहीं तुझा घोर अपराध केला असावा कीं, त्याचें फळ मला आतां तुझ्या मागें राहून भोगावें लागत आहे. प्रिये! सांग सांग, मीं तुझा असा काय अपराध केला बरें! तो मला अगोदर कळविला असतास तर मी त्याची निष्कृति करून, तुझें समाधान खचित केलें असतें. पण आतां त्या ज्ञाताज्ञात अपराधाबद्दल मी काय करूं बरें! तें तूं सां-गून तरी जातीस तर बरें होतें. तूं माझेसाठीं प्राणत्याग केलास तर मीही तुझ्यासाठीं करूं काय?"

राजपुत्राची अशी शोककारक स्थिति शत्रुजित् राजास सेवकांनीं जाऊन कळविली. ती ऐकून राजास पुत्राविषयीं मोठीं चिंता पडली. तेव्हां त्यास कांहीं बोध करून, शोकापासून परावृत्त करावें अशा हेतूनें राजा त्यास भेटावयास आला. तो मंदिराच्या दारांत आहे तों त्याच्या कानीं वरील शेवटलें वाक्य पडलें. त्याचें पोटांत धस्स झालें; आणि घाबरतच जवळ जाऊन राजा पुत्रास पोटाशीं धरून म्हणाला, "मुला! तूं हा काय अविचार मांडला आहेस? मीं ऐकिलें, तूं प्राणत्याग करूं इच्छितोस. पण हें कृत्य पुरुषास योग्य आहे काय? आत्मघातासारखें निंद्यकर्म कोणतेंही नाहीं असें शास्त्रें सांगतात, हें तुला ठाऊक नाहीं काय? आणि मुला! थोडा एथें विचार कर; तूं प्राणत्याग केलास तर त्या योगानें **मदालसेवर** तो काय उपकार होणार आहे? स्त्रियांना पतीवांचून दुसरी गतीच नाहीं. यास्तव त्यांनीं प्राणत्याग करण्यास प्रवृत्त व्हावें यांत कांहीं फारसें गैर दिसणार नाहीं.परंतु तसें पुरुषानें करणें योग्य होईल काय? 'हा प्रिये! हा प्रिये!' असा वारंवार विलाप करून, दैन्य धरून, रोदन करीत बसलास किंवा वियोगजन्य दुःख सहन न करतां प्राणहानि केलीस तर तुझ्या शौर्याला तें शोभेल काय? विचार कर, बाळा **ऋतध्वजा**, विचार कर, घाबरूं नको. आपण पुरुष असून, जर अशा शोकानें व्याकुल होऊन गेलों, अलंकारादिकांचा त्याग केला, वस्त्रहीन व कलाहीन होऊन दीन झालों तर शत्रु आपला सहज पराभव करतील. तुजसारख्या शूरास तो सहन होईल काय? आपणही प्राकृत जनांप्रमाणेंच जर वागूं लागलों तर मग आपण शूर ते कसले! वाऱ्याच्या जोरानें पर्वत हालूं लागले तर वृक्षांत व पर्वतांत काय अंतर

राहिलें? यास्तव याप्रसंगीं धैर्य सोडून उदासीन होणें योग्य नव्हे."

राजपुत्र म्हणतो, "तर मीं आतां काय करावें?"

**शत्रुजित्** म्हणतो, "तें तुला मी सांगतों. तुझ्या शौर्यास उचित असें वर्तन कर. शत्रूंचा पराभव करावा, परमपूज्य जो मी तुझा पिता व तत्समान जे साधुजन त्यांची सेवा करावी, हा उत्तम क्रम आहे. आजपर्यंत हाच क्रम तूं चालविलास व पुढेंही तोच तूं चालव म्हणजे झालें. आपण जर लोकोपकार करण्यासच प्रवृत्त झालों आहों—धर्मसंरक्षणासाठींच जर आपला अवतार आहे, तर या शरीरावर वास्तविक आपली सत्ता नाहीं; ती सर्व पित्याच्या व सज्जनांच्याच हातांत आहे. तर या शरीराचा विनियोग मी हवा तसा करीन म्हणून म्हणशील, तर तें बरोबर नाहीं. आपण जगांत जे निर्माण झालों आहों ते केवळ सुखोपभोगार्थच नव्हे. संसार करावा, सुखोपभोग घ्यावा यांत कांहीं वावगें नाहीं. पण ती गोष्ट कांहीं आपत्तीनें न साधली म्हणून जन्म फुकट गेला कीं काय? तर नाहीं. लोकोपकारपरायण होऊनही जन्माचें सार्थक करतां येतें. यास्तव हाच मार्ग तूं अनुसरावा असें माझें सांगणें आहे. शिवाय, तूं पुरुष आहेस; तुझी एके ठिकाणीं प्रेमहानि झाली तरी दुसरी स्त्री मिळण्याला कांहीं अडकाठी आहे असें नाहीं."

यावर राजपुत्र मान हालवून म्हणतो, "नाहीं तात! नाहीं. असें होणें नाहीं. मला माझ्या प्रियेवाचून दुसरे कोठेंच सुख लागावयाचें नाहीं. तिजवाचून सर्व विषयोपभोग मला विषाप्रमाणें होत. शिवाय जिनें माझ्या प्रीतीस्तव स्वप्राण त्याग केला, तिचा वियोग होतांच मी शुष्क सुखोपभोगांत मन ठेवूं काय?"

शत्रुजित् राजा म्हणतो, "बरें, पण विषयभोगाच्या त्यागानेंही, वास्तविक पाहतां, **मदालसे**ला कांहीं उपयोग होईल काय ? तरी एक होईल कीं अशा रीतीनें कांहीं पुण्यसंचय होईल, व त्या योगानें तिला उत्तम गति मिळावी अशी योजना केलीस तर तुला करतां येईल !"

राजपुत्र म्हणतो, "पण ही गति तर तिनें आपल्या पातिव्रत्यानें अगोदरच मिळविली आहे ! तर मग माझे हातून अधिक काय होणार ? मीं प्राणत्याग केला किंवा न केला तरी माझ्या हातून, तिचेवर अपकार उपकार किंवा ऋणमुक्तता या पैकीं कांहींच होणें नाहीं ! तिची पुण्याई किती लोकोत्तर आहे, व माझी कृति,– जी मला मोठी म्हणून वाटते, ती तिजपुढें किती अल्प !

"तेव्हां जोंपर्यंत माझ्या देहांत जीव आहे तोंपर्यंत **मदालसे**चा मला विसर कसा पडावा ? आणि तो जर पडणार नाहीं तर मला सुखाची वार्ता कशाला पाहिजे ? तथापि आपलीही आज्ञा मला अमान्य करवत नाहीं. यास्तव प्राणाचा त्याग करावयाचा नाहीं तर नाहीं, विषयभोगाचा तरी त्याग करावा असें मला वाटतें. ज्यापेक्षां क्षात्रवीर्य माझे अंगांत आहे, त्यापेक्षां एखाद्या नामर्दासारखी प्राणहानि करणें वाजवी नाहीं हें मी समजतों. यास्तव राजतेजाला उचित जो धर्म त्याला अनुसरून, सुष्टांचें पालन, दुष्टांचें शासन, धर्माचें रक्षण व पित्याचें पादसेवन हीं करण्यांत व आतां मी आपला काळ घालवीन; विषयाचें मात्र सेवन करणार नाहीं; हीच आतां माझी प्रतिज्ञा !

या प्रमाणें पित्याचा व सुहृज्जनांचा बोध मान्य करून **ऋतध्वजानें** विवेकानें आपला शोक आवरला, आणि नित्य

विरक्त वृत्ति धारण करून, गुणसंपन्न मित्रवर्गाशीं क्रीडा करीत स्वगृहांतच वास करूं लागला. असें हें इंद्रियनिग्रहरूप व्रत मोठें कठीण आहे. देवादिकांसही आचरण्यास कठिण; मग इतरांची काय कथा!

## प्रकरण सहावें.

**चंद्रचूड** व **उच्छिखंडक** हे दोघे पाताळलोकीं राहात असून, ते **ऋतध्वजाचे** परम मित्र होते, हें मागें सांगितलेंच आहे. तसेंच आपण लौकरच तुमचे घरीं सवडीनें भेटण्यास येऊं असेंही त्यांनीं **ऋतध्वजास** वचन दिलें होतें हेंही वाचकांस आठवत असेल. हें वचन पुरें करण्याचा प्रसंग जवळ आला. कारण त्यांचा पिता जो **अश्वतरनाग**, त्यानें आरंभिलेलें अनुष्ठान पूर्ण झालें, व त्याच्या बळानें त्यास सिद्धि प्राप्त झाली. पित्याचे हेतु परिपूर्ण झाले असून, तो प्रसन्नमुख आहे असें पाहून, त्या दोघा नागपुत्रांनीं हात जोडून, बोलण्यास आरंभ केला, "तात! आपण आम्हांस भूलोकांवर **ऋतध्वज** राज-पुत्राच्या समागमांत ठेविलें होतें. तो राजपुत्र मोठा गुणी व सच्छील असल्यामुळें आमचा फार स्नेह धरतो,



तसाच आम्हासही तो फार प्रिय वाटतो. त्यास भेटून आज फार काळ झाला. मध्यंतरीं एकदा आम्ही सवड करून त्याला भेटण्यास **अयोध्येस** चाललों असतां वाटेंतच तो आम्हांस भेटला. पण ती भेट चुटपुरती मात्र झाली. अजून त्याला भेटण्याची उत्कंठा फार आहे. गोड पदार्थ थोडा खाल्यानेंही तो आणखी खाण्याची इच्छा वाढत जाते, तशी त्याच्या अपुरत्या भेटीनें उलटी आमची उत्कंठा जास्त प्रबळ मात्र झाली. तर हे तात ! आम्हावर कृपा करून, त्याच्या नगरास जाण्याची परवानगी आम्हास द्यावी, व दोन दिवस त्याच्या संगतीचें सुख आम्हास घेऊं द्यावें."

नागेंद्र हास्य करून म्हणतो, " पुत्रहो ! बरें आहे. तुम्ही आपल्या मित्रास भेटून, त्याचा पिता **शत्रुजित्** राजा, याला प्रणामपूर्वक माझा निरोप सांगा कीं, बाल **ऋतध्वज** याची कीर्ति पाताळलोकांत विस्तृत होऊन, त्याचें आम्हा सर्वांवर मोठे उपकार झाले आहेत. त्यास दीर्घायुष्य असो. आतां मी एवढीच विनंती करीत आहें कीं, त्या वीरवत्साला आमच्याकडे चार दिवस भेटीला पाठविलें असतां आमच्यावर मोठे उपकार होतील. तरी ही विनंती अमान्य करूं नये."

पित्याचें हें भाषण ऐकून दोघा नागपुत्रांस फार आनंद झाला. कारण एकपट मागण्यानें दुप्पट मिळालें तर कोणास आनंद होणार नाहीं ! भेटीची परवानगी मागितली असतां, आपल्या मित्राला आपले घरीं पाहुणचाराला आणण्याची आज्ञा झाल्यानें हर्ष पावून, ते त्वरितच **अयोध्येस** निघून गेले.

पित्याच्या आज्ञेप्रमाणें व स्वतःच्या हेतूप्रमाणें **शत्रुजित्** राजाची परवानगी घेऊन ते **ऋतध्वजास** पाताळलोकीं आपल्या नगरास घेऊन चालले. वाटेनें, **ऋतध्वज** म्हणतो, "बाहवा नागमित्र हो! तुमचा पिता असें बोलला काय? त्यानें मला मुद्दाम घेऊन येण्यास सांगितलें? केवढें त्याचें दयाळु अंतःकरण! मला पाहण्याविषयीं त्याचें मन किती प्रेमयुक्त आहे! त्यापेक्षां माझ्यासारखा धन्य व पुण्यवान दुसरा कोण असेल! मलाही



त्याला भेटण्याविषयीं उत्कंठा झाली आहे. तर चला, लौकर लौकर त्याजकडे जाऊं! **मदालसे**चा वियोग झाल्यापासून मला अगदीं उत्साह वाटत नव्हता. पण तुमच्या पित्याची आज्ञा माझ्यानें मोडवत नाहीं; एरवीं कोठेंही जाऊं नये असा माझा व्रत होता."

**चंद्रचूड** म्हणतो, "मित्रा **ऋतध्वजा**! काय सांगूं! तुला अशा दुःखांत पहावें हें आमचें केवढें दुर्दैव बरें! **मदालसे**ला आम्ही पाहण्याला किती उत्सुक होऊन आलों होतों! पण व्यर्थ. तिला पहावें असें आमचें भाग्य कोठें आहे?"

**उच्छिखंडक** म्हणतो, "**मदालसा** अशी असेल, ती अशी बोलत असेल, ती अशी चालत असेल, आम्ही गेल्यावर ती आमचा असा सत्कार करील, अशा अनेक कल्पना आमच्या

मनांत येत असत. पण पहा, सर्वच प्रकार स्वप्नवत् झाला!

ऋतध्वज म्हणतो, "बाबानो रे! सर्व खरें! पण एवढ्या सुखाचे धनी आम्ही पापी कोठून असूं! ती स्वर्गलोकांतली गंधर्वकन्या! तिचा लाभ घडणेंच प्रथम मुष्कील! आणि घडला असतांही तो टिकणें अत्यंत कठिण! मला वाटतें ती माझ्या दृष्टीसच न पडती तर फार बरें झालें असतं! पण हाय! हाय! तसें कोठून होणार?"

डोळे पुशीत पुशीत उच्छिखंडक म्हणतो, "झाल्या गोष्टीस उपाय काय! यास्तव आतां आपणास ती विसरूनच गेलें पाहिजे. पण तुझा स्वभाव पडला फार भिडस्थ, मायाळु व खेदी. तूं असाच खेद करीत घरांतच राहिलास तर तुझ्या जिवाला धोका आल्याशिवाय राहणार नाहीं."

चंद्रचूड म्हणतो, "आमच्या तातांनीं याच खेपेस कां बरें तुला आणण्याला आम्हांस सांगितलें कोण जाणे! मग त्यांस तुजवरील संकट ध्यानयोगानें कळून आलें कीं काय न कळे. तुझ्या चित्ताला हिंडल्या फिरल्यानें, स्वस्थता वाटून हुशारी यावी याचसाठीं तातांनीं तुला बहुधा इकडे बोलाविलें असावें असा माझा तर्क धावतो—पण हे पहा आपण पाताळलोकांत येऊन दाखल झालों!"

ऋतध्वज म्हणतो, "वा: काय एथील रमणीयता आहे! माझें मन निरुत्साह असल्यामुळें जरी त्याला या रमणीयतेचा विकार फारसा होत नाहीं, तरी एकंदरीनें बरीच हुशारी वाटते यांत संशय नाहीं. तेव्हां एथील सृष्टि सौंदर्य विलक्षण खरें! एथील सर्व लोक तरुण असून हमेश कसे तेजस्वीच दिसतात! सुंदर हारादि अलंकारानीं सुशोभित होऊन ह्या पहा नागकन्या इकडे अशा हिंडत आहेत! नाय-

कन्यांच्या लावण्याची तर आमच्या इकडे प्रख्यातीच आहे. कोणी वीणा, कोणी वेणु, कोणी मृदंग इत्यादि वाद्यें वाजवीत आहेत व कोणी त्यांच्या सुरावर नृत्य करीत आहेत. याच प्रदेशांतून पूर्वीं एकदा मी विजय मिळवून व विजयलक्ष्मी अशी **मदालसा** घेऊन गेलों होतों. पण तेव्हांचा डौल कांहीं निराळा होता. तेव्हांचा हुरूप व तज्जन्य आनंद हा कांहीं विलक्षण! हल्लींचा कांहीं निराळ्या प्रकारचा आहे! यावेळेस मी काळानें पराभूत झालेला, प्रियाविरहित, एकटा, असा दीन अवस्थेंत या आनंदाचा अनुभव घेत आहे. दोनही वेळचा आनंद एकच खरा. तरी त्यांच्यातील सूक्ष्म भेद मोठ्या वहारीचा आहे हें स्वानुभवानें मात्र कळून आलें तर येईल."

थोड्याच वेळानें दोघे नागपुत्र, व **ऋतध्वज** असे त्रिवर्ग नागेंद्राच्या घराशीं येऊन पोंचले. घर मोठें भव्य असून, शृंगारलेलें होतें. आंत गेल्यावर पाहतो तों नागराज सुवर्णाच्या सिंहासनावर बसला असून, त्यानें दिव्य पुष्पें, वस्त्रें व रत्नखचित कुंडलें धारण केलीं आहेत, स्वच्छ मुक्ताफळांचे हार गळ्यांत घातले आहेत, व अनेक रत्नभूषणांनीं बाहु, मस्तक वगैरे शरीराचे अवयव अलंकृत केले आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. "हाच आमचा पिता" असें नागकुमारांनीं राजपुत्रास सांगितलें व पित्यासमोर हात जोडून उभे राहून "आमचा पुत्र **ऋतध्वज** तो हा आला आहे, अवलोकन करावा" असें म्हणून मजकडे बोट केलें. तेव्हां **ऋतध्वजानें** नागेंद्राच्या चरणांवर आपलें मस्तक ठेवून, नमस्कार केला; तत्काळ नागेंद्रानें उठून राजपुत्रास गाढ आलिंगन दिलें, व त्याचें मस्तक हुंगून "चिरं-

जीव" असा आशीर्वाद दिला. नंतर तो म्हणाला, "वत्सा! तूं धन्य आहेस. कारण तुझ्या पश्चात् तुझे गुण



सर्व लोकीं पसरत आहेत. तालकेतूचा व पातालकेतूचा पराभव केल्यामुळें आमच्या नागलोकास फार सुख झालें; हा सर्व तुझा प्रताप! यास्तव हे लोक तुला दुवा देत आहेत. तस्मात् मी तुला असा आशीर्वाद देतों कीं तुझे शत्रु नाश पावोत, तूं दीर्घायुषी हो. मातापितरांची सेवा तुझ्या हातून निरंतर घडो. तसाच तूं मनानें, वाणीनें व शरीरानें सर्वदा धर्मरूप गुणाचें आचरण करीत जा. जो पुरुष गुणवान् आहे त्याचेंच जिणें सार्थक होय; गुणहीन जीवंत असूनही मृतवत् जाणावा. गुणवानापासून देवता, पितर, ब्राह्मण व सज्जन हे आनंद पावून संतोषित होतात; यास्तव ते गुणवानाच्या आयुष्याची वृद्धि व त्याचेंच कल्याण इच्छितात."

(पुत्रांकडे दृष्टि फिरवून) "पुत्रहो! तुमचा हा मित्र मोठा सज्जन आहे. याचा समागम तुम्हास घडला, यास्तव तुम्ही भाग्यवान आहां यांत संशय नाहीं. आतां हा राजनंदन तुमचेकडे पाहुणा आला आहे. तर योग्य पाहुणचार करून

त्याला संतोषित करा. सुगंधि उटणीं अंगाला लावा, स्वच्छ उष्ण पाण्यानें स्नान घाला, उत्तम वस्त्रें अलंकार घालावयास द्या, व इच्छाभोजन देऊन, पुष्पतांबूलादि उपभोग समर्पण करा. नंतर आपण याशीं संतोषकारक गोष्टी बोलत बसूं."

पित्याची आज्ञा होतांच, मोठ्या आवडीनें, ह्या दोघा नागकुमारांनीं **ऋतध्वजा**चा फार उत्कृष्ट सत्कार केला. मग, स्नान, भोजन व तांबूलग्रहण झाल्यावर ते पुनः नागराजापाशीं येऊन बसले. तेव्हां पुनः राजपुत्राची प्रशंसा करून, नागेंद्र म्हणतो, "**ऋतध्वजा**! तुझें निरंतर कल्याण असो. तूं ज्यापेक्षां आमच्या घराला आला आहेस, त्यापेक्षां तुला ज्या वस्तूची इच्छा असेल ती आम्हापाशीं माग. बोलण्याला कोणत्याही प्रकारें मनांत संकोच धरूं नको. जसे हे दोघे माझे पुत्र आहेत, तसाच तूंही तिसरा आहेस. यास्तव हे जसे मजपासून जें जें लागेल तें तें मागून घेतात व मी त्यांची इच्छा पूर्ण करतों, तसें तूंही मागून घे; तुझीही इच्छा पुरविण्याला मी कमी करणार नाहीं! सोन्या रुप्याचे अलंकार आहेत, शोभिवंत बहुमूल्य वस्त्रें प्रावर्णें आहेत, नानाप्रकारचे सुखकर आसनशयनादि पदार्थ आहेत, तशींच उत्कृष्ट वाहनें आहेत, यांतून जें तुझ्या इच्छेस येईल किंवा तुझ्या लोकीं दुर्लभ असेल तें तूं सत्तेनें माग. किंवा याहूनही अन्य कांहीं इच्छा असली तर तीही निःशंकपणें मला कळीव."

**ऋतध्वज** म्हणतो, "भगवन्! तुमच्या प्रसादानें मला माझ्या घरीं कांहीं कमी आहे असें नाहीं. सुवर्णादिक सर्व वस्तु आहेत. मग मीं उगाच काय मागावें? आपण जसे पाताल लोकचें राज्य करीत आहां, तसा माझा पिताही पृथ्वीचें राज्य करीत आहे. तेव्हां मला कांहीं कमी नस-

त्यामुळें माझें मन याचना करण्याविषयीं घेत नाहीं. ज्यांचा पिता श्रीमान् असून जीवंत आहे, ते भाग्यवान् असल्यामुळें निश्चितपणानें स्वर्गतुल्य सुख भोगतात. मला सर्व गोष्टींची अनुकूळता आहे. मनोगताप्रमाणें वागणारे मित्र, निरोगी देह, अपरिमित द्रव्य, माझी काळजी वाहणारा पिता हीं सर्व मला अनुकूळ आहेत. किंबहुना शेकडों लोक माझ्या बापाच्या आश्रयानें वास करीत असून त्याची होईल ती आज्ञा झेलण्याला तयार आहेत. मिळण्यासारखी अमुक एक वस्तु म्हणजे मला पाहिजे आहे असें कांहीं दिसत नाहीं. आतां, आपल्या कृपादृष्टीचा लाभ मात्र निरंतर असावा एवढीच इच्छा आहे!"

**अश्वतर** नागेंद्र म्हणतो, "वत्सा! तुझें मधुर, समर्पक भाषण ऐकून मला फार फार संतोष झाला. जर तुला सुवर्णादिकांची अपेक्षा नसेल तर त्यांवाचून दुसरें जें तुझ्या मनाला प्रिय असेल तें मी तुला देतों. जी वस्तु मिळणार नाहीं असें तुला वाटत असेल तीही मिळणार नाहीं म्हणून कशावरून? कारण ईश्वरेच्छेनें या जगांत मिळण्यासारखी नाहीं अशी एकही वस्तु नाहीं."

**ऋतध्वज** म्हणतो "नसेल. पण माझी कोणत्याच वस्तूवर इच्छा म्हणून नाहीं. मग ती मिळविण्याचा हव्यास मला हवा कशाला? तुमचें दर्शन झालें हाच मला मोठा लाभ झाला. तुमची सदोदित कृपा असावी या परतें आणखी काय मागावें? तथापि जर तुमच्या मनांत मला वर द्यावा असेंच असेल, तर मला हेंच निरंतर असो कीं पुण्याचरण माझे हातून घडावें, सज्जनांचा समागम व्हावा, धर्माचें रक्षण व्हावें, व पितरांची सेवा घडावी."

नागेंद्रास त्याची काकळूत येऊन, तो म्हणतो, "हे ज्ञानसंपन्ना! तुझी बुद्धि धर्माच्या ठिकाणीं एवढी आसक्त असल्यामुळें, तूं जी जी इच्छा करतोस ती ती पूर्ण होईल. पण बालका! तूं असा दीन कां झालास? तुझें तोंड उतरलेलें कां दिसतें? तुझ्या हृदयांत कांहीं तरी जबरदस्त चिंता वास करीत आहे असें वाटतें. तर ती मला सांग पाहूं? मजकडून दूर होण्यासारखी असली तर मी दूर केल्याशिवाय राहाणार नाहीं."

नागेंद्राच्या या भाषणाचा **ऋतध्वजास** रोख समजला. पण लाजेनें त्याच्यानें कांहींच बोलवेना. तेव्हां तो साभिप्राय आपल्या नागमित्रांच्या मुखाकडे पाहूं लागला. त्याचा अभिप्राय जाणून, तो त्यांनीं पित्यास नमस्कार करून स्पष्टपणेंच कळविला. तो असा कीं:— "हे तात! याची **मदालसा** नामें प्रियपत्नी होती; तिला कोणी एका पूर्ववैरी दुष्ट दानवानें, 'तुझा पति मरण पावला' असें खोटें वर्तमान सांगून फसविलें. तेव्हां तें सत्यच मानून, तिनें तत्काळ प्राण सोडला. ही तिची आपल्यावरील अप्रतिम प्रीति जाणून व आपल्यासाठीं तिचें



स्वप्राणत्यागरूप साहस पाहून, त्यानें उदारपणानें प्रतिज्ञा केली कीं, याउपर मी **मदालसे**वाचून अन्य स्त्री वरणार नाहीं, व ती फिरून प्राप्त होणें दुर्घटच असल्याकारणें विषयभोगांचेंही सेवन करणार नाहीं. असें घोर व्रत तो प्रस्तुत आचरीत आहे. हेंच याच्या चिंतेचें मूळ. तिची प्राप्ति जर होणें नाहीं तर त्याला विषयसेवन केवळ विषाप्रमाणें आहे. मग त्या विषयांच्या प्राप्तीची काय इच्छा उरली? **मदालसे**ची प्राप्ति होणें जरी केवळ दुर्घटच आहे, तरी एकवार यास तिचें अवलोकन झालें असतां तेवढ्यानेंही त्याला मोठें सुख होईल. पण असें व्हावयाला तरी काय मार्ग आहे?"

यावर नागेंद्र म्हणतो, "प्राणिमात्रास मरण येऊन, एकदा वियोग झाला म्हणजे त्याचा फिरून संयोग स्वप्नावाचून किंवा शांबरी मायेवाचून कसा होईल?"

असें म्हणतांच, **ऋतध्वज** प्रेमभरानें उन्मत्त होऊन एकदम म्हणाला, "तात! ती **मदालसा** मायारूपी असूनही जरी माझ्या दृष्टीस पडेल तरीही पाहण्याला मी उत्कंठित आहें. एवढ्यानेंही मजवर मोठे उपकार होतील."

**अश्वतर** नाग म्हणतो, "वत्सा! तूं बालक असून, माझ्या घरीं पाहुणा म्हणून आला आहेस. तरी तुला संतोषित करणें हें मला अवश्य आहे. यास्तव अशा मायामयीसही जर तूं पाहण्यास इच्छितोस तर ये, तुला मी दाखवितों, चल." असें म्हणून तो त्यास अंतर्गृहांत घेऊन गेला. आणि जी दासीजनांनीं वेष्टिलेली असून, त्यांच्याशीं हास्यविनोदांत गुंतली आहे अशा एका सुंदर स्त्रीकडे बोट दाखवून म्हणाला, "हीच तुझी भार्या? नीट पहा!"

असें म्हणतांच, तत्काळ **ऋतध्वजा**नें उत्कंठापूर्वक चट-

कर त्या सुकुमारीस अवलोकन केलें; तों तीच आपली पत्नी असें जाणून, एवढा लज्जाविनयसंपन्न असतांही, उन्मत्ताप्रमाणें "हे प्रिये! हे प्रिये!" असें बोलत बोलत तिच्या जवळ जाऊं लागला. तेव्हां नागेंद्र त्याचें निवारण करून म्हणतो, "राजपुत्रा! हें काय? अरे ही माया आहे! हिला तूं स्पर्श करूं नको. याविषयीं तुला मी पूर्वींच सांगितलें होतें ना? तें अगदींच विसरलास? हें जाणूनही जर तूं हिला धरण्यास जाशील तर ही तत्काळ गुप्त होईल!"

हें ऐकतांच राजपुत्र निराशेनें तत्काळ मूर्च्छित होऊन भुईवर पडला. नंतर सावध झाल्यावर, "हे प्रिये! हे सुंदरि!" अशा वारंवार हाका मारीत, ती कशी प्राप्त होईल याविषयीं चिंताक्रांत झाला. मनुष्याची वासना किती विलक्षण आहे. तिला मर्यादा मिळून नाहीं. एक मिळालें कीं दुसऱ्याची इच्छा उत्पन्न होते, तें मिळालें कीं तिसरें हवेंसें होतें. अशा रीतीनें एकामागून एक मनुष्याची वासना कशी वाढत जाते या विषयीं कोणी कवि म्हणतो :—

अदर्शने दर्शनमात्रकामा
दृष्ट्वा परिष्वंगरसैकलोलाः।
आलिंगितायां पुनरायताक्ष्या-
माशास्महे विग्रहयोरभेदम्॥ *

**ऋतध्वजाची** अशी स्थिति पाहून, **मदालसा** आपल्याशीं म्हणूं लागली, "काय हो, या राजपुत्राचें अंतःक-

* वामन पंडितांनीं याचें भाषांतर केलें आहे तें असें :—

न पाहतां वाटतसे पहावें। आलिंगनोत्कंठ बघूनि व्हावें॥
आलिंगितांही मग काम पेटे। देहद्वया भेद न होउ वाटे॥१॥

रण मायाळु आहे! माझ्यावर हा किती तरी आसक्त आहे! याच्या या उपकारांची फेड माझ्यानें कधीं तरी होईल काय? वज्रप्राय शस्त्रांच्या प्रहारांनीं हा जो शत्रूंसही हार जात नाहीं, तोच आज हा शस्त्रप्रहारावांचून मूर्च्छा येऊन किंहो पडला! तेव्हां कामाचा प्रभाव कांहीं विलक्षण आहे! या नागेंद्रांनीं मी मायामयी आहें असें खोटेंच सांगून मला याच्या दृष्टीस पाडलें आहे असें दिसतें. परंतु माझें मन प्रियाला भेटण्याविषयीं किती उत्कंठित झालें आहे! त्यांच्या समक्ष मला कांहीं बोलतांही येत नाहीं. काय करावें?"

अशा चिंतेंत ती आहे तों **अश्वतर**नागानें **ऋतध्वजास** पोटाशीं धरलें आणि त्याचें समाधान करण्याच्या हेतूनें, **मदालसे**चा मृतसंजीवनादि पूर्व वृत्तांत कळविला. तो म्हणाला "**ऋतध्वजा**! त्या दुष्ट राक्षसानें कपट-वेश धरून तुम्हाला अगदींच फसविलें,—फार पीडा दिली. तुला मोह पाडून तुझा कंठहार हिरावून घेतला. तो खूण म्हणून **अयोध्ये**च्या जनास तुझ्या मरणाचा खोटाच वृत्तांत खरा भासविला आणि अशा प्रकारें **मदालसे**ला प्राणत्याग करण्यास लावून, तुझा सूड उगविला. पुढें माझे पुत्र तुला भेटावयास जाण्याविषयीं परवानगी विचारूं लागले असतां, मीं ध्यानयोगानें तुझें स्मरण करून तुझी स्थिति जाणली. व येते वेळीं तुला बरोबर घेऊन यावें असें सांगितलें—एवढ्या-साठीं कीं माझ्या पुत्रांवर अकृत्रिम प्रेम धरणारा व गुणसंपन्न जो तूं त्या तुझा तुझ्या प्रियेशीं पुनः संयोग करून द्यावा! मी ज्या अनुष्ठानास आरंभ केला होता, तें पूर्ण होऊन, मला नुकतीच इष्ट सिद्धि प्राप्त झाली होती, तिच्याच बळानें मी या **मदालसे**स पुनः संजीवन केलें. तर हे उदार राजपुत्रा!

या सुंदरीस मी आतां तुझ्या हवालीं करतों. ही घे, आणि चार दिवस आमच्या येथें हिच्यासह आनंदांत घालवून, नंतर पित्यास आनंदविण्यासाठीं भार्येसहित आपल्या नगरास जा!"

**मदालसे**च्या अकस्मात् पुनः प्राप्तिपासून **ऋतध्वजास** पराकाष्ठेचा आनंद झाला. आणि हा सर्व प्रभाव त्या दोघा नागमित्रांच्या स्नेहाचा असें जाणून त्यानें त्यांचे व त्यांच्या पित्याचे फार उपकार मानले. **अश्वतर** नागानें आणखी त्याचा आनंद वाढवावा म्हणून आपल्या घरीं मंगल करवून, नगरींतील लोकांसही उत्सव करण्यास आज्ञा केली. अशा उत्सवांत कांहीं दिवस तेथें राहून, **ऋतध्वज**, त्या **अश्वतर**नागराजाची व त्याच्या पुत्रांची आज्ञा घेऊन, **मदालसे**सहित **अयोध्ये**स निघून आला.

इकडे **शत्रुजित्** राजा फार वृद्ध झाला होता. त्यांत त्याला आणखी पुत्राच्या संसारविरक्तेमुळें फार दुःख वाटूं लागलें. राजपुत्र सद्गुणी होता, धर्मात्मा होता, यामुळें दुःखांत कांहीं सुख वाटत असे हें खरें. तरी, **ऋतध्वज** जर असा विरक्तवृत्तिच धरून राहील तर आपला वंश निर्मूळ होणार, या धास्तीनें तो चिंता करूं लागला. परंतु लौकरच नागलोकाहून पुनः **मदालसे**ची प्राप्ति करून **ऋतध्वज** आल्यामुळें, पुनः त्याच्या जिवास समाधान वाटून, वंशविस्ताराची आशा वाटूं लागली, व आपले वृद्धावस्थेचे अवशिष्ट दिवस तो सुखानें कंठूं लागला.

पुढें काळधर्मानें **शत्रुजित्** राजा मरण पावला असतां, त्याच्या जागीं सर्व नागरिकांनीं मिळून **ऋतध्वजाला** राज्याभिषेक केला. तोही पित्याप्रमाणेंच राजधर्म व गृहस्थधर्म आचरून प्रजेचें पालन करूं लागला.

## प्रकरण सातवें.

**ऋतध्वज** राजा न्यायी असल्यामुळें, त्याचें राज्य वैभवानें बहुत वृद्धिंगत झालें. त्यामुळें प्रजाजनांची त्याच्या ठिकाणीं प्रीति बसून, त्यास ते दुवा देऊं लागले. तसाच तो महापराक्रमी असल्यामुळें शत्रु थर थर कांपत असून राज्य निर्वैर झालें. याप्रमाणें जरी त्याचें वैभव सर्व प्रकारें वाढत चाललें होतें तरी संततीचें सुख त्याला मिळावें तसें मिळेना. हें मनांत येऊन त्याच्या चित्ताला दुःख होऊं लागलें. म्हणजे त्याला संतति नव्हती असें नव्हे; एका पाठीवर एक असे त्यास तीन मुलगे झाले होते, व ते मोठमोठेही झाले होते. पण त्यांच्या मातेनें जन्मतःच जो बोध त्यांस केला व पुढेंही जें शिक्षण त्यांस लावलें, त्याच्या योगानें ते संसाराविषयीं अत्यंत विरक्त झाले. पहिला पुत्र झाला, तेव्हां त्याचें नांव राजानें मोठ्या आवडीनें **सुबाहु** असें ठेवलें. हें नांव ऐकून राजाच्या सेवक जनांस मोठा संतोष झाला; कारण हें नांव राजतेजाचें दर्शक आहे असें सर्वांस वाटलें. पण **मदालसा** मात्र हसूं लागली.



बाळक उताणा निजलेला आहे, जवळ **मदालसा** बसली आहे, तों तो बाल रडूं लागला. म्हणून त्यास उचलून घेऊन शांतवन करण्याच्या निमित्तानें ती म्हणते, " हे बाबा बाळका ! तूं अत्यंत शुद्ध आहेस. तुला नाम नसून प्रस्तुत तुझें

सुबाहु असें नांव ठेविलें आहे हें कल्पनेनेंच ठेविलें आहे. यास्तव लक्षांत आण कीं, जो हा तुझा पंच भूतात्मक देह आहे तो कांहीं तूं नव्हेस; तर शरीरापासून अगदीं पृथक आहेस. मग तूं वृथा दुःख मानून कां रडतोस? तसाच तूं आत्म्यापासून जरी उत्पन्न झाला आहेस, तरी तुला राजपुत्रत्व जें प्राप्त झालें आहे तें केवळ सोपपाधिक मात्र आहे. यास्तव जोंवर जगांतील मायागुणानें तुझें शुद्ध स्वरूप कठोर झालें नाहीं, तोंच तूं हें खरें तत्व समजून मुक्त हो, रडूं नको. पहा, तुझ्या इंद्रियांच्या ठिकाणीं जे अनेक प्रकारचे गुण आहेत ते सर्व कल्पित आहेत. कारण शरीराच्या ठिकाणीं जे पंचभूतांचे विकार होतात तेच मुळीं जर निर्गुण आहेत, तर मग शरीरस्थ जीं इंद्रियें त्यांस सगुणता कशी येईल? आतां त्यांची वृद्धि व नाश कसा होतो म्हणून म्हणशील तर मी तुला सांगतें. ऐक. अन्नोदकभक्षणांनीं देहाची मात्र वृद्धि होते. वस्तुतः त्या देहांत वास करणारा जो तूं पुरुष त्या तुझ्या ठिकाणीं वृद्धि व नाश हीं दोन्हीही संभवत नाहींत. जसें अंगावर कवच धारण करावें, तसा देहरूप कवचानें तूं बद्ध झाला आहेस. तेव्हां नुसती या शरीरास पीडा झाली असतां किंवा त्याचा नाश झाला असतां, मी मरण पावलों असें समजून, मूर्खत्व संपादन करूं नको. ज्यापेक्षां आपण सृष्टींत उत्पन्न झालों आहों, त्यापेक्षां सृष्टिनियमानेंच यथाक्रमानें आपल्या शरीराची वृद्धि, क्षय, व नाश, हीं होणार आहेत. मग त्यांच्यापासून भय पावून दुःख करण्याचें काय प्रयोजन आहे? जीवांचीं जसजशीं शुभाशुभ कर्में असतील, तसतसे त्यांस देहबंध प्राप्त होतात. त्यांनीं देह-

दशेंत मूढपणानें अहंबुद्धि धरली कीं ते बद्ध होतात. याच-प्रमाणें देहसंबंधानें कोणी पिता, कोणी पुत्र, कोणी माता, कोणी भार्या, असें मानून, त्यांच्या ठिकाणीं जो ममता धरतो तो बद्ध होतो; जो धरीत नाहीं तो मुक्त होतो. यास्तव, कोणाचें कर्म कसेंही असो; तूं मात्र सर्वदा सर्व प्राणिमात्रांचा बहुमान करीत जा." अशा प्रकारचा उपदेश वारंवार करून **मदालसा** बालकाचें शांतवन करीत असे.

तो बालक प्रतिदिवशीं जसजसा वाढूं लागला, व जसजसें त्यास बल व बुद्धि हीं अधिकाधिक प्राप्त होत चाललीं, तस-तशी ती राजपत्नी **मदालसा** त्यास वैराग्याचाच बोध करीत गेली. त्यामुळें त्यास ब्रह्मचर्याश्रमांतच आत्मज्ञान प्राप्त होऊन, गृहस्थाश्रम न पत्करतां, तो वैराग्य धरून तपश्चर्ये-साठीं अरण्यांत निघून गेला.

नंतर **मदालसेस** दुसरा पुत्र झाला, त्याचें नांव पित्यानें **विक्रांत** असें ठेवलें. तेव्हां पुनः ती हास्य करून, याही पु-त्रास खेळविण्याच्या निमित्तानें लहानपणापासून उपदेश करूं लागली. हाही पुत्र वडील भावाप्रमाणेंच ज्ञानसंपन्न होऊन विरक्त झाला. तिसरा पुत्र झाला त्याचें नांव **शत्रु-मर्दन** असें ठेवलेलें ऐकून, **मदालसा** पूर्वीप्रमाणेंच हसून, त्यासही ब्रह्मज्ञानोपदेश करूं लागली. याप्रमाणें तिघांही मुलांस वैराग्य प्राप्त होऊन ते संसार सोडून अरण्यांत जाऊन तपश्चर्या व ध्यानयोग करूं लागले.

असें पाहून **ऋतध्वज** राजा खिन्न होऊन म्हणूं लागला, "अहो ! मी एवढें राज्य वृद्धिंगत केलें त्याचा उपयोग तो काय? मला तीन पुत्र झाले, पण त्यांपैकीं एकालाही राज्याची इच्छा नाहीं. सगळेजण वैराग्य धारण करून,

वनांत गेले. तर या माझ्या राज्याचा उपभोग कोण घेईल? व या प्रजाजनांचें रक्षण कोण करील? तसेंच मला माझ्या पश्चात् व माझ्या पूर्वजांना पिंडोदक कोण देईल? **मदालसा** ही सुविचारी असल्यामुळें, या आपल्या पुत्रांस ब्रह्मज्ञानोपदेश करून, विरक्त करण्यांत तिचा काय हेतु असावा? वंशविस्तार व्हावा असें तिला वाटत नाहीं काय? कांहीं असो; यापुढें जो पुत्र होईल, त्यास वैराग्य येणार नाहीं असें केलें पाहिजे."

कांहीं काळ गेल्यावर **मदालसेस** चौथा मुलगा झाला. त्याचें नांव ठेवतेवेळीं पूर्वीप्रमाणेंच ती हसूं लागली. म्हणून **ऋतध्वज** तिला म्हणतो, "भद्रशीले **मदालसे**! मी पुत्राचें नांव ठेवूं लागलों म्हणजे तूं हसतेस याचें कारण काय? **सुबाहु, विक्रांत, शत्रुमर्दन,** अशीं तिघांचीं सुशोभित नांवें मीं ठेविलीं. तीं क्षत्रियांस साजेशीं असून, शौर्यादि गुण प्रगट करणारीं अशीं आहेत. असें असून ज्यापेक्षां तूं वारंवार हसतेस, त्यापेक्षां या चौथ्या मुलाचें नांव तुला आवडेल तें ठेव."

**मदालसा** आणखी हसूनच म्हणते, "महाराज, आपली आज्ञा मला शिरसा मान्य आहे. आणि आपण जर मला सांगाल तर मी याचें नांव **अलर्क** असें ठेवतें."

आश्चर्यानें राजा विचारतो, "हे सुंदरि! **अलर्क** असें अर्थरहित तें तूं काय नांव ठेवलेंस? यांत तुझा काय अभिप्राय?"

**मदालसा** उत्तर देते, "पुत्राचें नांव ठेवणें ही केवळ व्यावहारिक कल्पना आहे. कांहीं तरी नांवें ठेवावयाचीं. पण तुम्हीं जीं सार्थक म्हणून नांवें ठेवलीं तीं मात्र अगदींच निरर्थक आहेत असें मी समजतें!"

**ऋतध्वजाचें** आश्चर्य या उत्तरानें अधिक वाढलें. तो विचारतो, "निरर्थक! तीं कशीं? नवीन राज्यावर स्वाऱ्या कराव्या, पराक्रम करावे, शत्रूस जिंकावें हे क्षत्रियांचे धर्म असून, या नांवांवरून हे धर्म व्यक्त होत नाहींत काय?"

**मदालसा** उत्तर देते, "महाभाग! आपण म्हणतां हें बाह्यतः सर्व खरें आहे. तरी मला वाटतें, ब्राह्मण क्षत्रिय इत्यादि भेद उपाधीनें मात्र होत, वस्तुतः तसा भिन्नभाव नाहीं. आतां तुम्हीं सार्थक म्हणून जीं नावें ठेविलीं तीं कशीं निरर्थक आहेत पहा. देहपुरींत व्यापून राहिल्यामुळें ज्यास 'पुरुष' अशी संज्ञा आहे, तो एकच आहे व तो कोठेंही जात येत नाहीं. आणि 'विक्रांत' म्हणजे तर या देशांतून त्या देशांत जाणें येणें. म्हणून जो पुरुष सर्वव्यापक असल्यावरून, ज्यास कोठेंही जाणें येणें संभवत नाहीं, तोच याच्या शरीरांत असल्याकारणानें, त्यास '**विक्रांत**' हें नांव फुकट आहे असें माझ्या बुद्धीस वाटतें! तसेंच, तो पुरुष अमूर्त असल्याकारणानें पहिल्या मुलाचें नांव जें '**सुबाहु**' हेंही खोटेंच होय! आतां तिसऱ्याचें नांव '**शत्रुमर्दन**!' पण अगोदर मला सांगा, कीं तो पुरुष सर्वांच्याही शरीरांत व्यापून असल्यामुळें कोण कोणाचा शत्रु व कोण कोणाचा मित्र? प्राणिमात्राच्या ठिकाणीं क्रोधादि भावना मायाबलानें उत्पन्न होऊन, ते परस्परांचा नाश करितात; आणि तो तरी त्यांच्या शरीराचा मात्र नाश होतो. निर्गुण, निराकार, अगोचर अशा पुरुषाचा नाश कसा होईल? यास्तव नामकरणाची कल्पना व्यवहारासाठीं मात्र होय. मग या चवथ्या मुलाचें मी **अलर्क** असें गुणविकाररहित नांव ठेवलें त्यांत काय गैर केलें?"

**मदालसेचें** भाषण राजास आवडलें नाहीं. किंचित् रागानेंच तो म्हणाला "**मदालसे**! पूर्वींच्या तिघा पुत्रांप्रमाणें यालाही असला ज्ञानोपदेश तूं करणार कि काय? हे मूढे! ते तिघे पुत्र मला असून, तूं दुष्ट उपदेशानें बिघडवून टाकिलेस व नसल्यासारखेच केलेस, तसाच यालाही करून माझ्या संततीचा उच्छेद करूं पहातेस काय? तर मी तुला एकच सांगतों कीं, तुला जर माझा संतोष करणें असेल व माझें वाक्य मान्य करणें असेल, तर या पुत्राची तरी प्रवृत्तिमार्गाकडे योजना कर. ज्ञानमार्गाचा जरी कितीही प्रसार झाला तरी त्यामुळें कर्ममार्ग कांहीं नाहींसा होईल असें नाहीं, कांकीं कर्माचा अभाव झाला तर पितरांस पिंडोदक कसें मिळेल? देवांस बळी कोठून मिळतील? अतिथींचा सत्कार कोण करील? कृमिकीटपतंगादि जंतूंचें उपजीवन कसें चालेल? यासाठीं हे सुकुमारांगि! जें क्षत्रियांस योग्य असेल तेंच कर्म करण्याकडे या मुलाची प्रवृत्ति कर."

पतीची आज्ञा मान्य करून **मदालसा** यापुढें तसाच उपदेश करूं लागली. "हे बालका, तूं वृद्धिंगत होऊन, आपल्या गुणकर्मांनीं पित्याच्या मनास आनंद दे. मित्रावर उपकार व शत्रूवर अपकार करीत जा. पराक्रम करून जगांत वैरी म्हणून कोणी उरूं देऊं नको; सर्व पृथ्वीवर एकछत्री राज्य बहुत काळपर्यंत कर. प्रत्येक पर्वणीस ब्राह्मणांस अन्नोदकादि दानांनीं तृप्त करीत जा. आप्तजनांचें इच्छित पूर्ण करीत जा. सज्जनांचें हितचिंतन करीत जा, परस्त्रियांकडे मन जाऊं देऊं नको. आश्रितजनांस द्रव्यादिकानें, स्वकीय स्त्रियांस कामोपभोगांनीं व शत्रूस युद्धानें संतुष्ट करीत जा. तसाच हे वीरा! तूं बालरूप होऊन

बांधवांच्या मनास, कुमाररूपानें आज्ञापालन करून वडील माणसांच्या व गुरूच्या मनास, तरुणरूपानें स्वकीय स्त्रियांच्या मनास आणि वयानें व ज्ञानानें वृद्ध होऊन, सद्धर्माचारानें सज्जनांच्या मनास हमेश आनंदवीत जा. अशा रीतीनें वागलास तर त्यानें इहलोकीं सुखोपभोग प्राप्त होतील व परलोकींही उत्तम गति मिळेल. तर हाच बोध नीट ध्यानांत धर."

अशा उपदेशानें ती **मदालसा अलर्कास** हातोहातीं घेऊन खेळवीत असतां, तो दिवसेंदिवस वयानें व बुद्धीनें वाढूं लागला. कौमारावस्था येतांच पित्यानें यथाविधीनें त्याचें उपनयन केलें. पुढें एके समयीं त्यानें **मदालसेस** प्रश्न केला, "हे माते! परलोकीं व इहलोकीं सुख प्राप्त होण्याला मी इतःपर काय करावें? हें तूं मला सांग."

पुत्राच्या प्रश्नाचा आशय जाणून ती उत्तर सांगते, "वत्सा! साधारणतः संसारी मनुष्यास जो बोध करणें योग्य तो मी आजपर्यंत करीत आलेंच आहें. आतां तूं मोठा झालास. तुला लौकरच राज्य करावें लागेल. वास्तव राज्याभिषिक्त राजानें काय करावें याचें आज थोडक्यांत दिग्दर्शन करतें. वत्सा! राजांचें मोठें तप म्हटलें म्हणजे यथान्याय प्रजापालन हें होय. हें तप साधणें मोठें कठिण आहे. यासाठीं राज्याभिषेक झाल्या दिवसापासून, त्यानें स्वधर्मास विरोध न येईल अशा रीतीनें, प्रजांचें रंजन करीत असावें. व्यसनांचा त्याग करावा. हीं व्यसनें कोणतीं म्हणून विचारशील तर, परस्त्रीसंग, द्यूत, हिंसा, मद्यपान, कठोरवाक्य, अपराधापेक्षां अधिक दंड, व अदोषावर दोषस्थापन अशीं आठ आहेत. राजेलोकांनां इतरांपेक्षां या आठांचेंच भय विशेष "आपला अंतस्थ विचार बाहेर फुटूं देऊं नये, म्हणून

राजानें फार जपावें. कारण तो फुटला तर, स्वामी, प्रधान, सुहृद, भांडार, राज्य, किल्ला, सैन्य, व नगरवासी जन अशा आठ प्रकारें राजाचा नाश होतो. शत्रूपासून उपद्रव होऊं लागला तर प्रधान दुष्ट आहे, निदान दुर्बळ असून निरुपयोगी आहे; शत्रूवर दाब असून ते आपापले जागीं दबून आहेत तर तो प्रधान उत्तम होय; अशी प्रधानाची परीक्षा करून एकनिष्ठ लोकांचा संग्रह करावा. चहोंकडे बातमीदार ठेवून शत्रूकडील बातमी हमेश काढीत असावें. कदाचित् प्रसंगविशेष पाहून शत्रूवरही विश्वास ठेवावा. पण एकाएकीं मित्र, आप्त व बंधु यांच्यावर विश्वास ठेवूं नये. तसेंच नीति जाणत्या राजानें राज्याची पूर्वस्थिति व वृद्धिक्षय हीं नित्य जाणावीं.

"कीर्ति हा राजाचा फलोपभोग, पराक्रम हें धन व सामदामदंडभेद इत्यादि त्याचीं साधनें होत. यास्तव या साधनांचा कसा कोठें उपयोग करावा हें अवलोकनानें हमेश शिकत असावें. शत्रु कितीही प्रबळ असला तरी हरप्रयत्नानें त्याला चित करावें, म्हणजे कीर्ति वाढते. मुंग्या जशा बहुत मिळून शक्तिपेक्षां अधिक कृत्य करतात, तसें राजानें जिकडे तिकडे सैन्य पसरून शत्रूचा मार्ग अडवून धरावा. अग्नीच्या ठिणगीसारखा प्रथमतः शत्रूच्या राज्यांत प्रवेश करून व पुढें अग्नीप्रमाणेंच वृद्धि पावून त्याचा नाश करावा.

"पण ही कीर्ति, हें धन, व हा साधनांचा उपयोग हीं त्यास कशीं प्राप्त होतील? यासाठीं त्यानें पहिल्यानें आपल्या मनाचें संयमन करावें. कामक्रोधलोभादि हे मनुष्याचे अंतःस्थ शत्रु आहेत. त्यांस जिंकल्यावांचून, कोणी कसाही प्रबळ झाला किंवा मोठा बुद्धिमान झाला, तरी तो बाहेरच्या

शत्रूस जिंकण्यास कधींही समर्थ होणार नाहीं. वरांत वारणाऱ्या सर्पाचें निर्मूळ न करतां व्याघ्रादिकांच्या उपद्रवाचें निवारण करण्याच्या भरीस अगोदर कोण पडेल? यास्तव हे पुत्रा! या षड्रिपूंचें अगोदर नीट दमन कर. यांच्या पायीं कैक जणांची दुर्दशा झाली आहे हें लक्षांत आण. पूर्वी **पंडुराजा** पराक्रमी असून तो कामाचे ठिकाणीं आसक्त झाल्यामुळें रोगी होऊन मरण पावला. तसाच क्रोधानें **अनुल्हाद**, लोभानें **पुरूरवा**, मदानें **वेनराजा**, मानानें **बळी**, हर्षानें **पुरंजय** इत्यादि मोठमोठे राजे काम क्रोधादि शत्रूंनींच पराजय पावून धुळीस मिळाले व हल्लीं कित्येक मिळत आहेत. यास्तव यांविषयीं सावध रहा.

“कोणापासूनही गुण असेल तो अवश्यक घ्यावा. कावळ्यापासून एके क्षणांत सर्वत्र चंचल दृष्टी फिरवून सावध कसें राहावें हा गुण घ्यावा. कोकिळापासून मधुर बोलणें, भ्रमरापासून रसज्ञता, हंसापासून गुणदोषनिर्णय इत्यादि प्रत्येकापासून कांहींना कांहीं जो गुण शिकण्या सारखा आहे तो शिकावा. हे अल्पबुद्धीचे प्राणी आहेत असेंच केवळ मानूं नये. नीतीच्या संरक्षणासाठीं सूर्यचंद्राप्रमाणें सर्व पृथ्वीस अवलोकन करीत असावें. आणि सर्वांत ध्यानांत ठेवण्यासारखी मोठी गोष्ट ही कीं जारिणी स्त्री जशी पातिव्रत्य दाखवून, मनांत प्रिय पुरुषाचें चिंतन करीत असते, तसें राजानें राज्य करीत असून मनांत परमात्म्याचें चिंतन करीत, जलांतील कमलपत्रासारखें निर्लिप्त असावें. याप्रमाणें राजधर्माची कांहीं दिशा मीं दाखविली. एवढी ध्यानांत ठेवशील तरीही, मुला! तुझें हित झाल्याशिवाय राहणार नाहीं.”

**अलर्क** पुनः आनंदित होऊन मातुश्रीस प्रश्न करतो, “हे

महाभाग्यशालिनि माते! ही राज्यनीति मीं ऐकिली. पण वर्णाश्रमधर्म तूं सांगितले नाहींस. ते ऐकावे अशी इच्छा आहे."

पुत्राच्या या प्रश्नाचें अभिनंदन करून, तिनें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांचे धर्म कोणते, त्यांनीं आपापलें उपजीवन कसें करावें, तसेंच चारीही आश्रमांतील कर्तव्याकर्तव्यकर्म कोणतीं इत्यादि विचार सविस्तर सांगितले. ते मनांत धरून **अलर्क** तसाच वागूं लागला. लहान वय असतांच आसपासच्या राज्यांवर स्वाऱ्या करून, त्यानें त्यांस जिकलें, व आपला पराक्रम सर्वत्र गाजविला. परंतु यांच्यापैकीं पुष्कळ राजे **ऋतध्वजा**चे स्नेही असल्यामुळें ते त्याजकडे वारंवार **अलर्का**च्या तीव्र प्रतापाचें गाऱ्हाणें नेऊं लागले. तेव्हां **अलर्का**स **ऋतध्वजा**नें अनेक सौम्य विचार सांगून पाहिले, पण तरुणपणाच्या मदामुळें ते त्यास रुचत नाहींत असे दिसूं लागलें. इतर गोष्टींत जरी तो राजाचें ऐकत असे तरी राज्यप्रकरणांत त्यानें निराळाच क्रम चालविला. अर्थात् हा क्रम **ऋतध्वजास** अवडला नाहीं. त्यास पुत्राच्या पराक्रमाचें जरी कौतुकच वाटे तरी त्याच्या स्वच्छंदी व हूड वर्तनापासून राजास दुःख होऊं लागलें. तेव्हां एके दिवशीं तो **मदालसेस** म्हणाला, "भद्रशीले!
माझ्या तीन मुलांची तशी अवस्था झाली; आतां याची
राज्यकार्याकडे स्थापना करावी तर हा फार स्वच्छंदी वर्तन
करतो. यानें मला दुःख होतें, व पुढील काळ सुखानें
कसा जाईल हा विचार मनांत येऊ माझे प्राण व्याकुळ
होतात. तर तूं याजला असा काय पदेश केलास? यासाठीं
माझी तुजला फिरून अशी आज्ञा आहे कीं, या मुलाला
सौम्य विचारांचा उपदेश करून तो माझ्या मनाला संतोष

देईल अशाविषयीं याचें मन वळीव. असें न होईल तर वृद्धावस्थेंत मला दुःख होऊन, त्यांतच माझा अंत होईल!"

**मदालसा** म्हणते, "महाराज! आपण ज्ञानी आहां. मी आपणास कांहीं सांगावें असा माझा अधिकार नाहीं. तरी गोष्ट निघाली त्या अर्थीं मी बोलतें. आपल्या मर्जीस न आल्यास क्षमा करावी. आपण **अलर्कास** राजनीति शिकविण्यास मला आज्ञा केली त्याप्रमाणें मी ती त्याला शिकविली, तसे अनेक गृहस्थधर्मही सांगितले. आणि तो बुद्धिमान आहे व त्याप्रमाणेंच पुढें वागेल यांत शंका नाहीं. तो आतां मोठा झाला आहे, व आपली वृद्धावस्था झाली आहे. यासाठीं माझी आपल्यास अशी विनंती आहे कीं आपले व्यवसाय आतां पुरे करावे व या मुलाची राज्यावर स्थापना करून, आपण तपश्चर्येसाठीं वनांत जावें. मीही आपल्याबरोबर येणार. यासाठीं आपण महाप्रस्थानाच्याच तयारीस लागावें."

हा विचार **ऋतध्वजास** मानवला. त्यानें लगेच **अलर्कास** बोलावून आणलें, प्रधानादिकांसही जमविलें, व त्या सर्वांस आपला वानप्रस्थानाचा बेत कळविला. वानप्रस्थाश्रम मोठा कठीण आहे, व राजसुख भोगलेल्या राजर्षिंस व विशेषतः वृद्धावस्थेंत तर तो आचरण्यास दुर्घटच, असें सांगून हा बेत रहित करण्याविषयीं प्रधानादिकांनीं राजाची बहुत विनवणी केली. पण तिचा उपयोग झाला नाहीं. राजाचा विचार ठरला तो कायम. त्यानें लौकरच पुत्राला राज्याभिषेक केला व संसारांतून मन काढून, विरक्त चित्तानें वनास जाण्याची तयारी केली.

**मदालसेसहित** तो जाण्यास निघाला असतां **अलर्कानें** आपलें मस्तक त्यांच्या पायावर ठेवून नमस्कार केला. तेव्हां

अशा स्थितींतही त्यांस पुत्रमोहानें गाहिवर आला **अलर्कास** उठवून त्याला जो उपदेश योग्य तो त्यांनीं केल्यावर शेवटीं **मदालसा** म्हणाली, “ पुत्रा ! आजपर्यंत मी तुला जो उपदेश केला तो नीट ध्यानांत ठेव, व त्याप्रमाणें वाग. म्हणजे तुला ऐहिक सुखाची कधीं वाण पडणार नाहीं. पण गृहस्थाश्रम हा दुःखपर्यवसायी आहे. यांत चिरकाळ सुखोपभोगानें अनेक व्यसनें लागतात व त्यानें मोक्षज्ञानापासून मति भ्रष्ट होते. यासाठीं आत्महित इच्छिणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें गृहस्थाश्रमाचा बराचसा उपभोग घेतल्यावर आपलें मन ब्रह्मज्ञानाकडे लावून, आत्यंतिक निश्रेयसाची प्राप्ति करून घ्यावी. तर पुत्रा ! मी तुला ही आंगठी देतें, ती जपून ठेव; आणि ज्या काळीं प्रियबंधूंच्या वियोगाचें तुला दुःख होईल, किंवा शत्रूपासून बाधा होऊं लागेल, किंवा संसार पुरेसा वाटून वीट येईल, किंवा कोणतीही आपत्ति तुला दुःखाप्रत नेऊं लागेल, त्याकाळीं, या आंगठींत फार बारीक अक्षरांनीं लिहिलेलें एक पत्र आहे, तें काढून वाचून पहा. म्हणजे तुझ्या अंतःकरणावरील अज्ञानपटल दूर होऊन तूं सावध होशील व तुझ्या दुःखाचा परिहार करण्याचा मार्ग तुला मिळेल.” असें म्हणून **मदालसेनें** एक सुवर्णाची आंगठी त्याचे बोटांत घातली, आणि अनेक आशीर्वाद देऊन लागलीच पतिसह वनास निघून गेली.

---

## प्रकरण आठवें.

मातापितरांच्या वियोगानें **अलर्क** राजास पहिल्यानें फार दुःख झालें. तरी राज्यव्यवस्थेच्या खटपटींमध्यें त्याचा हळू हळू विसर पडत चालला. त्यानें सर्व राज्यसत्ता आपले हातीं घेतली. प्रधान कसे आहेत, मांडलिक राजांची काय

स्थिति आहे, आपल्यास शत्रु कोण आहेत, त्यांचें बळ



किती, त्यांस जिंकण्याचे उपाय कोणते इत्यादि गोष्टींचा त्यानें जातीनें शोध केला; व जे कोणी प्रतिकूल दिसले, त्यांस जिंकून आपले अंकित करून ठेवलें. तेणेंकरून राज्यांत सर्वत्र वचक बसून, निर्वैर प्रजापालन होऊं लागलें. अशा रीतीनें बहुत वर्षे लोटलीं ; पण धर्मार्थकामांचे ठिकाणीं अत्यंत आसक्तचित्त झाल्याकारणानें त्याला तीं कशीं गेलीं हें कळूनही आलें नाहीं ; केवळ एका दिवसा प्रमाणेंच तीं त्याला वाटलीं. कारण तो राज्य सत्तेच्या बळानें अनेक प्रकारचे विषयसेवन करीत होता. विषयांचें संसर्गानें त्याचे ठिकाणीं सहजच उन्मत्तपणा आला. संसारांतून मन निघेना; व पुण्याचा क्षय होत जाऊन, त्याची दुर्दशा होण्याचा काळ जवळ येऊन ठेपला.

**अलर्का**चा वडील भाऊ **सुबाहु** म्हणून होता. त्यास ही **अलर्का**ची दुर्धर दशा कळतांच, फार वाईट वाटलें. आपला हा भाऊ आहे, यास्तव त्याला या संकटांतून सोडवावें व कांहीं झाल्यास बोध करावा म्हणून तो कांहीं उपाय शोधूं लागला. पण चांगलासा सौम्य उपाय त्यास आढळेना. **अलर्क** हा विषयसेवनांत गुंग झाल्यामुळें कोणताही बोध सरळपणानें ग्रहण करील असें नव्हतें. शेवटी विचार करतां करतां, **काशीराज** नामक कोणी बलाढ्य राजा होता त्याची आठवण त्याला झाली. **काशीराजा**चें व **अलर्का**चें उभें वैर होतें म्हणून तो **काशीराजा**कडे गेला आणि म्हणाला,

"महाबाहो **काशीराजा! अलर्क** म्हणून माझा धाकटा भाऊ आहे हें तुला ठाऊकच आहे. आमचा पिता वारला तेव्हां राज्याचा वाटा आम्हास न देतां सगळें राज्य त्यानच बळकावलें. मीं पुष्कळ यत्न केले, पण तो



बलाढ्य असल्याकारणानें माझ्या यत्नांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यासाठीं मी आपल्यास शरण आलों आहें. आपण फार बलिष्ठ आहां. जर मनावर घेतलें तर आपण त्या उन्मत्त **अलर्काचें** शासन करण्यास समर्थ आहां. तरी मज गरीबावर दया करून, **अलर्कास** जिंकून मला राज्यावर बसवाल तर मजवर मोठे उपकार होतील. शिवाय अर्धे राज्य मी आपल्यास देईन."

**काशीराजानें सुबाहूची** विनंति मान्य केली. "फार बरं." असें म्हणून त्यानें दूतमुखानें **अलर्कास** निरोप पाठविला कीं राज्याचा मालक **सुबाहु** असतां, तूंच राज्य बळकावून बसलास, त्याला देशोधडीस लाविलेंस हें फार अन्यायाचें काम केलेंस. तरी त्याचें राज्य त्याला दे; नाहींपेक्षां युद्धास तयार हो."

त्याच बादूतरोबर **अलर्कानें** उत्तर पाठविलें, "असा निरोप पाठविण्यांत **काशीराजाचा** काय आशय असावा; कळत नाहीं. त्यानें विनाकारण माझ्या वाटेस जाऊं नये. नाहींतर

अनर्थ होईल. जर सुबाहूस राज्य पाहिजे असेल तर त्यानें मजकडे येऊन सुहृदपणानें मागावें म्हणजे मी देईन. नाहींपेक्षां एक पाऊलही जमिनीचा तुकडा त्याला मिळणें नाहीं! आतां काशीराजाला युद्धाचीच इच्छा झाली असली तर मी खुपीनें ती पुरवीन, असें जाऊन तूं आपल्या स्वामीस सांग."

लगेच सैन्य जमा करून काशीराज अलर्काचे नगरास येऊन दाखल झाला व त्यानें आपल्या लोकांस नगरास वेढा देण्याची आज्ञा केली. त्यासमयीं अलर्कराजा अनेक प्रकारचे विलास करण्यांत बेफाम झाला होता. असें पाहून काशीराजानें त्याचे आश्रित व चाकर यांपैकीं एकेकास गांठून आपलेंसें करून घेतलें; कोणास लांच दिला, कोणास पुढील लाभाची आशा दाखविली. अशा प्रकारें फितुर करून, राज्यांतील मार्गांची नाकेबंदी केली. त्याच्या सेनापतीला चहोंकडून घेरलें. किल्ले घेऊन त्यांवरील रक्षकांस पिटून अरण्यांत घालविलें. शत्रूनें वेढल्यामुळें अलर्काच्या भांडारांतील द्रव्यसंचय संपत आला व बाहेरून नवा येईनासा झाला. अशा प्रकारें जेर झाल्याकारणानें व्याकुळ होऊन तो फार खिन्न झाला. तेव्हां काय करावें, अशा विवंचनेंत विचार करतां करतां त्यास अकस्मात् मदालसेनें जातेवेळीं दिलेल्या आंगठीचें आठवण झाली. लगेच स्नान केलें व शुचिर्भूत होऊन देवांस व ब्राह्मणांस नमस्कार करून, त्यानें आंगठींतलें पत्र वाचून पाहिलें. त्याबरोबर त्यास मोठा हर्ष झाला. अंगावर रोमांच उभे राहिले. व त्या हर्षानें त्याचे डोळे प्रफुल्लित झाले. त्यांत लिहिलें होतें :- "बाबारे संसारसंगाचा सर्वात्मबुद्धीनें त्याग करावा. कोणाची संगती पाहिजेच तर ती साधुजनांची तरी करावी. तीच दुःखरूप

रोगावर महा मात्रा आहे. तसाच कामाचाही त्याग करावा. तोही न होईल तर तो मोक्षप्राप्तीकडे तरी योजावा. हेंच त्या कामशांतीस उत्तम औषध होय."

असा त्या पत्रिकेंतील मजकूर पुनः पुनः वाचून पाहून, विचार करतां करतां त्याचा निश्चय झाला कीं आतां आपण मोक्षाचीच इच्छा करावी. त्यांत सर्व कल्याण आहे. पण ही मोक्षेच्छा तरी सत्समागमाशिवाय पूर्ण कशी होईल? यासाठीं आतां हा सत्समागम मला कसा घडेल? अशी चिंता मनांत धरून, आणि गुप्तपणें आपलें नगर सोडून, तो एकटाच रानांत निघून गेला.

तीर्थोदकांत नित्य स्नानें करावीं, शुचिर्भूत राहून देवाची पूजा करावी, कंद फळ मूळें यथापेक्ष खावीं, अशा रीतीनें फिरतां फिरतां थकून, एका झाडा खालीं तो **अलर्कराजा** येऊन बसला. एकसारखी मनांत चिंता ही कीं " मला असा साधु कोण मिळेल?– कीं माझें दुःखरूप दैन्य दूर करून, मला मोक्षपदाचा मार्ग दाखवील." तों त्या झाडा खालीं कोणी एक वैरागी सहजगतीनें आला. थोडा वेळ गेल्यावर **अलर्कास** तो विचारतो, "महाराज! तुम्ही एथें असे कां बसलां? तुमची अंगकांति राजतेजानें युक्त अशी दिसते; तर असा हा विलासांत वाढलेला कोमळ देह अशा अरण्यांतील कष्ट दशेला कां आणला? आपलें तोंड



उतरलेलें दिसतें. तर अशी कोणती चिंता आपल्या जिवास जाळीत आहे?"

अलर्क दीन वदनानें उत्तर करतो, "साधो! मी आपली दशा तोंडानें काय सांगावी? तथापि सांगतों. कारण आपल्यास तरी दया येऊन आपण मला सत्समागमाला लावाल." असें म्हणून नम्रपणानें त्यानें सर्व हकीगत निवेदन केली.

ती ऐकून हसून तो वैरागी म्हणतो, "राजा! मी सांगतों तसें करशील?"

राजा म्हणतो, "दीन दयाळा साधो! मी आपला दास आहे; अधिक काय सांगूं? आपण मला माझी चिंता दूर करणाऱ्या साधूचा परिचय करविला असतां मजवर मोठे उपकार होतील."

वैरागी म्हणतो, "तर तूं आपले डोळे मीट पाहूं? आणि हुं म्हणतांच उघड."

अलर्कानें डोळे मिटले. आणि वैराग्यानें खुण करतांच उघडून पहातो तों तेथें वैरागी वगैरे कोणी नसून, समोरच्या एका झाडाखालीं जगद्गुरु श्रीदत्तात्रेयाची मूर्ति उभी असेलेली



मात्र त्याच्या दृष्टीस पडली. सहा हात, तीन मुखें, माथां जटाभार, हास्यमुख चर्या, कमरेला कौपीन अशी दिव्य मूर्ति दृष्टीस पडतांच, जन्मदरिद्रास मोठा ठेवा हातीं लागल्याप्रमाणें अलर्कास आनंद झाला. तो तसाच उत्कंठेनें उठला आणि धावत जाऊन श्रीदत्ता-

हीं फळें जाणावीं. हा जो एवढा विस्तृत वळकट वृक्ष माजला आहे त्याला समागम हें पाणी आहे. या समागमाचें नित्य सेचन त्यास होत असल्यामुळें, हा वृक्ष एवढा वाढला आहे कीं त्यानें मोक्षाचा सगळा मार्ग अडवून टाकला आहे. यास्तव, हे राजा, ज्या कोणास यास तोडून टाकावयाचें असेल त्यांनीं सद्विद्यारूप हीं एक खाशी कुऱ्हाड पैदा करावी आणि सद्वर्तनरूप निसण्यावर घासून, चांगली पाजवावी. याच कुऱ्हाडीनें हा ममता वृक्ष तुटेल, हा निश्चयच आहे. सर्व प्रयत्न व्यर्थ होत !"

अलर्क, या भाषणानें हर्षित होत्साता, म्हणतो, " सद्गुरो ! स्वामिन् ! मला आपल्या प्रसादानें हें ज्ञान झालें. पण माझें चित्त विषयांमध्यें इतकें आसक्त झालें आहे कीं तें स्थिर होत नाहीं. तर तें स्थिर कसें होईल ? आणि पुनः जन्मास न येतां, त्रिगुणरहित जें शाश्वत शुद्ध ब्रह्म त्यास मी कसा प्राप्त होईन ? याविषयीं मी प्रार्थना करतों, मला उपाय सांगावा."

दत्तात्रेय म्हणतात "बाबारे ! मोक्ष कांहीं निराळा नाहीं. ज्ञानपूर्वक अज्ञानाचा निरास तोच मोक्ष ; यासच आणखी सर्वव्यापक ब्रह्माचें ऐक्य असेंही म्हणतात. ज्ञानानें मोक्ष प्राप्ति होते; पण हें ज्ञान होऊनही जर मनुष्य ममतासक्तच राहील तर तें ज्ञान लौकरच नष्ट होईल. यासाठीं, तें ज्ञान स्थिर होण्याकरतां ममता टाकून वैराग्य धरावें. आतां तूं म्हणतोस, माझें मन स्थिर होत नाहीं. तर याचें कारणही हेंच आहे. तुला किंचित् सज्ञानाचा संसर्ग मात्र झाला आहे. पण तें ज्ञान अझून ठसलें नाहीं. तें जेव्हां ठसेल तेव्हां तुला ब्रह्माचा साक्षात्कार होऊन मोक्ष मिळेल. यासाठीं

ममता सोडून व वैराग्य धरून योगाचा अभ्यास कर, म्हणजे तुझें चित्त स्थिर होऊन ज्ञान दृढ होईल.

"आतां हा योग कसा ? म्हणून विचारशील तर तोही तुला सांगतों; ऐक. मनुष्याचें मन हें दुर्जेय आहे. यास्तव योगधारणा करूं इच्छिणारानें चहोंकडे धांवणाऱ्या आपल्या मनाला प्रथम आवरलें पाहिजे. आणि हें मन आवरतां येण्यासाठीं प्राणायाम करण्यास शिकलें पाहिजे. प्राणायाम करण्याची रीति अशी आहे. योगाभ्यास करणारानें होईल तसें करून अंतःकरण स्थिर करून, पद्मासन, अर्धासन व स्वस्तिकासान या तीन आसनप्रकारांपैकीं कोणत्या तरी एका आसनावर बसावें. नंतर दोन्ही मांड्या दाबून, लिंग व वृषण यांस टाच न लावितां, उजवा पाय डाव्या पायावर ठेवावा; मान किंचित् उंच व ताठ करावी; तोंड मिटावें, तरी दोनही दंतपक्तींचा एकमेकांस स्पर्श होऊं देऊं नये; आणि दृष्टि चहोंकडे न फाकवितां, नासिकाग्रींच ठेवावी. मनांतील रजोगुणानें तमोगुणाच्या, व सत्वगुणानें रजोगुणाच्या वृत्तीचा निषेध करून, केवळ शुद्ध सात्विक वृत्तीनें इंद्रियें प्राण व मन यांस एकाग्र करावें आणि सर्वदा आत्मस्वरूपीं प्रीति धरून अंतःकरणांत आत्म्याचेंच चिंतन करावें. अशी व्यवस्था झाल्यावर योग करणारानें पूरक, कुंभक व रेचक अशा तीन रीतींनीं श्वास शरीरांत खेळवावा म्हणजे तो प्राणायाम झाला. एका नाकपुडीनें श्वास आंत ओढणें यास पूरक म्हणतात; नाभि, हृदय, ऊर, कंठ, नासिकाग्र, नेत्र इत्यादि शरीरांतील निरनिराळ्या भागांत श्वासाचें स्तंभन करणें ( म्हणजे कोंडून धरणें ) यास कुंभक म्हणतात; आणि दुसऱ्या नाकपुडीनें तो श्वास सोडणें यांस रेचक म्हणतात. या प्राणा-

यामाचे तीन प्रकार आहेत; लघु, मध्यम आणि उत्तम. त्यांचें प्रमाण असें कीं डोळ्याची उघड झाक करण्याला जो काळ लागतो त्याला मात्रा म्हणतात; अशा बारा बारा मात्रांपर्यंत पूरक, कुंभक व रेचक अशा रीतींनीं शरीरांत श्वास खेळविला असतां, एक लघु प्राणायाम होतो. याच रीतीनें दुप्पट काळपर्यंत म्हणजे चोवीस मात्रांचा जो प्राणायाम तो मध्यम; आणि छत्तीस मात्रांचा उत्तम होय. लघु प्राणायामानें अंगांतील घर्म नाहींसा होतो, मध्यमानें कंप व उत्तमानें खेद दूर होतो. जसा पाळलेला सिंह पशूंचा मात्र नाश करतो, पण मनुष्यांस दुखवीत नाहीं, तसा प्राणायामानें खेळविलेला श्वास शरीरांतील दोष मात्र जाळून टाकतो, शरीरास पीडा करीत नाहीं. याप्रमाणें बारा प्राणायाम झाले म्हणजे त्यांस धारणा असें म्हणतात; आणि दोन धारणा झाल्या असतां त्यास योग म्हणतात. या योगाचे तीन भाग आहेत; प्राणाचा जो निरोध त्यास प्राणायाम, मनाची स्थिरता ती धारणा, आणि शब्दादि विषयांपासून जें इंद्रियांस आवरणें तो प्रत्याहार असें जाणावें.

"हे अलर्क राजा, याप्रमाणें योगसाधनाचें साधारण ज्ञान तुला सांगितलें. असा योग केला असतां शरीरांतील दोष नाश पावून, योग्यास उत्तम सिद्धि प्राप्त होते. परंतु कित्येक वेळां योग बरोबर न झाला तर व्याधि इत्यादि शरीरदोष उत्पन्न होऊन योगाभ्यासांत अडथळा आणतात. यास्तव हे अडथळे कोणते व ते कसे दूर करावे हें सांगतों.

"योग करूं इच्छिणारानें संतप्त, क्षुधित, श्रांत व व्याकुळ अशा स्थितींत योग आरंभूं नये. अतिशय थंडी, अति उन्हाळा, किंवा वावटळ सुटली असेल, असा काळ योगा-

भ्यासाला अप्रशस्त आहे. तसेंच, जेथें फार गोंगाट चालला असेल, जेथें आगीचा व जलाचा उपद्रव असेल, जुनी पडलेली इमारत, चवाठा, नदीतीर, स्मशान, आणि साधारणतः कोणतेंही भयप्रद स्थान, हीं स्थानें योगाभ्यासास वर्ज्य करावीं. योग्यानें दुर्जनांचें दर्शन होऊं देऊं नये, आणि साधारणतः चित्तक्षोभ होईल ती गोष्ट सोडावी. वरील गोष्टींकडे दुर्लक्ष केलें असतां, त्याच्या शरीरस्थितींत दोष उत्पन्न होऊन, योगाभ्यासांत अनेक विघ्नें येतात. तर तीं येऊं नयेत म्हणून जपावें. आतां अज्ञानानें रोगादिक उत्पन्न झालेच तर त्यांची हयगय न करतां, चिकित्सा करून औषधोपचार करावा. धर्मार्थकाममोक्ष या पुरुषार्थांचें साधन हें शरीरच आहे. यास्तव त्याची उपेक्षा करणें बरें नाहीं.

"आतां योगसिद्धीचें लक्षण सांगतों. योगसिद्धीनें योग्यास अनेक चमत्कार करतां येतात. तरी त्यानें ते प्रख्यात करूं नयेत; केले तर त्याचें ज्ञान नष्ट होईल. तथापि कित्येक बाह्य चिन्हांवरून योग्यास लोक ओळखतात. सर्व विषयांमध्यें वैराग्य, मनःशांति, दयाभूत अंतःकरण, अंगास सुगंध, परिमित आहारानें शौच व मूत्र यांचें अल्प प्रमाण, शरीराची दिव्य कांति, प्रसन्न मुख, भाषणाचें सौरस्य, आणि सर्व व्यवहारांत साधारणतः सौम्यता, अशीं योग्याचीं मुख्य लक्षणें आहेत. तो व्याघ्रसिंहादिकांस भीत नाहीं, व त्याला पाहून दुसरेंही कोणी प्राणी भीत नाहींत. अशीं लक्षणें लोकांस सहज कळतात, व ते प्रीतीनें त्याजकडे येऊन, त्याची स्तुति करतात. पण त्या योग्यानें एवढ्यानें भुलून जातां कामा नये.

"हे सौम्य अलर्का, योग्यास आत्मदर्शन झालें असतांही त्याची प्रवृत्ति भलतीकडेच होऊं लागते. म्हणजे त्यास

वेद, वेदार्थ, काव्यशास्त्र व इतर शिल्पादि विद्या आपोआप प्राप्त होतात; भूत, भविष्य, वर्तमान कळूं लागतें; त्यास अष्टसिद्धि हस्तगत होतात, इत्यादिकांच्या योगानें त्यास फार गर्व प्राप्त होतो, वरील विद्यांच्या प्राप्तींतच त्याचें मन गढून जातें व ब्रह्मचिंतनापासून तें वारंवार परावृत्त होत असतें. यास्तव योगाभ्यास पूर्ण झाला असें कोणी मानूं नये; तो अंतकाळपर्यंत चालवितच गेलें पाहिजे.

अलर्कानें उत्कंठेनें प्रश्न केला. "महाराज, मला एवढें ज्ञान झालें हे मजवर मोठे उपकार आहेत. आतां योग्यानें आपलें आचरण कसें ठेवावें हें ऐकावयाची इच्छा आहे."

दत्तात्रेय म्हणतात, "राजा! फार चांगलें विचारलेंस. साधारण मनुष्यास मान व अपमान हे प्रीति व उद्वेग करणारे होतात. परंतु योगी पुरुषास अपमान अमृतासमान व मान विषाप्रमाणें वाटतो. यास्तव त्याचें आचरण फार साधें असतें. त्यानें सदा शुचिर्भूत असावें. नीट पाहून पवित्र जाग्यावर पाऊल ठेवावें. वस्त्रानें गाळून स्वच्छ केलेलें पाणी प्यावें. सत्यानें पवित्र झालेल्या वाणीनें भाषण करावें. त्यानें कोणाच्या घरीं आतिथ्यास, श्राद्धास, किंवा यज्ञार्थ जाऊं नये. कोठें देवादिकांच्या यात्रेस, उत्सवास, किंवा जनसमुदयांत जाऊं नये. सर्व जनांचें भोजन झालें असेल अशा वेळीं धार्मिक लोकांकडे मात्र भिक्षार्थ जावें. हमेशा एकाच ठिकाणीं वास करूं नये. भक्षणार्थ योग्य असेल तेवढ्याचेंच ग्रहण करावें. जवळ कांहीं संग्रह करूं नये. भोजन करतांना मौन धरून प्रथम अपोशन घ्यावें, नंतर प्राण, अपान, व्यान, उदान व समान अशा दरएक आहुतीस निरनिराळा प्राणायाम करावा. मग जेवढा ला-

गेल तेवढा आहार करून, हातपाय स्वच्छ धुवून, व आचमन करून, हृदयास स्पर्श करावा. हा भोजनविधि झाला. आतां कांहीं व्रतें व नियम सांगतों. चोरी न करणें, ब्रह्मचर्य, ममत्वत्याग, निर्लोभ व अहिंसा हीं पांच मुख्य व्रतं होत. अक्रोध, गुरुसेवा, शुचिर्भूतपणा, अल्पाहार व वेद-शास्त्राध्ययन हे पांच प्रकारचे नियम होत. वेदाध्ययनापेक्षां यज्ञकर्म श्रेष्ठ, यज्ञाहून जप, जपाहून ज्ञान, ज्ञानाहून ध्यान-योग हा सर्वश्रेष्ठ आहे. यास्तव पायरी पायरीनें एकेकाची प्राप्ति करून घेऊन, ब्रह्माशीं एकात्मत्व मिळवावें. मोक्ष प्राप्तीला हाच काय तो एक मार्ग आहे.

"आतां तुला प्रणवाचें स्वरूप मात्र सांगावयाचें राहिलें आहे. मी आतांच सांगितलें कीं योग्यानें आत्मचिंतन करावें. पण हें आत्मचिंतन म्हणजे काय ? असा सहजच प्रश्न येतो. तर त्याचें विवरण मी तुला सांगतों. प्रणव म्हणजे ओंकार; हा अकार, उकार व मकार अशा तीन मात्रा व ऊर्ध्व भागीं असलेली अर्धी मात्रा यांनीं बनलेला आहे. यांत पहिल्या तीन मात्रा सत्वरजस्तमाच्या दर्शक असून शेवटली अर्ध मात्रा ही त्रिगुणरहित आहे. ती योग्यास मात्र कळते. ओं-काराचें ठिकाणीं ऋक् , यजु व साम हे तीन वेद; स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक; आहवनीय, गार्हपत्य, व दाक्षिण हे तीन अग्नि; विष्णु, ब्रह्मा व शंकर असे तीन देव, वास करतात. अकाररूप पहिली मात्रा ही ऱ्हस्व असून व्यक्त आहे; उकाररूप दुसरी मात्रा दीर्घ असून अव्यक्त आहे; मकाररूप तिसरी प्लुत असून चिच्छक्तिरूप आहे; व शेवटची अर्धमात्रा ही वाणीला अगोचर असून साक्षात् ब्रह्मपदच होय. याप्रमाणें योगी ज्या मात्रेची मनानें

धारणा करील त्या मात्रेंतील तद्रूपाच्या ठिकाणीं तो लय पावेल. यास्तव "ओं" अशा प्रणवोच्चारणानेंच सकळ चराचर विश्वाचें ग्रहण होतें.

"राजा! असें हें ओंकाररूप अक्षर परब्रह्म तुला सांगितलें. जो कोणी आरंभीं सांगितल्याप्रमाणें प्राणायाम करून योगध्यानानें ओंकाररूप ब्रह्मस्वरूपास जाणील तोच आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक अशा दुःखांपासून मुक्त होईल, व अंतीं मोक्षास पावेल."

याप्रमाणें **दत्तात्रेयस्वामींचें** भाषण संपतांच, संतुष्टचित्त होऊन **अलर्क** नमस्कारपूर्वक म्हणतो, "हे ब्रह्मन् जगद्गुरो! मला जो ज्ञानोपदेश केला तो मला समजला. आतां माझे मनांतून तपश्चर्या करावी असें आहे. **काशीपति** राजा माझा पराभव करण्याला आला हें फार चांगलें झालें. कारण त्यानें तरी माझे डोळे उघडून, मला सत्समागमाची इच्छा झाली, आणि त्याप्रमाणें आपला समागम घडून उत्तम योगमार्गाचें ज्ञान झालें. आतां हें ज्ञान ब्रह्मप्राप्तीकडे लावावें असें इच्छितों, तरी मजवर अनुग्रह करून, अनुज्ञा असावी. मला आतां राज्यादिकांची कांहीं एक इच्छा उरली नाहीं."

अनुतापपूर्वक हें शुद्ध सरळ भाषण ऐकून, **दत्तस्वामींस** मोठा संतोष झाला. ते म्हणतात, "राजा! तुझें कल्याण असो. तुझी मति योगसाधनाला अनुकूळ झाली आहे. तर तूं आपल्या इच्छेप्रमाणें कर. पण अद्याप आणखी एक गोष्ट तुझ्या मोक्षप्राप्तीला अडथळा आणणारी अशी सांगण्याची राहिली आहे. ती अशी कीं,—तरुणदशेंत तुझ्या हातून मदानें फार उन्मत्त आचरण झालें, त्यामुळें

तुझ्या मातापितरांस फार दुःख झालें, व तुझ्याकडून त्यांची सेवा व्हावी तशी झाली नाहीं, यासाठीं योगसिद्धि झाल्यावर, तूं मुद्दाम सेवेसाठीं मातापितरांकडे जा. तीं कोठें आहेत म्हणून विचारशील तर तें सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण तें तुला योगसिद्धीनें आपोआपच कळेल. किंबहुना तें ज्ञान झालें कीं योगसिद्धि झाली असें समज. ही पितृसेवा तुला घडल्यावाचून तुझा योग पूर्ण होणार नाहीं. यासाठीं या गोष्टीची नीट आठवण ठेव; विसरूं नको. असो; आतां तूं इष्ट उद्देशाला लाग." असें म्हणतांच **अलर्का**नें मोठ्या भक्तीनें **दत्तात्रेयां**च्या पायांवर मस्तक ठेवलें. स्वामी त्यास आशीर्वाद देऊन तेथून निघून गेले.

**अलर्का**स पूर्ण पश्चात्ताप झाला असल्याकारणानें, त्यानें योगाभ्यासास विलंब लावला नाहीं. एक सोईची जागा पाहून तेथें तत्काळ अभ्यासास आरंभ केला. **दत्तस्वामी**च्या अनुग्रहानें त्यास लौकरच योगसिद्धि झाली, व मातापितरांचें स्थान जाणण्यासही अडचण पडली नाहीं. तो लागलाच तेथें गेला. त्यास पाहतांच **ऋतध्वजास** मोठें आश्चर्य वाटलें व "हा येथें कसा आला" याचा तो विस्मय करूं लागला. **मदालसेस** मात्र तसें वाटलें नाहीं. कारण तिला अंगठी दिल्याची आठवण होती, व यास अशा रीतीनें योगसिद्धि होऊन ब्रह्मसाक्षात्कार होईल असें ती जाणतच होती. **अलर्का**स पाहून ती म्हणाली, " बाळा ! तुला बाळा म्हणून म्हणण्याचा जरी आतां मला अधिकार नाहीं—कारण तूं आतां ब्रह्मज्ञानसंपन्न होऊन, तत्स्वरूप झाला आहेस, तरी लौकिक व्यवहारासाठीं मात्र तसें म्हणतें. असो; तूं आलास; फार चांगलें झालें."

नंतर **अलर्कानें**, आपल्या पराभवाची, **श्रीदत्त**स्वामींच्या उपदेशानुग्रहाची, व योगसिद्धीची सर्व हकीगत त्यांस निवेदन केली, व आपला सेवेचा उद्देश विदित केला. मनोभावानें पितृसेवा केल्यावर **अलर्का**चा योगाभ्यास पूर्ण झाला, व त्यास ब्रह्मसाक्षात्कार होऊन, ब्रह्मैक्य प्राप्त झालें. असा तो ब्रह्मतेजानें शोभूं लागला असतां, त्याच्या मातापितरांस फार संतोष झाला. त्याच्या योगसिद्धीची ख्याति चहोंकडे होऊन, त्याचे तिघे भाऊ–**सुबाहु, विक्रांत** व **शत्रुमर्दन**–हेही तेथें आले. त्यानें सर्वांसही सज्ञान करून ब्रह्मसाक्षात्कार करविला. पुढें नेमलेला वेळ येतांच, त्या सर्वांस पूर्णब्रह्मस्वरूप जे **श्रीदत्त**स्वामी त्यांचें दर्शन झालें व त्यां सर्वांस नेण्यासाठीं जें विमान आलें त्यांत बसून त्यांनीं जीवन्मुक्तच स्वर्गारोहण केलें !

याप्रमाणें **ऋतध्वज** व **मदालसा** यांचें व त्यांच्या अनुसंधानानें, त्यांच्या चौघा पुत्रांचें व **शत्रुजित्** राजाचें अद्भुत चरित्र वर्णन केलें. तें वाचून मनोरंजनचें मनोरंजन होऊन पौराणिक काळच्या रीतिभाति, त्या वेळचा सात्विकपणा, इत्यादि गोष्टी वाचकांस कळतील; व विशेषेंकरून सर्वांनीं सर्वकाळींही अनुसरण्याला योग्य अशी पितृभक्ति, पतिभक्ति व मित्रप्रीति यांचाही उत्तम बोध होईल. तो वाचक भक्तमंडळीस चिरकाळ व्हावा अशी त्याच जगद्गुरु **श्रीदत्तस्वामीं**स मनापासून प्रार्थना आहे.

**समाप्त.**

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | १० | गीर्वाण | गीर्वाण |
| १ | १३ | आयोध्या | अयोध्या |
| १४ | १९ | सूर्याच्या | इंद्राच्या |
| १६ | १५ | अश्वासन | आश्वासन |
| १९ | १६ | पश्चिमेच्या | पूर्वेच्या |
| २० | २ | आड असल्यामुळें | वर आल्यामुळें |
| २० | ११ | पुच्छगुच्छ | पुष्पगुच्छ |
| २३ | ४ | तालकेतु | पाताळकेतु |
| ५१ | २२ | रागानें रागानेंच | रागारागानेंच |
| ५२ | २ | ताळकेतु | पाताळकेतु |
| ५२ | ८ | तालकेतु | पाताळकेतु |
| ५२ | २४ | तालकेतु | पाताळकेतु |
| ५३ | २१ | पाताळकेतु | ताळकेतु |
| ५३ | २३ | पाताळकेतूवर | ताळकेतूवर |
| ५३ | २४ | पाताळकेतु | ताळकेतु |
| ५४ | २ | पाताळकेतूनें | ताळकेतूनें |
| ५४ | १२ | ताळकेतु | पाताळकेतूनें |
| ५५ | १३ | पाताळकेतु | ताळकेतु |
| ६० | १७ | आतां | असतां |
| ६० | २२ | ताळकेतु | पाताळकेतु |
| ६४ | १ | कीती | क्रिती |
| ७२ | ९ | तो | तें |
| ८४ | ४ | तापाळकेतूनेंही | पाताळकेतूनेंही |
| ८८ | ४ | दुर्वाता | दुर्वार्ता |
| ९२ | २५ | सदोदिस | सदोदित |
| ९५ | १८ | दुर्वाता | दुर्वार्ता |
| ९७ | ३ | करून | करुन |
| ९७ | ११ | स्थिस्ति | स्थिति |
| ९७ | १६ | करून | करुन |
| ९८ | २४ | माझ | माझ्या |
| ९९ | १० | माग | मार्गे |
| ९९ | १२ | दुर्वाता | दुर्वार्ता |
| १०७ | २३ | मजकडे | त्याजकडे |
| ११३ | १८ | परिश्वंग | परिष्वंग |
| १२७ | १० | निश्रेयेसाची | निश्रेयसाची |
| १२९ | २४ | वादूतरोबर | दूताबरोबर |
| १३२ | २२ | कमरेला कौपीन | कमरेला कडासन, अंगावर कौपीन |